बांदें येथील प्रसिद्ध साधु व कवि

सोहिरोबा आंबियेकृत

पदसंग्रह.

(यांत या कवीनें रचलेलीं पदें, अभंग, सवाया, श्लोक, आरत्या, वगैरे अनेक छंदोबद्ध प्रकरणें आहेत.)

भगवंत बाळकृष्ण पै रायकर यांनीं

हा संग्रह जमवून प्रसिद्ध केला.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति.

तुकाराम.

तो

मुंबईत

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

शके १८०६.

78

1884

किंमत १ रुपया.

प्रस्तावना.

ज्या साधु पुरुषाचा कवितासंग्रह आह्मी आज लोकांपुढें आणित आहों त्याचा कांहीं जीवनवृत्तांत आरंभीं देणें अवश्य आहे. परंतु या कामासाठीं आह्मांकडे साधनें फारच थोडीं आहेत, किंबहुना मुळींच नाहींत ह्मटलें तरी चालेल. याचीं कारणें शोधूं गेल्यास अनेक सांपडतील. एक तर हा साधु पूर्ववयांत अगदीं गरीब स्थितींत होता यामुळें त्याच्याविषयीं कोणी फारशी पूसतपास केलेली नाहीं. दुसरें, तो ज्या प्रदेशांत राहिला होता त्यांतल्या लोकांचें लक्ष नेहमीं व्यापारधंद्यांत मग्न झालें असल्यामुळें ते विद्याप्राप्तीविषयीं अगदींच पराङ्मुख राहिले. मग याच्या कवितेस विचारतो कोण? तिसरें, या साधूस मुळीं कोणाचा आश्रय नसल्यामुळें एकाद्या कोनाकोपऱ्यांत पडलेल्या झांकलेल्या रत्नाप्रमाणें त्याचें तेज अगदींच लोपून गेलें होतें. अशा व दुसऱ्या अनेक कारणांमुळें सोहिरोबांविषयीं कांहीं वृत्तांत मिळत नाहीं. फार तर काय, पण त्यांचे वंशज जे हल्लीं आहेत त्यांलाही त्यांविषयीं कांहीं माहिती नाहीं. आह्मांस जी कांहीं माहिती मिळाली आहे ती सावंतवाडी येथील अनेक वृद्ध पुरुषांच्या मुखांतून ऐकिलेली आहे, आणि तीच सर्व एकत्र करून आह्मी एथें देतों.

सुमारें पावणेदोनशें वर्षांपूर्वीं ह्मणजे शके १६३६ च्या सुमारास सावंतवाडी संस्थानांत बांदें[1] ह्मणून गांव आहे तेथें सोहिरोबा आंबिये या महान् साधु पुरुषाचें जन्म झालें. यांच्या पूर्वजांविषयीं फारशी माहिती मिळत नाहीं. परंतु सावंतवाडीस येण्यापूर्वीं त्यांची वस्ती गोवें प्रांतांत असावी असें दिसतें, कारण त्यांचे बहुतेक वंशज अद्यापि गोवें अमलांत आहेत. सोहिरोबा हे जातीचे शेणवी

१ बांदें हें शहर पूर्वीं विजापूरसरकारचे वेळीं एदिलाबाद या नांवानें प्रसिद्ध होतें, व तें त्या सरकारच्या राजधानीचें शहर होतें. मुसलमान लोकांनीं त्यावेळीं बांधलेलीं कबरस्थानें, घुमट, विहिरी वगैरे जुनीं दगडी कामें या ठिकाणीं अजूनही पुष्कळ पाहण्यांत येतात.

ब्राह्मण. यांचे वडील उदरपोषणानिमित्त वाडीसंस्थानांत येऊन राहिले होते. सोहिरोबा हे मोठे झाल्यावर त्यांच्याकडे त्यांच्या एका नातलगाच्या वशिल्यानें कित्येक गांवच्या कुळकर्णीपणाचें काम आलें. हें काम त्यांनीं फार सचोटीनें बरेच वर्षें केलें. पुढें सोहिरोबांस आपल्या वयाच्या ३९ व्या वर्षीं ह्मणजे सुमारें शके १६७१ त वैराग्यदशा प्राप्त झाली. त्याविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, एकदां वाडीसंस्थानचे त्या वेळचे राजे खेमसांवत यांजकडून सोहिरोबांस कांहीं कारणामुळें बोलावणें आल्यावरून हे सांवतवाडीस जाण्यास बांद्याहून निघाले. वाटेवर दाट जंगलांत एका झाडाखालीं विश्रांतीस्तव बसले. चालून थकल्यामुळें क्षुधा लागली, तिच्या निवारणार्थ आपलेबरोबर आणलेला एक फणस फोडला व तो आतां खाणार, इतक्यांत त्या जंगलांतून "बाबू, हमकू कुच देता है?" असा शब्द निघाला. आसपास कोणी मनुष्य दिसत नसतां हा ध्वनि कोठून आला याचा विचार सोहिरोबा करीत असतां अकस्मात् एक दिव्य पुरुष त्यांचे पुढें प्रगट झाला. सोहिरोबांनीं त्या पुरुषाचे चरणीं मस्तक ठेऊन प्रेमपुरःसर बरोबर आणलेला फणस पुढें केला. त्या सिद्ध पुरुषानें तो सर्व भक्षण करून प्रसादार्थ ह्मणून पांच गरे सोहिरोबांस दिले, आणि मस्तकीं वरदहस्त ठेऊन व ब्रह्मोपदेश करून आपण अदृश्य झाले. तेव्हांपासून सोहिरोबांच्या वृत्तींत फेर पडला. पुढें सावंतवाडीस आल्यावर सोहिरोबा राजेसाहेबांच्या दरबारीं गेले आणि आपल्याकडचें कागद लेखणी वगैरे सर्व बरोबर आणलेलें सामान खेमसावंतांचे पायांपाशीं ठेऊन त्यांनीं कुळकर्णीपणाचा राजीनामा दिला आणि शेष राहिलेलें आयुष्य परमेश्वरस्तवनांत घालविण्याचा आपला संकल्प राजेसाहेबांस कळविला. त्यांची विरक्त स्थिति पाहून राजेसाहेबांसही आश्चर्य वाटलें व त्यांनीं त्यांस रजा दिली. पुढें सोहिरोबा आपल्या घरीं आले.

सोहिरोबांला ज्या सत्पुरुषानें दर्शन देऊन उपदेश केला तो कोण होता हें समजण्यास साधनें आहेत तीं अशीं:—सोहिरोबांस

---

१ बांद्याहून वाडी सुमारें चार कोश आहे.

गोरक्षनाथ नामक साधूचें दर्शन झालें होतें अशी एक दंतकथा सावंतवाडीप्रांतांत सर्वत्र प्रसिद्ध आहे. शिवाय सोहिरोबांनीं आपल्या कवितेंत जागोजाग "गोरक्षनाथ"[1] किंवा "गैबनाथ"[2] या नांवाचा उल्लेख आणला आहे. यावरून यांचे गुरू गोरक्षनाथ या नांवाचे कोणी साधु पुरुष होते असें सिद्ध होतें व तो हाच सिद्ध पुरुष असेल असें वाटतें. या गोरक्षनाथाविषयीं कांहीं माहिती मिळत नाहीं, पण वाडीकडील लोक प्रसिद्ध साधु मच्छिंद्रनाथ यांचे शिष्य जे गोरक्षनाथ तेच हे असें ह्मणतात. या गुरुशिष्यांविषयीं माहिती महिपतिकृत "भक्तविजयां"त सविस्तर लिहिली आहे ती तेथें पहावी. असो.

वैराग्य प्राप्त झाल्यावर सोहिरोबा प्रपंचाचा त्याग करून आपला सर्वकाळ ईश्वरभजनांत व कविता करण्यांत घालवूं लागले. वैराग्य प्राप्त होण्यापूर्वींचे यांचे हातचे लेख पुष्कळ आढळतात, परंतु यांनीं स्वतां आपल्या हातांनीं लिहिलेले ग्रंथ किंवा कविता अगदीं मिळत नाहींत. याचें कारण असें सांगतात कीं खेमसावंतांच्या पायांपाशीं यांनीं एकदां जी लेखणी ठेविली ती पुनः उचलिली नाहीं. ह्मणूनच यांचे सर्व ग्रंथ कविता वगैरे दुसऱ्यांनींच लिहिलेले आढळतात. त्यांतील बहुतेक भाग सोहिरोबांच्या बहिणीच्या हातचा आढळतो. ह्या बाईला लिहितां वाचतां येत होतें आणि कविता वाचण्याची तिला फार आवड असे. ह्मणून सोहिरोबा ज्या कविता ब्रह्मानंदांत निमग्न असतां ह्मणत त्या तिनें उतरून ठेवाव्या. यामुळें सोहिरोबांची कविता जगांत राहण्यास हीच पुष्कळ अंशीं कारणभूत झाली. परंतु सोहिरोबांची पुष्कळ कविता नष्टही झाली. याचीं कारणें अनेक सांगतात. त्यावेळीं हल्लींप्रमाणें कागद स्वस्त मिळत नव्हते आणि सोहिरोबा हे गरीब अवस्थेंत असल्यामुळें कागद विकत घेण्यास त्यांस सामर्थ्य नव्हतें. या कारणानें त्यांच्या बहिणीनें झाडांच्या पानांवर कविता लिहून तीं पानें एका खोलींत जमवून ठेविलीं होतीं. एके दिवशीं त्यांच्या वृद्ध मातोश्रीनें तीं सर्व पानें कचरा स-

१ पृष्ठ १६९ आरती ९ यांत "जय जय जी आलख गुरु गोरख नाथा" असा उल्लेख आहे.

२ "यहि हरदमके उपर झमके गये गैबनाथ ज्योती." (पृष्ठ १३५ पद ७).

मजून चुलींत घालून जाळून टाकिली ! दुसरें कारण असें आहे कीं, सोहिरोबांचें राहणें एकाच ठिकाणीं नव्हतें. आपल्या घरीं ते थोडाच वेळ राहत; परंतु गोमांतकांत वगैरे ते फार फिरत असल्यामुळें त्यांची कविता ते जेथें जात तेथील लोक लिहून ठेवीत, यामुळें ती सर्वत्र पसरली गेली असल्याकारणानें एक ठिकाणीं मिळत नाहीं व ती कोठें कोठें आहे याचा शोध बरोबर लागत नाहीं. यामुळें ती नष्टप्रायच झाली आहे.

याप्रमाणें सोहिरोबांनीं कांहीं कालपर्यंत वाडीप्रांतीं वास करून पुढें उत्तरप्रदेशांतील प्रसिद्ध स्थळें व पुण्यक्षेत्रें पहावीं या हेतूनें त्या प्रांतीं जाण्याचा त्यांनीं विचार केला आणि बरोबर आपले दोघे मुलगे घेऊन आपल्या वयाच्या सुमारें ६० व्या वर्षीं ह्मणजे शके १६९६ च्या सुमारास उत्तरप्रांतीं जावयास निघाले. त्यावेळची त्यांची अशी कथा सांगतात कीं वैराग्य प्राप्त झाल्यानंतर सोहिरोबांचें मन प्रापंचिक उपाधींतून अगदींच उडालें होतें. त्यांची एक सून होती ती त्यांची प्रेमपुरःसर सेवा करीत असे. सोहिरोबा एकाएकीं जावयास निघाले तेव्हां घरांत जाऊन " आह्मी येतों " असें तिला ह्मणाले. त्यावेळीं तिला फार दुःख झालें. कारण यापूर्वीं सोहिरोबांस कधीं बाहेर जाणें असल्यास त्यांची घरांत कांहींच सांगण्याची वहिवाट नव्हती. वाटेल तेव्हां जावें व वाटेल तेव्हां परत यावें, असें त्यांचें वर्तन असे. असें असतां आजच "येतों" असें सांगतात तेव्हां हे आतां खचित परत येणार नाहींत असें तिला वाटून तिचा कंठ भरून आला, आणि "तुह्मी आतां जातां, पण माझी वाट काय ? मला कोणी त्राता नाहीं ! माझा एकुलता मुलगा मरणोन्मुख झाला आहे त्याची काय दशा ? " असें ह्मणून त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून रडूं लागली. तिला एक चार पांच वर्षांचा मुलगा होता. तो त्या संधीस रोगानें व्याप्त होऊन अगदीं आसन्नमृत्यु झाला होता. सोहिरोबांनीं हा कालपर्यंत या मुलास आंत जाऊन पाहिलें नव्हतें. नंतर त्या मुलाजवळ जाऊन परमेश्वराचा स्तव केला कीं, " देवा, आजपर्यंत तुझ्यापाशीं कांहीं मागितलें नव्हतें पण आज तुला संकट घालण्याचा प्रसंग आला आहे. तर या मुलास तूं बरें

कर." याप्रमाणें धांवा करून त्या मुलाच्या पाठीवरून वरदहस्त फिरवतांच तो अगदीं चांगला झाला. नंतर सुनेची समजूत करून व तिचा निरोप घेऊन सोहिरोबा उत्तरप्रांतीं जाण्यास निघाले.

याप्रमाणें सोहिरोबा उज्जनी, दिल्ली, प्रयाग, काशी वगैरे स्थळें पाहून सुमारें चारपांच वर्षांनीं ह्मणजे शके १७०१ चे सुमारास ग्वाल्हेर मुक्कामीं येऊन पोंचले. त्या वेळीं तेथील गादीवर प्रसिद्ध महादजी शिंदे हे होते. त्यांचे पदरीं गोमांतकांतील केरीगांवचे जिवाजी बल्लाळ (ह्यांस " जिवबा दादा " असें प्रसिद्ध नांव आहे) हे प्रतापी पुरुष सेनापती होते. शिंद्यांचे दरबारीं यांचें फार वजन असे. आपल्या गांवचे साधु कवि सोहिरोबा आपल्या नजरेस पडावे अशी इच्छा मनांत धरून जिवबा दादा त्यांचे भेटीस गेले व त्यांची अलौकिक वृत्ति पाहून फार आनंद पावते झाले. नंतर त्यांनीं त्यांस लागलेंच आपल्या घरीं सत्कारपूर्वक आणून ठेविलें. पुढें " जिवबा दादांच्या एथें कोणी साधु पुरुष आले आहेत व ते कविता करितात " असें महादजींस समजतांच त्यांनीं आपल्या दरबारीं सोहिरोबांस आणण्याविषयीं जिवबा दादांस सांगितलें. ह्यांच्याही मनांत सोहिरोबांची व शिंद्यांची भेट करून देऊन शिंद्यांकडून यांची संभावना करवावी असें होतें ह्मणून त्यांनीं सोहिरोबांस मोठ्या आग्रहानें शिंद्यांचे दरबारांत नेलें. जातांना वाटेंत त्यांस अशी सूचना केली कीं, " शिंदे हे कविताप्रिय आहेत आणि त्यांनीं स्वतांही कांहीं कविता केली आहे. तुह्मांस त्यांनीं ती दाखविली तर ती चांगली आहे असें ह्मणा." " चांगली असली तर चांगली ह्मणूं " असें सांगून ते दरबारांत गेले. शिंद्यानें विनयपूर्वक सामोरें येऊन त्यांना आसनावर नेऊन बसविलें. कांहीं इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर शिंद्यानें आपण रचलेल्या पदांची वही यांजला दाखविली. ती सर्व पाहिल्यावर " ही प्रासादिक नाहीं. सच्चिदानंद परमेश्वराच्या गुणवर्णनावांचून जी कविता ती आह्मांस आवडत नाहीं " असें ह्मणून वही खालीं ठेविली. त्यावरून शिंद्यांस फार राग आला असें पाहून सोहिरोबांनीं शिंद्याला उद्देशून " तुमच्या मर्जीप्रमाणें बोलून अर्थ साधून घेण्यासाठीं मी

आलों नाहीं. तुह्मांला दौलत पागा पिलखाने खिजमतगार कारखानें याप्रकारचें ऐश्वर्य परमेश्वरानें दिल्हें आहे, तसेंच आह्मांसही एका प्रकारचें ऐश्वर्य ईश्वरानें दिलें आहे " अशा अर्थाचें एक पद केलें व आणखी कांहीं पदांनीं शिष्यांस बोध केला, आणि दरबारांतून उठून घरीं गेले.

पुढें सोहिरोबा ग्वाल्हेरीहून निघून बरेच दिवस देशपर्यटन करून शेवटीं उज्जनीस येऊन मठ बांधून राहिले. तेथें त्यांचें वास्तव्य सुमारें १० वर्षे होतें, व तिकडे त्यांनीं शिष्यसमुदायही बराच मिळविला होता. पुढें शके १७११ चे सुमारास एके दिवशीं सोहिरोबा आपल्या शिष्यमंडळीस किंवा कोणासही न कळवितां जे मठांतून निघून कोणीकडे गेले ते पुनः परत आले नाहींत. शिष्यमंडळीनें पुष्कळ शोध केला परंतु कांहीं थांग लागला नाहीं. पुढें सोहिरोबा कोठें गेले व त्यांचें काय झालें हें अद्यापि कोणास कळलें नाहीं. सोहिरोबा मठांतून गेले त्यावेळीं त्यांचें वय सुमारें ७५।८० वर्षांचें होतें. पुढें त्यांचे दोघे मुलगेही उज्जनींतच मरण पावले. याप्रमाणें सोहिरोबांचा अंत झाला.

सोहिरोबांची कविता भारतभागवतादि कथानकांवर रचलेली नसून केवळ स्वानुभवयुक्त व परमार्थबोधक अशी स्वतंत्र आहे. यांची कविता पदलालित्य व अर्थगांभीर्य इत्यादि गुणांनीं फारच प्रशंसनीय आहे. या साधु पुरुषानें रचलेले मोठे ओवीबद्ध ग्रंथ पांच आहेत. ते हेः—(१) अक्षयबोध, (२) महदनुभवेश्वरी, (३) पूर्णाक्षरी, (४) अद्वयानंद, आणि (५) सिद्धांतसंहिता. यांशिवाय "चित्सुखानंद" या नांवाचा आणखी एक ग्रंथ आहे असें समजतें, परंतु तो अद्यापि आमच्या पाहण्यांत आला नाहीं. यांचीं पदें भक्तिपर, उपदेशपर व वेदांतपर अशीं अनेक आहेत. हीं एकाच ठिकाणीं मिळण्यासारखी नसून गोंवें प्रांतांत सर्वत्र व दुसऱ्याही दूरदूर प्रदेशीं पसरलेलीं आहेत. त्यांची संख्या अमुकच होईल हें जरी पू-

१ पृ० १३५ प० ५ पहावें.

२ या मठाची जागा अद्याप तिकडचे लोक दाखवितात.

र्णपणें सांगवत नाहीं तरी महाराष्ट्र भाषेंत व हिंदुस्थानी भाषेंत मिळून अजमासें संख्या ४००० होईल असें ह्मणतात. सोहिरोबा यांस गाण्याचें अंग उत्तम असल्यामुळें त्यांनीं सर्व पदें उत्तम रागरागिणीवर साधलीं आहेत. शिवाय सवाया, श्लोक, आरत्या, कटिबंध, अभंग इत्यादि अनेक छंदांवरही यांची पुष्कळ कविता आहे. देहाचे रचनेवर यांनीं एक उत्कृष्ट बखर रचिली आहे ती "सोहिरोबाची बखर" या नांवानें प्रसिद्ध आहे. वर सांगितलेल्या पांच ग्रंथांपैकीं पहिला "अक्षयबोध" हा ग्रंथ शके १६७१ या वर्षीं रचलेला आहे. यांत परमार्थसंबंधी उत्तम बोध केला आहे. यांत ८ प्रकरणें आहेत. पहिल्या प्रकरणांत समाधीराजयोग; दुसऱ्यांत अद्वैतयोग; तिसऱ्यांत वैराग्ययोग; चवथ्यांत ज्ञानयोग; पांचव्यांत सद्विवेकयोग; सहाव्यांत विवेकयोग; सातव्यांत बोधलक्षणयोग; आणि आठव्यांत मुक्तलक्षणयोग; याप्रमाणें विवरण केलें आहे. एकंदर ग्रंथसंख्या ४८० ओंव्या आहेत. दुसरा ग्रंथ "महदनुभवेश्वरी" हा शके १६७२ या वर्षीं रचिलेला आहे. हा वेदांतपर असून याचे १८ अध्याय आहेत. यांत एकंदर ९०२२ ओंव्या आहेत. तिसरा ग्रंथ "पूर्णाक्षरी" हा शके १६७३ या वर्षीं रचिलेला आहे. यांत सर्व साधूंचीं लक्षणें सांगितलीं आहेत. ग्रंथ ५०० ओंव्या आहेत. चवथा ग्रंथ "अद्वयानंद" हा शके १६७६ या वर्षीं रचिलेला आहे. हाही वेदांतपर असून याचीं १० प्रकरणें आहेत. ओंवीसंख्या सुमारें १००० आहे. पांचवा ग्रंथ "सिद्धांतसंहिता" हा शके १६७८ या वर्षीं रचिलेला आहे. यांत संहितेवर ओंवीबद्ध टीका केली आहे. याचे १८ अध्याय आहेत. ग्रंथांतील संहितेचे श्लोक खेरीज करून ओंव्यांची संख्या ४९४१ आहे. ही टीका रचण्यांत कवीनें आपल्या ज्ञानाची पूर्ण सीमा दाखविली आहे.

सोहिरोबा हे केवळ टाळकुटे साधु नव्हते. यांचें ज्ञान शुद्ध व वैराग्य कडकडीत होतें. तशीच यांची वृत्ति उदासीन, निस्पृही, निरिच्छ निरभिमानी व नेहमी ब्रह्मानंदांत निमग्न अशी असे. हे समाधि लावून बसले असतां तीन तीन चार चार दिवसपर्यंत एकसारखे बसत असत असें सांगतात. हे केवळ निराकार परब्रह्मस्वरूपी ईश्वरास

भजत व यांचे उद्गारही सर्वत्र याचप्रकारचे आहेत; तरी त्यांनीं शिव, राम, कृष्ण, विठ्ठल इत्यादि अवतारविशिष्ट देवांविषयींही आपला भक्तिभाव जागोजाग प्रकट केला आहे. हे पूर्ण वेदांती होते. साधुत्वाचीं जीं लक्षणें तीं यांच्यामध्यें पूर्णपणें वसत होतीं.

सोहिरोबांची कविता करण्याची शैली कशी आहे हें पुढील संग्रहांतील कवितेवरून दिसून येईलच. परंतु एखाद्या विषयाचें पूर्ण स्वरूप श्रोत्यांच्या मनांत भरवून देण्याची यांची हतोटी उत्तम होती हें पुढें लिहिलेल्या यांच्या इतर ग्रंथांतील वेंच्यांवरून वाचकांच्या लक्षांत येईल. ईश्वराचें स्वरूप यांनीं एका ठिकाणीं असें वर्णिलें आहे:—

घटीं व्यापिजे आकाश । आणि घट पावलिया नाश ।
उरलाचि असे अवकाश । जया परी ॥ १ ॥
शिउनी सोंवळा पवन । पोळूनी गुप्त हुताशन ।
तेवीं सर्व निरशनीं निदान । उरे जो कां ॥ २ ॥
सर्व सेवितां न भरे रसना । सर्व श्रवणीं शून्य श्रवणा ।
सर्व देखत अंधत्व नयना । होय जेथें ॥ ३ ॥
स्पर्श करितां निर्जिवां । उपरमेचि अनुभवा ।
चरण घेती माघोवा । प्रतिबिंब वाटे ॥ ४ ॥
उत्पत्तीचा हर्ष नाहीं । उद्वेग नुपजे प्रळयीं कांहीं ।
गर्जत असतां अचळ पाहीं । समुद्र जैसा ॥ ५ ॥
कठिणत्व दाउनी शीतळ । उदक जैसें निर्मळ ।
कीं न हाले जेवीं भूमंडळ । भूतोत्पातीं ॥ ६ ॥
जें अवयवाविण स्वरूप । कीं वातीविहित दीप ।
अतींद्रियें निष्कंप । परब्रह्म ॥ ७ ॥
आकार झालेया न होय । आकार लोपतां न जाय ।
अविनाशपणें नित्य आहे । ते गा वस्त ॥ ८ ॥
जेथ पाहतें पाहणें मावळलें । गगन सर्वांगीं गाळिलें ।
नाशिवंत ह्मणोनी वाळिलें । दिसतें दृश्य ॥ ९ ॥
तेवीं सर्वकाळीं जें आहे । तेंचि निरंजन पाहें ।
दृश्य दृष्टीस दिसेना हें । तेंचि जाण ॥ १० ॥

जयासि नाहीं आदि अंत । तेंचि निरामय सिद्धांत ।
स्वानुभवें साद्यंत । जाण ऐसें ॥ ११ ॥
जेथ पैं पंचभूतें नाहीं । गुणत्रयलेश कांहीं ।
तें पद परात्पर पाहीं । अर्थेंविण ॥ १२ ॥
क्षुधा नाशिवंत सेवी । ते रसना घेतसे चवी ।
ते चवीची चवी बरवी । घेतसे जो कां ॥ १३ ॥
हें नित्य तृप्ताचें लक्षण । निरुपचारें तृष्ण जाण ।
स्वसंवेद्य संतुष्टपण । निरंतर ॥ १४ ॥
अविद्येचा आवर्त । जेथ न बाधे विवर्त ।
सुटे जेथ पैं सांगात । गुणत्रयांचा ॥ १५ ॥
तें जाणावें निर्गुण । जेथ कुंठलें वेदवर्णन ।
ते स्वयें जाणती खुण । योगेश्वर ॥ १६ ॥
आदी अंतीं जागृतीं आहे । स्वप्न भासलें वांया जाये ।
विश्वाअंतीं अंतीं राहे । अविनाश जें ॥ १७ ॥
अनंतरूपी अनंत कळा । अनंत भजनें अनंत लीळा ।
जयाचिया मुळीं निराळा । द्रष्टा जो कां ॥ १८ ॥
ऐसा जो कां परमेश्वर । परात्पर गुरु दिगंबर ।
स्वयंप्रकाशें अंबर । व्यापुनी आहे ॥ १९ ॥
जया तेजाचिया दीप्तीं । चंद्र सूर्य हारपती ।
विश्व हारोनि ज्ञप्ती । उरे जो कां ॥ २० ॥
ऐसें जें कां शाश्वत । अव्यय पद सदोदित ।
नकळे मन बुद्धिस मात । तेथील पैं[१] ॥ २१ ॥

सिद्धांतसंहिता. - अध्याय १.

---

१ आणखी याच संग्रहांतील पृष्ठ २ पद २, पृ० ४ प० ७-८, पृ० ६ प० १२-१३, पृ० ७ प० १४-१७, पृ० १० प० २३, पृ० १५ प० ३४, पृ० १६ प० ३७-३८, पृ० १७ प० ३९, पृ० १८ प० ४१-४३, पृ० ३० प० ७३, पृ० ३८ प० १६, पृ० ४५ प० १२६-१२८, पृ० ४८ प० १४१, पृ० ५६ प० १८ हीं व तशींच दुसरींहीं पदें पहावीं.

आणखी एके ठिकाणीं ईश्वरस्वरूपाचें वर्णन असें आहे:—

जो प्रणवाविरहित । परात्पर पुरुष शाश्वत ।
सतत जयातें वर्णित । निगम पैं तो ॥ १४१ ॥
जो पतीतातें करी पावन । केवळ उद्धरीजे दीन ।
जयालागीं तनुमन । वोपिती भक्त ॥ १४२ ॥
जो महर्षि देवांचिया आर्धी । जेथ हारपे मन बुद्धि ।
जाण तें पैं त्रिशुद्धि । परब्रह्म ॥ १४३ ॥
जें पंच महाभूतां । अतीत गुणा समस्तां ।
आत्मस्वरूप तत्वतां । जाण ऐसें ॥ १४४ ॥
जें हृदयीं असोनि पैं न दिसे । दृश्य द्रष्ट्या दर्शन असे ।
इंद्रियवर्ग उमसे । जयाचेनि ॥ १४५ ॥
जेथ संकेतेंचि जाणणें । जाणतांचि येतें पैं नेणणें ।
योगियांचें समजणें । ऐसें असे ॥ १४६ ॥
जो चहुं वाचा चेतविता । भगवंत जो कां नियंता ।
तयातें अनुभविता । लाभ आथी ॥ १४७ ॥
सर्व सुकृतें एकवटती । निष्कामभावें बिनटती ।
तरीच मनातें भेटती । वैराग्यदशा ॥ १४८ ॥
वैराग्यें ब्रह्मींचि लागे चवी । मग ब्रह्मभुवनीं पावे पदवी ।
स्वयें स्वानुभवी । होय ऐसा ॥ १४९ ॥

सिद्धांतसंहिता. अध्याय १८.

दुसरे एके ठिकाणीं परब्रह्मस्वरूपाचें असें वर्णन आहे:—

दृष्टीसी फुटला फांटा । तेथ आदिअंताचा एकवटा ।
तेथ मृत्तिका जैसी घटा- । माजी दिसे ॥ ९९ ॥
तैसें ब्रह्मचि आघवें देखिलें । सर्वभूतीं समरसलें ।
जैसें सोनेंच तें मिरवलें । अलंकारीं ॥ १०० ॥
कीं व्यसनीं व्यापिला तंतू । तैसा सर्वांभूतीं भगवंतू ।
कीं बीज वृक्षा हेतु । एकाचि जैसें ॥ १०१ ॥
घटमठीं व्यापिलें गगन । तैसें सर्वघटीं चैतन्य ।
कीं संकल्पेंचि जैसें मन । रूपा आलें ॥ १०२ ॥

कीं जागृतींचि झालें स्वप्न । होतां विस्मृति आगमन ।
कीं इच्छेनेंचि गमन । भूतमात्रीं ॥ १०३ ॥
कीं पदार्थचि मानी क्षुधा । प्रबळ झालिया क्षुधा ।
कीं दुराग्रहचि क्रोधा । कारण करी ॥ १०४ ॥
तैसें चैतन्यचि निश्चयपणें । चराचरीं करी पारणें ।
तें उत्तम पडलिया होणें । आपणचि पैं ॥ १०९ ॥

खऱ्या साधूचीं लक्षणें कशीं असतात याविषयीं यांनीं एका कार्णी असें लिहिलें आहेः—

ऐक शिष्या सावधु । ओळखावे कैसे साधु ।
तये प्रतीतीचा ह्रदयसिंधु । मिरवे कैसा ॥ १ ॥
वाढतां उल्हासाचें अंग । कीं जगची भासलें तरंग ।
उठल्या फुटल्या वियोग । नये तोचि साधु ॥ २ ॥
टाकुनि देहाचा वृक्ष । कवळुनि स्वसाक्षीचे पक्ष ।
उडतोचि अलक्ष । तोचि साधु ॥ ३ ॥
पाहोनि पृथ्वीचा तळवट । तोचि गगनाचा शेवट ।
चंचळ पवनाचा आट । तोचि साधु ॥ ४ ॥
विरालेपण नायके कार्नीं । कीं असलेपण न देखे लोचनीं ।
कल्पनेंचिया मोचनीं । असे तोचि साधु ॥ ५ ॥
नेणे कवणाचाचि त्याग । कीं हा न ह्मणेचि भोग ।
अखंड भोगी राजयोग । तोचि साधु ॥ ६ ॥
बोलोनि असे मौन्यी । निवास करितसे शून्यीं ।
आलिंगोनि चैतन्यीं । राहे तोचि साधु ॥ ७ ॥
चालतां प्रवृत्तिप्रवाह । आणि न पडे जयास देह ।
जाण परब्रह्म विदेह । तोचि साधु ॥ ८ ॥
मनाचें मुद्दल मुरे । संशयाचें वीख उतरे ।
मग अविटपणें उरे । तोचि साधु ॥ ९ ॥
संकल्प संनिपात जाय । मुद्दल तोचि तो आहे ।

दृश्य पटल हारोनि सरे । मग निखिल एकसरांचि उरे ।
आकाशचि निर्धार धरे । तोचि साधु ॥ ११ ॥
पडतांचि सूर्याचा उजाळ । उद्बोध उदयो केवळ ।
विकाशे हृदयकमळ । तोचि साधु ॥ १२ ॥
ऐसा आपणापें वंजे । विलय घेईजे सोहंबीजें ।
सदा स्वयंभ निजे । तोचि साधु ॥ १३ ॥

पूर्णाक्षरी. अध्याय १.

मनुष्यानें जन्मास येऊन काय केलें पाहिजे याविषयीं यांनीं एका ठिकाणीं असें ह्मटलें आहेः—

हाचि मनुष्ययोनीचा स्वधर्म । हृदयीं जाणावा पुरुषोत्तम ।
अव्यय सुखाचें धाम । भोगिजे नित्य ॥ ९२१ ॥
चराचराचे ठायीं । भगवंत हारपला नाहीं ।
कीं प्रत्यक्ष दिसतो कांहीं । ऐसेंहि नसे ॥ ९२२ ॥
ऐसियासि पैं जाणावा । आत्मप्रतीती आणावा ।
जाणोनियां नेणावा । सर्वांपरी ॥ ९२३ ॥
सांडूनियां सकळ व्यक्त । सत्ताचि पाहावी अव्यक्त ।
जें प्रगट असोनियां गुप्त । सर्वत्र पैं ॥ ९२४ ॥
ऐसें समाधान सर्वोपरी । नित्य पाहणें अंतरीं ।
लय लावावें अंबरीं । ध्यानबळें ॥ ९२५ ॥

याचप्रमाणें सोहिरोबांनीं जेथें जेथें मनुष्यांस उपदेश केलेला आहे तेथें तेथें तो केवळ कडकडीत व स्पष्ट असा केला आहे. परंतु त्यांचे उतारे घेतल्यास फार विस्तार होईल ह्मणून तसें करीत नाहीं.

सोहिरोबांच्या कवितेची भाषा मराठी तर खरी पण तिच्यांत मालवण, वेंगुर्लें, गोंवें येथील भाषेंतल्या शब्दांची बरीच भेसळ झाली

१ याशिवाय या संग्रहांतील पृ० ७४ प० ६६, पृ० ७५ प० ६८-६९, पृ० ७७ प० ७५ इत्यादि पहावीं.

२ आणखी पृ० ६८ प० ४८ पहावें.

३ पुढील संग्रहांतील उपदेशपर पदें पहावीं.

आहे. यामुळें बहुतेक ठिकाणीं साधारण वाचकांस मुळींच अर्थ समजत नाहीं. शिवाय ज्या लेखी प्रती आह्मांस उपलब्ध झाल्या होत्या व जीं पदें वृद्ध पुरुषांच्या तोंडून ऐकिलीं होतीं तीं फारच अशुद्ध होती. तीं मोठ्या प्रयासानें अर्थानुरोधानें शुद्ध करून छापिलीं आहेत, परंतु पुष्कळ ठिकाणीं बरेंच दुर्बोधत्व राहिलें हेंही येथें सांगणें अवश्य आहे.

आतां ही प्रस्तावना संपविण्यापूर्वी एथें एका गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य आहे. ती ही कीं, हीं पदें छापण्यास ज्या वेळीं आह्मी सुरवात केली त्या वेळीं कित्येक मित्रांचें असें ह्मणणें होतें कीं पदांच्या चाली व राग प्रत्येक पदाच्या आरंभीं द्यावे. परंतु जो कोणी गाणारा असेल तो एक पद हव्या त्या चालींत व हव्या त्या रागांत गाऊं शकेल व ज्यास मुळींच गाण्याचें ज्ञान नाहीं त्यास चाली व राग सांगितले तरी ह्मणतां येणार नाहीं. शिवाय आह्मांसही सर्व पदांच्या चाली माहित नाहींत व कोणी सांगणारा भेटला नाहीं ह्मणून आह्मीं त्या भानगडींत पडलों नाहीं.

सरतेशेवटीं ज्या सच्चिदानंद परमेश्वरानें आमच्या हातून या साधुवर्याच्या उक्तींचा जीर्णोद्धार करविण्याचा योग आणिला त्याचे उपकार स्मरून, आणि पुढेंही अशीच साधुसेवा करण्यास आह्मांस इच्छा व सामर्थ्य द्यावें अशी त्याची अनन्यभावें प्रार्थना करून, हा अल्प लेख संपवितों.

---

१ वर सांगितलेंच आहे कीं सोहिरोबांची बहुतेक कविता त्यांच्या बहिणीनें लिहिलेली आहे. त्या बाईस शुद्धाशुद्धाचें ज्ञान नसल्यामुळें तिनें जसे शब्द कानावर पडतील तसे लिहून ठेविले आहेत. यामुळें पुष्कळ ठिकाणीं अर्थदुर्बोधत्व राहिलें आहे. याचा दोष त्या कवीला किंवा त्या बाईला बिलकुल देतां येत नाहीं. त्या बाईनें इतका हा संग्रह लिहून ठेविला हे तरी तिचे मोठे उपकारच समजावयाचे. आम्हांला मिळालेल्या वह्याही तिच्याच हातच्या होत्या.

विषयानुक्रम.

पदसंग्रह.

१. भक्तिपर पदें.

पद १.

पतीतपावन दीनदयाघन करुणाकर देवा। श्रवणमनननिजध्यासें निरंतर घडो तुझी सेवा ॥ ध्रु० ॥ परमप्रकाशक तेजोमय हें गुप्त तुझें स्वरुप। परतुनि दृष्टी पाहणें पाहतां निर्गुण हें अरुप। परमार्थ परिपूर्ण साधन भरलें हें अमुप। परात्पर तूं अंतरसाक्षी हृदयभुवनदीप ॥ पतीत० ॥ १ ॥ तीन्ही संधी साधुनि येणें सुख हें एकांती। तीन्ही गुण हे निरसुनि शून्यीं उगवलि हे ज्योती। तीक्ष्णज्ञानें पुरतें पाहतां कुळ नाहीं याती। तीतुकी प्रचीत बाणलिया मग दिवस नाहीं राती ॥ पतीत० ॥ २ ॥ तलगत तलगत सकळहि जिव हे चितिंसिधूआंत। तरंग जैसे उमटत भासत नासत हे बहुत। तरणोपाया सांगति साधू मत हें सिद्धांत। तरले येणें मार्गें बहुत देही देहातीत ॥ पतीत० ॥ ३ ॥ पान्हा पिउनि प्रेमकळेचा हरिलें संकल्पा। पाहतां परंपरेनें भवभय दोरीच्या सापा। पारंगत हें करुनि सकळहि आयुष्य हें कापा। पारख करितां तटस्थ जाहली नेत्रांची मलपा ॥ पतीत० ॥ ४ ॥ वरिली शांती आंगीं जाहला

---

१. या पदांतील प्रथमारंभींच्या "पतीतपावन" या सहा अक्षरांवर प्रत्येक अक्षरीं एक चरण याप्रमाणें अनुक्रमें सहा कडवीं साधिलीं आहेत. तसेंच प्रत्येक चरणाचें पहिलें व शेवटचें हीं दोन्ही अक्षरें एकच साधिलीं आहेत.

पूर्ण अनुभव । वरदवळें सद्गुरुप्रसादें अक्षय वैभव । वरिले मायिक कवणाचाही नाहीं भय भव । वदली वाणी मौन्यपणीं हे रूप नाहीं नांव ॥ पतीत० ॥ ५ ॥ नम्र होउनी वृत्ति लागली अलक्ष हें लग्न । नटत नटत हे लोक सकळिक होउनियां मग्न । नख नलगे जेथ देहबुद्धिचें विकासलें गगन । नमुनि सोहिरा ह्मणेचि अवघा अलखनिरंजन ॥ पतीत० ॥ ६ ॥

पद २.

वंदियला भगवंत । तो म्यां वंदियला भगवंत ॥ ध्रु० ॥ भवसिंधुतारक, निजसुखकारक । सकळां आदिअंत ॥ तो म्यां० ॥ १ ॥ सज्जनरंजन, अखिलनिरंजन । भक्तजनां कृपावंत ॥ तो म्यां० ॥ २ ॥ वेद झाले मुके, शेष न स्तवूं शके । ज्याचें रूप अनंत ॥ तो म्यां० ॥ ३ ॥ नव्हे नरनारी, गैबी सूत्रधारी । हालवि जो जिवजंत ॥ तो म्यां० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा, अनुभवीं पाहणें । चित्सुखवनवसंत ॥ तो म्यां० ॥ ५ ॥

पद ३.

तुजविणरे भगवान् । कोठेंचि मन हें न जडो ॥ ध्रु० ॥ मिथ्या ऐसें दिसोनि सकळिक, विषयसूख नावडो । प्रारब्धास्तव जें जेसमयीं, घडेल तें सुखि घडो ॥ तुज० ॥ १ ॥ योगलक्षण निजधैर्यबळें जीव, मोहांत न सांपडो । आयुष्य सरल्यावर मग केव्हां देह, पडेल तेथें पडो ॥ तुज० ॥ २ ॥ वैराग्यज्ञानी प्रचंड होऊनि, अखंडित वाक्य कडकडो ॥ प्रपंचरहाटीं वर्तत असतां, कोणिकडे न अडो ॥ तुज० ॥३॥ ह्मणे सोहिरा विपरित बुद्धी, कुसंग हा विघडो । निमिष साधुनी केवळ ब्रह्मींचें मोक्षद्वार उघडो ॥ तुज० ॥ ४ ॥

पद ४.

मजवरी तूं कृपा करीं । हरि देवरायारे ॥ ध्रु० ॥ प्रपंच जडला कधींच न सुटे, यावरि सहसा मन हें न विटे । मिथ्या

गेलि याची नाहीं शुद्धि, जया ठाया ॥ ऐशी० ॥ २ ॥ कोण्या ठाया कोण गेलें, कोणा काय भेटलें । अवचटेंचि काय जाहालें, उमजेना जया ॥ ऐशी० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे निरामया, झालिच नाहीं हे काया । मिठी पडोनि तन्मयासी, मिनला चिन्मया ॥ ऐशी० ॥ ४ ॥

पद ७.

भगवान्‌जी हा करिल तें सुखि करू । अनंतकोटीब्रह्मांडनायक सदैव हाचि स्मरूं ॥ ध्रु० ॥ अंतरसाक्ष असोनी न दिसे, अनादि हा ईश्वरू । स्थावरजंगम व्यापुनि उरला, अपार विश्वंभरू ॥ भग० ॥ १ ॥ आचार धरोनि साचार भावें, विचारणा विवरूं । दुरित निवारिल हाचि निश्चय, मनीं दृढ धरूं ॥भग०॥ २ ॥ कोठें तरी वावरूं परि हें, शेवट मन आवरूं । कर्मभोग आणि ज्ञानयोग हा, समतुल्यचि सांवरूं ॥भग०॥ ३ ॥ ब्रह्मार्पण हें सर्वहि करुनी, अहंकृती परिहरूं । अलक्षभुवनीं लाउनि लय हें, आनंदें काळ हरूं ॥ भग० ॥ ४ ॥ प्रपंचरचना देखुनी कधींची, नयन न वावरूं । ह्मणे सोहिरा केवळ जीव हा, जिताची असतां मरूं ॥ भग० ॥ ५ ॥

पद ८.

मग्न हें होउंदे मन त्या देवाचे स्मरणीं हो ॥ ध्रु० ॥ देह बाहुलें देहीं दिसे, सूत्रधारी न दिसे हो । नसेचि ह्मणों तरि सर्व प्रकाश हा, ज्याची उमगेना अगम्य करणी हो ॥ मग्न०॥१॥ शेष स्वरूप हें वेष जयाचा, कांहीं नसे लेश जयाचा हो । ज्याणें वाहविलि मस्तकीं धरणी हो ॥मग्न०॥ २ ॥ मर्यादेनें हा सागर, न लंघती गिरिवर, वर्षत व्योमी हो । आज्ञेनें जलधर अंतरिक्ष चालत तरणी हो ॥ मग्न० ॥ ३ ॥ अर्चन वंदन आत्मनिवेदन, योगाभ्यास कांहीं गुरु हो । सेवा साधन आराधन शुद्ध आचरणीं

हो ॥ मग्न० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे मुक्ति तूं पावसी, जेथ जासी तेथ पूज्य मान होसी हो । न पडसी जन्ममरणीं हो ॥ मग्न० ॥५॥

पद ९.

संकट भगवान् निवारी ॥ ध्रु० ॥ घडी घडी पल हरिस्मरण करितां, भवसागर हा तारी । समर्थ स्वामी उदार दाता, भक्तजनां कैवारी ॥ संकट०॥ १ ॥ गगनाहुनी जो सूक्ष्म ब्रह्म हा, अनादी नट विहारी । लीलाविग्रही अनंतरूपी जो, पुरुष नव्हे हे नारी ॥ संकट० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा भरणपोषणचिंता, पडों नेदि हे भारी । पुनरपि न घाली गर्भवासीं, जीवासी या संसारीं ॥ संकट० ॥ ३ ॥

पद १०.

लय लागलें आत्मारामीं । जाइला आनंद अंतर्यामीं । वद्ध मारिला अहंकार हरामी ॥ ध्रु० ॥ कर्म केलें कीं परिहारा मी, युक्त केलें कीं हा विरामी । श्वासोश्वास प्यालों वारा मी ॥ लय० ॥१॥ कधीं न साहेंच विकारा मी, कांहीं न घेचि कल्पना घेरा मी । नानायोनीचा न फिरें फेरा मी ॥लय०॥ २ ॥ वासना हे न ठेवीं उदारा मी, लुब्ध होईना घरदारा मी । मनीं लक्षिला मोक्ष उदारा मी । शरण आलों दिनोद्धारा मी॥लय०॥३॥ कधीं लिंपेंना संसारकेरा मी, यमधर्माच्या नाटोपें वैरा मी । गोष्टी सांगेन तिन तेरा मी, भगवानाचा होइन प्यारा मी ॥लय०॥४॥ विपरित रिती इंद्रियग्रामीं, यांचा नायकेंच कधीं आग्रह मी । कधीं न जाय निंदानगरा मी, दशवे द्वारींच्या राहिलों अग्रा मीं ॥ लय० ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे या यंत्रा मी, देखियला किं बहु यंत्रा मी । विसरेना विवेकमंत्रा मी, उगी पाहतों जीवयंत्रा मी ॥ लय० ॥ ६ ॥

पद ११.

भगवान्‌जी निदान। जो नर भजनपुजन न करित रीति-वीण वर्ततसे नादान ॥ ध्रु० ॥ हित विहित कांहीं कधींच न कळे, बद्ध विषयबाधान। समाधान कधीं न होय ज्याला, विचविला वादान ॥ भग० ॥ १ ॥ अकट विकट हे निकट बोलत, वळकट जो सादान। संकोच होतसे ज्ञानउदयीं जेवीं, जंबुक भर चांदान ॥ भग० ॥ २ ॥ निरहंकृतिनें ईश्वरीं न करी, चित्त वित्त जीवित हें दान। वणवण हिंडत दिवस-भरीही, स्वअर्थसाधनान ॥ भग० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा जन्मवरि असे, जिवित्व आबादान। मन हा भुजंग खुलेना डुलेना, अनाहत नादान ॥ भग० ॥ ४ ॥

पद १२.

सांपडला आजि देव भला। मला आनंद जाहला पूर्ण ॥ ध्रु० ॥ व्यक्त ना वर्ण, तटस्थ कर्ण, वाहिलें अंतःकर्ण ॥१॥ चहुं वाचा गुज, स्वरूप सहज, अनादी बीज ॥ २ ॥ जाहला हर्ष, त्वचेवीण स्पर्श, इंद्रियानाही दर्श ॥ ३ ॥ मीपणा तुटी, पडली मिठी, आजी विरक्ती वाढली मोठी ॥ ४ ॥ न लाविता अग्न, देह हें भग्न, सोहिरा ह्मणे झालों मग्न ॥ ५ ॥

पद १३.

झालों समाधान आज जेथ मीं ॥ ध्रु० ॥ विश्व चालवितो हा, व्यापक गुप्त पहा ॥ १ ॥ सकळ मायेचें व्याप्त, यांत जो अलिप्त ॥ २ ॥ नाहीं मन जन, अलख निरंजन ॥ ३ ॥ नाहीं रूप रेख, गगनासारिखा देख ॥ ४ ॥ गगन ह्मणो तया, जाणिव जाय लया ॥५॥ अवधूत हा नागा, ज्याची सत्ता जागा ॥ ६ ॥ किती झांकुं डोळे, प्रत्यक्ष देह चळे ॥ ७ ॥ देह पावेल नाश, सोहिरा ह्मणे अविनाश ॥ ८ ॥

पद १४.

मोहिलें आजी मनची तेणें हो ॥ ध्रु० ॥ कळोनी कळतें, मी-पण गळतें । विश्व चळतें ज्याणें हो ॥ १ ॥ नाहीं रूप रेख, गुप्त व्यापक देख । ऐसा कवण म्यां नेणें हो ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे देह, गमलें निःसंदेह । जैसें वाटेचें येणें हो ॥ ३ ॥

पद १५.

तुझी दया हो देवा ॥ ध्रु० ॥ लटिकी केली काया, निरसली हे माया, मन गेलें विलया, तुजशीं चिन्मय निरामया ॥ १ ॥ काया बेगडिची बाहुली, गमली अभ्रींची साहुली, ऐसी अविनाश माउली ॥ २ ॥ जग बुद्बुदनिरा, वितराग वैरागरा, सोहिरा ह्मणे अजरामरा ॥ ३ ॥

पद १६.

दयाघनाचें रूप कीं हें । रूपाविण अरूप कीं हें ॥ ध्रु० ॥ भोजनाविण पोट भरतें । नादाविण कान निवती ॥१॥ वाचा निमोनी निघती गोष्टी । रूपाविण संतुष्ट दृष्टी ॥ २ ॥ सत्ता देखोनि व्यापक गुप्त । अखंड आनंदीं मन हें तृप्त ॥३॥ चैतन्य प्याला पिऊं जाय । रसनेचा हा रसची होय ॥ ४ ॥ सोहिरा

पद १८.

वासना हे विषयांची बुडविल आह्मां । यास्तव तुझें स्मरण करावें सदैव परब्रह्मा ॥ ध्रु० ॥ पदार्थ सर्वहि अनुकुळ झाल्या गर्वा चढविल आम्हां । काळें करुनि प्रतिकुळ झाल्या फुकट रडविल आह्मां ॥ वासना० ॥ १ ॥ कोठिल कोण मी पाहूं जातां मध्येंचि अडविल आह्मां । जन्म मरण हें दुर्घट गर्भीं अखंड पाडिल आह्मां ॥ वासना० ॥ २ ॥ मृगजळवत् संसार यांतिल सुखदुःख घडविल आम्हां । घडि घडि तजविज करितां चिंतेखालिंच सडविल आह्मां ॥ वासना० ॥ ३ ॥ दृष्टी पडल्या दृश्य भास हा मोह कीं जडविल आह्मां । देहीं असुनी सर्वप्रकाशक आत्मा दडविल आह्मां ॥ वासना० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा त्रिविध तापीं अखंड कढविल आम्हां । मोक्ष पदाचा मार्ग निरोधुनि आंतचि तुडविल आह्मां ॥ वासना० ॥ ५ ॥

पद १९.

कृपाळु हा भगवंत निजभक्तांचा कैवारी ॥ ध्रु० ॥ जें कां भक्तिबिजाचें क्षेत्र । प्राणी पुण्यश्लोक पवित्र । त्याला प्रसन्न हा चिन्मात्र । विश्वचित्राचा चितारी ॥ १ ॥ ज्यांची सत्ता नवही द्वारीं । हालवी मनपवनाची दोरी । ना तो पुरुष ना ते नारी । ऐसा गैबी सूत्रधारी ॥ २ ॥ जो जवळचि परी दूरीं । पाहतां जिवाचिया भितरी । संकटसमयीं स्वरुपें धरीं । नाना नटनाटकअवतारी ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे दसवे द्वारीं । अनाहत नोबतकी मतवारी । केवळ धरोनियां इतबारीं । राहिलों ज्याचिये दरबारीं ॥ ४ ॥

पद २०.

अखंड भगवद्भजन करी तोचि येथें धन्य ॥ ध्रु० ॥ गगन व्यापक जैसें । जयाचें मनचि झालें तैसें । जयानें पाहिलें येक-

ची ऐसें । सर्वघटीं चैतन्य ॥ १ ॥ ज्याला वेद म्हणती नेति । तें काय मिळेल वाचल्या पोथी । येथ न चले आपुली मती । ऐसें समजुनी चित्तीं उगेंचि घेतलें मौन्य ॥ २ ॥ स्वप्नीं जें जें दिसे । तें तें जागृतिला नाशे । तैसें जगदारूप आभासे । ऐसें बाणलें प्रतीति नित्य निरंजन शून्य ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा ब्रह्मरसायण प्याला । प्याला जन हें निंदो वंदो देहाला । आपण सोडुनियां मोहाला । झाला भगवंतासि मान्य ॥ ४ ॥

पद २१.

भगवान् भवार्णव तारी । अनन्यगति शरणागतवत्सल भक्तजनां कैवारी ॥ ध्रु० ॥ पुण्यश्लोक जे धर्मपरायण संस्थापन जो करी । दुष्ट दानव मारी तो हा युगायुगीं अवतारी ॥ १ ॥ काया माया नयेचि आया निर्गुण पाया जाचा । सर्व खेळ हा त्याचा विश्व हें विचित्र चित्र चितारी ॥ २ ॥ परम प्रीति आभारी संस्तुत संभव हा संभारी । ब्रह्मांड उभारी ब्रह्माहरिहरसुरनरउरगां भारी ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा पतितपावन दीनदयाघन गुप्त गहन आकारी । सज्जनजनमनमोहन हा जगजीवन दीनोद्धारी ॥ ४ ॥

पद २२.

भगवंत निजभक्तजनांचा कैवारी । भवसिंधुतारी । पारावत कीं हें चंचळ मन पण मारी । नौके जन उतारी ॥ ध्रु० ॥ निरंजनीं निकट हें लक्ष लाहें । परतुनि पाहें । सकळहि व्यापक साक्षी तोचि आहे । निर्विकार राहें ॥ १ ॥ जो कां परमानंदाला मिळवी । मीं कोण कळवीं । प्रथमचि प्रीति देहबुद्धीला पळवी । अभिमान गळवी ॥ २ ॥ बाळ उन्मत्त पिशाचवृत्ति । पिंडी आवृत्ति । ज्ञानावांचुनि नकळे स्वरूप स्थिति । देतो विदेहमुक्ति ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे इच्छिलें फलदेता । हा दुर्लभ दाता । त्रिभुवनपती हा येकचि अवघा पाहतां । सुख वाटे गातां ॥ ४ ॥

पद २३.

लागलें प्रेम हो तयाचें । निर्गुण निरंजन निरामयाचें । विश्व हें लाघव ज्याचिये सत्तेचें ॥ ध्रु० ॥ दिसे हा तितुका मायेचाचि खेळ । न दिसे तेंची स्वरूप निर्मळ । आनंद सत्ता प्रकाश प्रबळ । केवळ जग बुद्बुदाचें जळ ॥ १ ॥ सुखाच्या आंगीं हारपल्या गोष्टी । पाहुं जातां पुंजाळली दृष्टी । मेघाविण होतसे हे वृष्टी । ज्याचिये पोटीं मावळली सृष्टी ॥ २ ॥ आकारा आलें दिसतें तें हें सामान्य । बोला आधीं आलें कीं हें मौन्य । अधऊर्ध्व मावळलें शून्य । सर्वत्र येक व्यापक चैतन्य ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे झालों म्यां आराम । आंगचि झालें जग अभ्र व्योम । इच्छेविण झालों पूर्णकाम । अक्षय दयार्णव आत्माराम ॥ ४ ॥

पद २४.

भगवान्जी तुजविणें क्षणभरी आनची ना मी । जनीं जनार्दन समान देखें प्रत्यक्ष हा नयना मी ॥ ध्रु० ॥ नाशुनि पंचभूत सेना मी । कवणची वागवणें भय ना मी । पळ एक पडों नेदी चैना मी । मग हे भोगणें ना दैना मी ॥ १ ॥ विषम बुद्धी धरींना मी । जगीं या कोणाचाचि अरी ना मी । सप्रेम भरीत हरीनामीं । पुनती जन्म पडे तें करींना मी ॥ २ ॥ विपरित करीं वमना मी । दृढतर निग्रह करीं कीं मना मी । आकाशीं करीं गमना मी । न पडें कर्मदोषदमना मी ॥ ३ ॥ शरण या भवभंजना मी । मुनिजनरंजना मी । ह्मणे सोहिरा निरंजना मी । ऐसें करीं तूं स्वामी ॥ ४ ॥

पद २५.

लय हें भगवंतीं जरी लाय । मग हा प्रपंच केला तरी काय ॥ ध्रु० ॥ जैसी अभ्रींची हे छाया । कीं हे जाण नटाची जा-

या । अथवा केवळ मृगजळ माया । तैसी वाटत ज्याला काया । अवघें दिसतें हें मिथ्या होय ॥ १ ॥ देह बुद्धी येतां भ्रांती । हृदयीं न धरे होती वांती । कोण मी आहें आधीं अंतीं । हें-ची अखंड पाहत जाय ॥ २ ॥ जैसे जाण सतीचे भोग । तैसें वर वर दिसतें सोंग । अंतरीं जिवाशिवाला योग । नासुनि गेला हा भवरोग । मोह हा मनचाचि मनीं खाय ॥ ३ ॥ नयनीं नयेचि दृश्य भास । समूळ तुटला आशापाश । समग्र विकासलें आकाश । चंद्रसूर्याविण प्रकाश । चित्त हें महाशून्यें स्थीर होय ॥ ४ ॥ ज्याला प्रसन्न हा गुरुराय । जो कां कधीं न सोडी पाय । निरंतर तन मन धन हें वाय । ज्याला चुकले भव-रणघाय । जो कां निखनिरंजनिं धाय । विपरित गेले सर्व अपाय । हाता आला तरणोपाय । सोहिरा म्हणे कीं वर्म स-माय । आंगीं आहे पुर्ति कमाय ॥ ५ ॥

पद २६.

भगवंतभजनाविण हें काय जिणेरे ॥ ध्रु० ॥ नाम एकाचें न घेती फुकाचें । ते नरकाचे पाहुणेरे ॥ १ ॥ निर्माणकरि-ता विसरुनी । पुरता संसारचि करिताहे । तयाचें नसीब उणेंरे ॥ २ ॥ एक आत्मकळा नकळा । प्रपंच सगळा । शिकोनी जसें पोट भरी हें सुणें रे ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा विवेक करावा । त्व-रित वरावा हृदयीं धरावा । पाण्याला पाणीरे ॥ ४ ॥

पद २७.

तो भगवंताचा दास । ज्याचें मनचि नित्य उदास ॥ ध्रु०॥ टाकुनियां खेदास । न भुले मास आणि मेंदास । निरसुनियां भेदास । अक्षय पावे ब्रह्मपदास ॥ १ ॥ जेवीं भुजंग हा नादास । किंवा चकोर हा चांदास । चिंतनीं देव पावे सादास । भोगी सच्चिदानंदास ॥ २ ॥ शास्त्रें नलगेचि शोधास । किंवा प्रवर्तेना

वादास । जेवीं-भ्रमर आमोदास । सेवी सुमनमकरंदास ॥ ३ ॥ कोठें न पवेचि वंदास । जो कां देखे मुळकंदास । नित्य आठवी गोविंदास । लागे भजनाच्या छंदास ॥ ४ ॥ न करी विषयाची आस । सोहिरा ह्मणे हें वरदास । योग्य जो सद्गुरुच्या वरदास । न चुके आपुलिया ब्रीदास ॥ ५ ॥

पद २८.

तूं हर हर शंभु सदाशिवा ॥ ध्रु० ॥ सर्व सोडुनी गर्व मोडुनि तोडुनि टाकीं तूं भवा । जटाजूट पशुपति तव पूजनीं परम प्रीति हे जडो जिवा ॥ १ ॥ सकळही· सृष्टीकल्याणकर्ता आनंदरूप तूं देवा । रुद्रा तूं वीरभद्रा प्रकटुनी हृदयीं लावीं ज्ञानाचा दिवा ॥ २ ॥ म्हणे सोहिरा नवद्वारें तुह्मीं परमामृत हें पिवा । शर्वा तूं विनपर्वा करुनि दे आनंद हा नित्य नवा नवा ॥ ३ ॥

पद २९.

भगवंत दाता । स्वामी तो आठवीं आतां ॥ध्रु०॥ परमानंद प्रकाशवंत । ज्याला नाहीं आदी अंत । जो कां ध्याती अखंड संत । धरुनि जाति निर्गुण पंथ । अंतरसाक्ष हें लाउनियां लय दक्ष होउनि मोक्षसुखाला सहज समाधी राहतां ॥ १ ॥ जेथुनि झाली सकळ सृष्टी । याचा कर्ता न दिसे दृष्टी । म्हणउनि होतें मन हें कष्टी । ऐकुनि अवघ्या ग्रंथीं गोष्टी । स्थावर जंगम नाना लीला विचित्रवर्णी शोभत धरणी तापत तरणी अगम्य करणी चरित्र हें पाहतां ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा आंगीं जडला । आधींच आहे नव्हे घडला । प्राणी हा संदेहीं पडला । उपाधींत सांपडला । त्याचे दृष्टी ईश्वर दडला । ऐसा वेदांतीं निवडिला । तो हा व्यापक आत्मा अंतरसाक्षी परिपूर्ण सनातन गोड दिसे गातां ॥ ३ ॥

पद ३०.

भ्रम विस्मय गेला । देवें उद्धार हा केला ॥ ध्रु० ॥ अजरामर हें स्वरूप दावी । अनन्यभावें भक्ति लावी । महिमा तेचि वदनीं गावी । कितुकी वचनीं ते सांगावी । जन्मोजन्मीं हे मागावी । परतुनि दृष्टीनें उमगावी । सज्जनजनमनरंजन हा भवभंजन निरंजन निर्गुण जो गंजन करि हरि व्यंजन नयनीं अंजन भरी जीव तन्मय होउनि ठेला ॥ १ ॥ निरालंबीं राहाणें ज्याला । मिळुनियां अजाला । किं त्या भुवनत्रयराजाला । करितो अनाहत वाजाला । विसरे तुझ्या माझ्याला । ऐसा लाल होउनि कालकलित कौतूहल तुंदल ललित चलित विश्वांभरभजनिं गलित वलित अतिमान होउनि चिन्मयभुवनिं न्हेला ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा शरीरचर्म । आहे तोंवरि घडतें कर्म । पूर्वार्जित हें धर्माधर्म । अंतरसाक्ष हें जाणुनि वर्म । तेणें हरिले सकळ श्रम । ऐके देखे स्पर्शे चाखे । परिमळ येतो घेतो नाकें वाचे बोले हात हाले पाय चाले मैथुनिकाले विसर्गताले जागृति निद्रा स्वप्न सुषुप्ति वर्तुनि ऐसा गुणातीत तो महाशून्य चैतन्यचि झाला जिताचि असतां मेला॥३॥

पद ३१.

कृपा कशानें करील तो हरी ॥ ध्रु० ॥ कर्ता हर्ता ईश्वरभर्ता । क्रियमाणें हें आयुष्य सर्ता । पर्ता नाहीं इंद्रियचर्ता । विपरित अर्था भुलुनि जिव हा उगेंचि गर्व हें धरि ॥ १ ॥ परद्वार हें पातक आहे । वेदपुराणीं ऐकत जाये । नर्कें नयनिं हा प्रत्यक्ष पाहें । बिभित्स अवयें सुखेंचि साहे । अतिलुब्ध जो कामिनीवरी ॥ २ ॥ प्रतिपाळ करि कीं मदाचा । मार्ग न कळे ब्रह्मपदाचा । करी आट विवेकनदाचा । प्राणी जाणला हा न कदांचा । जो असत्यवादी सदांचा । ज्याची वा-

चाचि नाहीं हे खरी ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा हा वर्तो । नेणें आत्मस्वरूपीं परतो । कीं कोण संग मी धरतों । आणि काय मी हें करतों । नित्य कोणाला मी स्मरतों । हें न कळोनि तृष्णा उठवी नानापरी ॥ ४ ॥

पद ३२.

भज भवानी भगवति हे । आनंदी वरदायिनी ॥ध्रु०॥ चिद्धनवनवाटिका, ज्ञानदीपिका, परमामृतकूपिका, कल्पलता, हे भक्तवत्सला, मनोहरा सुंदरा, प्रिया श्रीनगरनायका जगत्रयजननी, विष्णुमायाविलासिनी, हे विश्वमोहिनी, चित्कला जे सत्रावी संजीवनी ॥ १ ॥ दिव्यांबरधारी, दिव्यलेपना, दीव्याभरणीं, दिव्यकुसुमें, दिव्यान्नें प्रिय, दिव्य प्रिया, हे आत्मरूपिणी, सर्वसिद्धिनी, साध्यसाधनीं कामधेनु, हे आदिकुमारी, जगदोद्धारी, जन्म निवारी, मरणा मारी, भवजन तारी, पार उतारी, हे सर्वांचि स्वामिणी ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा लक्षभेदिनी, भयानका, हे भयनासिनी, भगमालिनी, लीलालना, कळानाटका, चिच्चंद्रिका, चित्कल्हारा, चित्तचाळका, चिदेकरूपा, चित्कैवल्या, भुवनेश्वरि हे, रामालंपट कामातुर, हे दृश्यवर्जिता, दुरितनिवारिणी, मंदाकिनि, हे मोक्षदायिनी, परमयोगिनी, अनादिसौभागिनी ॥ ३ ॥

पद ३३.

ऐसा जन्म नको हा मला । देवा शरण येतों मी तुला॥ध्रु०॥ देह हें जाण जीवाला मोट । बांधुनि केलासे कडेलोट । तेथ श्रमतो भरतां पोट । दुःखें भोगी कोटीनकोट ॥ १ ॥ जन्मांतरींचें पुण्य पाप । प्राप्त जाहले त्रिविध ताप । आयुष्याचें भरतें माप । डोळां पडली मोहांची झांप ॥ २ ॥ आपण पडला असतां बंदीं । आणी लोकांला निंदी । दुष्ट दुरात्मा हा

द्वंद्वी । मरोनी होतो समंधी ॥ ३ ॥ ज्याला सुचेना हे गुटका । धरितो अभिमान लटका । अडला देह बुद्धी अटका । ईश्वर स्मरेना एक घटका ॥ ४ ॥ न रुचे संतांची सोबत । पाठीं धांवेना लोंबत । नाहीं योगाला झोंबत । नाइके अनाहत नौबत ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे यांतुनि सोडीं । आवरीं मनाच्या ओढी । दहाही इंद्रियें कोंडीं । लावीं आत्मस्वरूपीं गोडी ॥ ६ ॥

पद ३४.

जगजीवनजी दीनोद्धार ॥ ध्रु० ॥ आत्मानात्मविवेक सुमति सुख दावी हें सारासार । लटिकें देह हें गेह करुनि जिव भोगितसे दुःख फार ॥ १ ॥ मुक्त करोनियां गुप्तस्वरूपीं दे दर्शन उक्त प्रकार । हे विश्वंभर करुणाकर लौकर भवसिंधु करिं पार ॥ २ ॥ योगयुक्ति दे शून्य मंडलीं मन हें जाऊं एकवार । भक्तकाजकल्पद्रुम सद्गुरु दाता परम उदार ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा काम क्रोध मारु मदमत्सर दानवा करणें भार । युगायुगीं तूं धरिशी नाना रूप लीला अवतार ॥ ४ ॥

पद ३५.

वेशधारी युगायुगीं हर लीलाभरित हरि भवसागर हा तारी ॥ ध्रु० ॥ चरित करित अरी, दमुनि कामना आराम हृदय हें करी ॥ १ ॥ ज्ञान मृगहि निमाला, सोहिरा ह्मणे तें सुख लाधलें मला ॥ २ ॥

पद ३६.

भजन तुझें आवडो वो मजला । विषयसुख नावडे वो मजला ॥ ध्रु० ॥ अविनाश आत्मारामा । भक्तकल्पद्रुमा ॥ १ ॥ गैबी चराचर । अगम अगोचर ॥ २ ॥ सज्जनरंजना । आलख निरंजना ॥ ३ ॥ असोनियां लक्षा । प्रत्यक्ष अलक्षा ॥ ४ ॥ मौन्य महाशून्या । अखंडचैतन्या ॥ ५ ॥ पाहतां अरूपा । आनंद

सत्तारूपा ॥ ६ ॥ टाकुनियां गुणा- । तीत निर्गुणा ॥ ७ ॥ वृत्ती लागो एका । नगरनायका ॥ ८ ॥ सकळमूळबिंबा । विकाश निरालंबा ॥ ९ ॥ जगभ्र अंबरा । दिव्य दिगांबरा ॥ १० ॥ कानाविण ऐकत्या । डोळ्याबीण देखत्या ॥ ११ ॥ अज्ञान नेणत्या । अंतर जाणत्या ॥ १२ ॥ मागत्याचें मागणें । तुझें हेंचि देणें ॥ १३ ॥ सोहिरा ह्मणे मी मोड । अवीट आणी गोड ॥ १४ ॥

पद ३७.

तुजविण आणिक नाहींरे मज । कळोनि आलें हें आजि सहज ॥ ध्रु० ॥ अनेकरूपी एका । नगरनायका ॥ १ ॥ आ-लख निरंजना । दत्त चिद्धना ॥ २ ॥ जगदखिलपालना । हे लीलालालना ॥ ३ ॥ भक्तजनतत्परा । प्रेम परात्परा ॥ ४ ॥ जयजया विशुद्धा । देव अनादि सिद्धा ॥ ५ ॥ हृद्गता । सदय हृदयनिवासिता ॥ ६ ॥ दिसतें पावेल अस्तु । तूं अविनाश वस्तु ॥ ७ ॥ जगनगनागरा । हे करुणासागरा ॥ ८ ॥ सुख नाहीं हो कोठें । संसारीं दुःख मोठें ॥ ९ ॥ किती बोखुं हे कूड । प्रत्यक्ष लांकूड ॥१०॥ देह हें जायाचें । अंतीं हें जायाचें ॥११॥ जळो परतें हें पोट । आणि जळो तें चिरकुट ॥ १२ ॥ मासा करी चळवळ । परी केधवां नेणो पडेल जाळ ॥ १३ ॥ संसा-रिया सुख तैसें । केव्हां नेणो व्हेसिल कैसें ॥ १४ ॥ विषय सुखीं अनावडी । लागो तुझी पुरति गोडी ॥ १५ ॥ सोहिरा ह्मणे मागतसों । बोलासारखें आंगीं असो ॥ १६ ॥

पद ३८.

कैसा विसरों म्यां तयासी । तो आहे मजपासीं ॥ ध्रु० ॥ निर्जिवां देऊं म्यां देवपण । तरी इंद्रियें चाळविती कोण ॥१॥ देहचि प्रमाण मानिलें । तरी उत्पन्न कोठुनी झालें ॥ २ ॥ नि-

द्वैत देहा नाहीं स्मरण । यातें जागवी कोण ॥ ३ ॥ एकमेकां दिसे अनेक । लाघवी नगरनायक ॥ ४ ॥ नाशिवंत चराचर । अविनाश अगोचर ॥ ५ ॥ विशद बोध हा विद्गत । सकळभूतहृद्गत ॥ ६ ॥ लागली हे तयाची भक्ती । सृष्टी जेथुनि होती ॥ ७ ॥ सोहिरा ह्मणे नाहीं दुरी । व्यापक सत्ताधारी ॥ ८ ॥

पद ३९.

भेट देईंरे जगज्जीवना । आजी सज्जनरंजना । विराजराजयोगी आलख निरंजना ॥ ध्रु० ॥ सहज निजनिर्भरु । देवा भक्तकल्पतरु ॥ १ ॥ निजधाम अंबरा । देवा दत्तदिगंबरा ॥ २ ॥ कनकनागगरा । देवा जगतरंगसागरा ॥ ३ ॥ कायादर्पणप्रतिबिंबा । अतीत निरालंबा ॥ ४ ॥ आनंदवधुवल्लभा । देवा आरंभरंभस्तंभा ॥ ५ ॥ अद्वय कुमुदिनिचंद्रा । क्षमाशांतिसमुद्रा ॥ ६ ॥ विशदबोधविद्गता । देवा सकळभूतहृद्गता ॥ ७ ॥ विवेकसागरा । देवा सुहृदनसुंदरा ॥ ८ ॥ चिन्मात्र उदासीना । तन्मात्रविनाशना ॥ ९ ॥ सारथी मनोरथीं माज्या । हो तूं आत्माराम राज्या ॥ १० ॥ गैबी चराचरा । देवा अगम अगोचरा ॥ ११ ॥ काया ना माया । तुझी निर्गुण निरामया ॥ १२ ॥ सोहिरा ह्मणे प्रीति जैसा । अवकाश आकाशा ॥ १३ ॥

पद ४०.

भगवंता दर्शन देईं रे ॥ ध्रु० ॥ मी कोण मज येउंदे कळोनी, तेथ मन हें वळोनी, जाउंदे गळोनी, निशिदिनीं निर्गुणवनीं लय हो लाईं रे ॥ १ ॥ काना ऐकवी, नयना दाखवी, त्वचेला कळवी, रसने चाखवी, परिमळ लेववी, शेवटीं कोण हा कोठें तूं नाहीं रे ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा मृगजळवत् संसार दिसोनियां विषयसूख किमपि मजला रुचो देऊं नको कांहीं रे ॥ ३ ॥

पद ४१.

तुजविण न गमे न गमे मज हे घडी रे ॥ ध्रु० ॥ निष्कामाची निजधामाची आरामाची भवसागरीं कामाची या हरिनामाची सांगडि रे ॥ १ ॥ मायिक संसार असार हा जाणुनि जे कां भजति तुज ते पावती परे परथडि रे ॥ २ ॥ महानंद समुद्र पूर्ण ते पूर्णचंद्र जो कां भुवनत्रयनरेंद्र तो तूं संतांचा संवगडि रे ॥ ३ ॥ अज्ञानवेडी सर्वेच तोडी पांच पांचाठायीं विघडी मनाला आपणा पासीं वोढी मोक्षपदाचा दरवाजा उघडी रे ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा निकट निरंजनीं रंजुनियां परिपूर्ण सदोदित ब्रह्मरूप निज नित्य निवासित टाकुनि सकळिक प्रापंचिक परवडी रे ॥ ५ ॥

पद ४२.

तुजविण वो कैंचा लाभ जनीं या लोकांला ॥ ध्रु० ॥ माझें माझें ह्मणुनि लटक्या मृगजळा भुलोनि केवळ देखतांचि जाणोनि उगें पडले शोकाला ॥ १ ॥ अविद्या लागली पाठीं चालती ते आडवाटीं विषयासाठीं मरती मारोनि एकमेकांला ॥२॥ अर्थाविण तो जपतां अंतरींचा कीर रिता शिकविलि तो बोले गीतावाक्यश्लोकांला ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे हेतुला नासोनियां आंतुला ओळखिला नाहीं कीं तुला अनेकीं एकाला॥४॥

पद ४३.

मजवरी तूं दया करींरे ॥ ध्रु० ॥ रूपरेखविना तूं एक पाळक चाळक सकळ चराचरीं रे ॥ १ ॥ अखंड अनंत अपार अरूपा तूं दे अलभ्य हा लाभ आह्मांला अभ्यंतरीं रे ॥ २ ॥ चित्सुखसिंधु आनंदकंदु परमामृतबिंदु मनइंदु न्हेई अजरामरपद परात्परीं रे ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे स्वरूप दावीं लय हें लावीं निर्गुण निरंजन निरामय चिदंबरीं रे ॥ ४ ॥

पद ४४.

मना ईश्वरभजनीं तूं रत रे ॥ ध्रु० ॥ मृगजळवत् तूं जाण असार । प्रपंचींहुनि परत रे ॥ मना० ॥१॥ त्वरित तूं घेईं हें परमपीयूष । आयुष्य गेलें सरत रे ॥ मन० ॥ २ ॥ अलक्षलक्षा आणुनि अंतरीं । विलोकन करीं तूं सुरत रे ॥ मना० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा पहा तें पहाणें । स्थिरावतां मुळिं जैसें लवण जळीं विरत रे ॥ मना० ॥ ४ ॥

पद ४५.

श्रीराम जय राम जय जय राम ॥ ध्रु० ॥ ऐसें निशिदिनीं नाम गातां, प्रेम स्वयेंचि येइल हाता । निजपदीं पावावें आराम ॥ श्रीराम० ॥ १ ॥ विषयापासुनि सुटेल, केवळ संसारासी विटेल । मन हें होइल निःकाम ॥ श्रीराम० ॥ २ ॥ देहिंची चाळक कळा गमेल, सर्व रूपीं समरंगीं रमेल । चित्सुखपरात्परनिजधाम ॥ श्रीराम० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे शिव स्मरतो, वाल्मिक पतित पावन होतो । ऐसें सकळां तारक नाम ॥ श्रीराम० ॥ ४ ॥

पद ४६.

भज परमप्रीति भगवंताला ॥ ध्रु० ॥ नित्य ध्यानीं निरंतर गगनीं लय हें अन्वयलीला विलोकीं तूं अचळ अरूप अनंताला ॥ भज० ॥ १ ॥ सदानंद मुळकंद विबंधन चिद्धन सुख चिरकाळ त्वरित घे अनुभव वन एकांताला ॥ भज० ॥ २ ॥ सगत विगत द्विभेद रहित जो समयाधीन सुदर्शन सर्वां अक्षय रूप जयवंत झाला ॥ भज० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा दत्त दिगंबर गुरुविश्वंभर अनुग्रहितरे सविगद्गद बोधें निज निरंजन मनरंजन सदसंताला ॥ भज० ॥ ४ ॥

पद ४७.

तो हरी गोवर्धनधारी आधारी ॥ ध्रु० ॥ गोपवधूमुख-मधुरपान करी सुरसतान वनवारी। रास रंग रस दंग नंग चटीं नटत है कुंजविहारी ॥ तो हरी० ॥ १ ॥ दानवमर्दन-अर्दनजनगुणवर्धन रूप साकारी । सज्जनजनमनरंजन वंद तो नंदसुत पूतनारी ॥ तो हरी० ॥ २ ॥ बाललालन यौवन-लीला व्यासमुखें उच्चारी। सद्भावें भगवंत श्रवण करि तया दीनजनां उद्धारी ॥ तो हरी० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा रूपरे-खविण अनंत रूप हें निर्गुण निराधारी। वैकुंठभुवनिंचा रमापति पूर्ण सुख अवतारी ॥ तो हरी० ॥ ४ ॥

पद ४८.

तो हरि हरि स्मर गोकुळिं काना ॥ ध्रु० ॥ मधुसूदन मुख-कमलअमोदीं मधुकरवत् प्रीति गोपवधू त्या रतिसुखलालन अमृतपाना ॥ तो हरि० ॥ १ ॥ फणिवरमर्दन धरी गोवर्धन हरिगुणवर्धन करित जनार्दन प्रताप नाना ॥ तो हरि० ॥ २ ॥ द्वैत नासुनि ज्ञान प्रकाशुनि पारंपर उपदेशुनि उद्धव उद्धरिला सद्भक्तनिदाना ॥ तो हरि० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा नाम जे जपति विपत्ति नासुनि संपत्ति पावति मोक्ष परमश्रीपतिवर-दाना ॥ तो हरि० ॥ ४ ॥

पद ४९.

आशीर्वचन वरदान भगवान् हर देत सुखसुरस सागर परम-निदान ॥ ध्रु० ॥ जेथ स्थान मानापमान नाहीं समान सकळां भूतीं करदान मनकान वर आन स्मरत नसत बसत वनवासी गिरिकपट निकट अतिभार जपतपपुण्यपरायण श्रीनारायण-ध्यान ॥ १ ॥ जेथ संत महंत अनंत वसंत गाती गुण रातदीन सांगात वेधत चरित त्वरित कल्याणमोक्षप्रद देती अवधान ॥

२ ॥ ह्मणे सोहिरा अतीत ईश्वर पतीतपावन सनकादिकमुनिजनसंभावन ब्रह्मा विष्णु महेश उत्पन्न अंगन पवन जळमही हुताशन स्थावरजंगम संनिधानी हें चळत अचळ हा परमानंद परात्पर पावत परम हें आत्मज्ञान ॥ ३ ॥

पद ५०.

भेटला भगवान् मला हो ॥ ध्रु० ॥ भेटीसाठीं आटाआटी जपत कोटी जन्मोजन्मीं करित करित जिव बहुतचि हा श्रमला हो ॥ भेटला०॥ १ ॥ पंचभुतांच्या विस्ताराला सविस्तराला जाणो नित्यातीत साक्षिभूत हा अंतरींचि गमला हो ॥ भेटला० ॥ २ ॥ जे जे समयीं जें जें घडतें भोगणें पडतें देहाला या संस्कार हा तयानेंचि नेमिला हो ॥ भेटला० ॥ ३ ॥ नित्यानित्य विवेक करुनि वैराग्य दशेनें पुनति न सेवीं विषयरसा वमला हो ॥ भेटला० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा अंतर बाहेर व्यापुनि उरला रूपरेखविण परब्रह्म तेथ हा जिव रमला हो ॥ भेटला० ॥ ५ ॥

पद ५१.

भगवान् तुह्मांला प्रसन्न असो कीं ॥ ध्रु० ॥ अनंतकोटी ब्रह्मांडनायक, आत्माराम हा स्वसुखदायक, कायिक वाचिक मन अभ्यासें सर्वभुतीं हा तोचि दिसो कीं ॥ १ ॥ अज्ञान समग्र हें विलया जावो, झालें कर्म हें ब्रह्मीं समावो, देहबुद्धि अभिमान गमावो, किमपि हे भ्रांति नसो कीं ॥ २ ॥ परतुनि दृष्टी लय हें लागो, प्रपंचाचें बरें न मागो, निरालंबीं सदैव जागो, निश्चय तेथ बसो कीं ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा चित्तीं डसों कीं, संतांपासीं हेंचि पुसों कीं, योग्यायोग्य हें न मनुनि हृदयीं, भूतदया हे वसो कीं ॥ ४ ॥

पद ५२.

तरी होय परम संतोष मनाला ॥ ध्रु० ॥ हृदयभुवनीं असे आत्माराम, मनचि होइल जरि निःकाम, येथलें येथचि अस

आराम, दुरि कोठें जाणे नलगे वनाला ॥ १ ॥ मन हा मयूर कीं आनंदें नाचे, नाना कलरव करणें वाचे, अंतरीं स्मरता स्वरूप साचें, अनाहत गर्जत गुप्तघनाला ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा भगवान् अगोचर, व्यापुनि उरला सकळ चराचर, लाउनि पाहतां मुद्रा खेचर, उपरमसी गगनाला ॥ ३ ॥

पद ५३.

वैकुंठपति तो रमारमण स्मर सुरनर किन्नर वंदिती जगदुद्धार उदार ॥ध्रु०॥ हार हा कीं विहार सकळहि मार भार विकार। साकारही अनुकार जाण तूं विपरीतबुद्धि विदार ॥ १ ॥ सार हा संसार तूं देख असार सांडीं कीं सार। तूं सार भव हा असार निवडुनि सत्कण हा कीं चिदार ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा निवार हें येणें जन्ममरण अनिवार। ईश्वरपदारविंदीं पुनीत अलिवत् मन हें सुधार ॥ ३ ॥

पद ५४.

गोविंद वंद तो नंदसुत आनंदकंद आराम ॥ ध्रु० ॥ मंद अनिळ सुगंध शीतळ नितळ चंद्रीं व्योम। सुंदर मेघश्याम मनोहर कुंजत गोपींसी काम ॥ १ ॥ वसंत अवघें पसंत वन करी घसंत मदनोद्दाम। अतिरति करितां बल्लवयुवती पावती मोक्षधाम ॥ २ ॥ ऱ्हाटति तपिये दाटति पवना आटति इंद्रियग्राम। ह्मणे सोहिरा सर्वघटीं हरि देखति आत्माराम ॥ ३ ॥

पद ५५.

भावें भगवान् हरी तो। वेळोवेळां तोचि स्मरितो ॥ ध्रु० ॥ जळस्थळव्यापक असोनि न दिसे असें कीं सर्वांत भरीं तो। प्रल्हादास्तव प्रकट स्तंभीं गर्जन करि नरहरि तो ॥ भावें० ॥१॥ सदैव ज्याचें कीर्तन करितां हृदयीं आनंद भरितो। अनन्यगतिनें शरण आलिया सुख दुःख परिहरितो ॥ भावें० ॥ २ ॥

निर्गुणसागर अचल आपण हारविहार करितो। नामरूपीं या नाना रंग उठवित जगलहरी तो ॥ भावें० ॥ ३ ॥ दैत्य-मर्दनासाठीं उमटला देव हा गौळ्यांघरीं तो। ह्मणे सोहिरा पूर्ण ब्रह्म हा किती अवतार धरीतो ॥ भावें० ॥ ४ ॥

पद ५६.

सार्थक माझें हें करीं तूं ॥ ध्रु० ॥ अच्युत केशव परमानंदा गोविंदा ये मुकुंदा। कायासुमनांतिल मकरंदा जगव्यापका श्रीहरी तूं ॥ १ ॥ ज्ञानसुखया अमला पाजुनि समाधी लावीं हे मला। अद्वय कमळा विकाश करुनी मोहांतुनि उद्धरीं तूं ॥ २ ॥ लय हें लागो हेंचि मागों चित्त हें वितरागो। नित्य निरंजन जागो मनिंचा जाऊं नये क्षणभरी तूं ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा पाप पुण्य हीं दोन्ही घडती कर्मबिजापासोनि। तें बिजचि कीं नासोनि मजवरि कृपा करीं लवकरी तूं ॥ ४ ॥

पद ५७.

शिव शंभु शंकर स्वामी। निजभावें पुजावा तुह्मीं ॥ ध्रु० ॥ विभूतिलेपन अवघें शरीरीं, व्याघ्रांबर गजचर्म धरी। वामांगीं हे गिरिजा नारी, कबरीभार जटाधारी ॥ शिव० ॥ १ ॥ पंचमुख त्रिलोचन भोळा, कंठीं धरिलें हळाहळा। वरी रुळती रुंडमाळा, आज्ञा समर्थ कळिकाळा ॥ शिव० ॥ २ ॥ आरुढोनि वृषभवाहनीं, ज्याला प्रियकर शंखध्वनि। डमरुत्रिशूलपिनाकपाणी, स्मशानवासी निर्वाणी ॥ शिव० ॥ ३ ॥ विराजित भूषणीं अजगर, शशिशेखर गंगाधर। ज्याची पूजा करिती अमर, ऐसा अवधूत दिगंबर ॥ शिव० ॥ ४ ॥ ऋद्धि सिद्धि ज्याचा दाशी, स्मरतां सकळ पातक नाशी। सोहिरा ह्मणे निजभक्तांसीं, उदार कैलासवाशी ॥ शिव० ॥ ५ ॥

पद ५८.

हरारे दर्शन तूं देईं मज गिरिजावरा ॥ ध्रु० ॥ त्रिलोचना भावमोचना आकुंचन करीं मन उन्मन चिद्धन अणुरेणुव्यापक अमरा ॥ हरा० ॥ १ ॥ कपर्दीश ईश स्मशानवासी भस्म धारण त्रिशूलडमरुपिनाकपाणी व्याघ्रांबरधर शिव शंकरा॥ हरा० ॥ २ ॥ वृषभवाहना भुजंगभूषण पंचानन नीलग्रीव शंभो शशिशेखर गंगाधर दिगंबरा ॥ हरा० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा कल्पवृक्ष चिंतामणि सिद्धि आज्ञांकित तुज सकळिक साधन पूर्णकाम अभिवृद्धि अभयंकरा ॥ हरा० ॥ ४ ॥

पद ५९.

शिवसांबचरणीं मन लावीं स्मरणाला ॥ ध्रु० ॥ या नैसर्गा इंद्रियवर्गाला उपसर्गा नामुनि स्वर्गा न्हे अपवर्गा देतो भर्गा विनवितों दुर्गारमणाला ॥ शिव० ॥ १ ॥ देवकामिनी गगनगामिनी सौदामिनी सौंदर्य सुरत सुगंध तरुणतर गीत नृत्य गंधर्व सुस्वरें संगीत गायन छंद बंद प्रबंध वादन नारद तुंबर तांडव लीला हावभाव कडविकड दाविती अमर वानिती सदानंद कैलासभुवनीं काळक्रमणाला ॥ शिव० ॥ २ ॥ शुभ्रसुमन सुगंधलेपन शुभ्र अक्षता कोमलत्रिदल बिल्वपत्र त्रिनेत्र त्रिगुणी त्रियायुधी कीं त्रिजन्माचें पाप संहरे धूप दीप नैवेद्य प्रदक्षिणा प्रीतीं प्रणम्य करी तो न पडे भ्रमणाला ॥ शिव० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा रुंडमाला कंठीं हारी जटाजूट मुकुट मदनारी नारीनर संसारी लीला सारीवंत जयहारी नाना चित्र विचित्र विहारी दशमद्वारीं स्वारी पवनारूढ अस्वारी अष्टौपारी बारी धर करभारी हे सरदारी वहमा मारी परोपकारीं भज तूं न पडसी जन्ममरणाला ॥ शिव० ॥ ४ ॥

पद ६०.

हृदयीं हा शंभु ध्यातां आनंद वाटला ॥ ध्रु० ॥ कैलासभुवनिंचा राणा, वेदशास्त्रीं प्रसिद्ध जाणा, ज्याचा अवधुति बाणा, पावोनी निर्वाणा भवसिंधु आटला ॥ हृदयीं० ॥ १ ॥ प्रसन्न झाला व्योमकेश, इच्छिलें पावाल यश, उरला ना भ्रांतीचा लेश, वेशधारी लीलाविग्रही अंतरीं दाटला ॥ हृदयीं० ॥ २ ॥ शांतीचें हें लाउनि लग्न, मन हें होउनि गेलें मग्न, वैराग्य पेटली अग्न, संलग्न सकळा नोहे कवणाचा हा वाटला ॥ हृदयीं० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे समाधी लागे, निद्रेमाजी असणें जागें, कल्पना हे नलगे मागें, केव्हां नेणो काय इंद्रियग्राम ऱ्हाटला ॥ हृदयीं० ॥ ४ ॥

पद ६१.

यारे शिवशंभूचें भजन कराया । भवसिंधु तराया ॥ ध्रु० ॥ होइल सार्थक या जन्माचें आजन्माचें । येणें *मोचन या कर्माचें स्वधर्माचें । मूळ बीज हें निजवर्माचें । विवेक सुमती सुनिश्चय चित्तीं धराया ॥ यारे० ॥ १ ॥ माया मृगजळवत् कां जाण । यांत भ्रमतो तो मूर्ख तूं जाण अजाण । याला भोगुनि त्यागितो साधु सुजाण । शुद्ध भावें स्मरणें गौरीहरा या ॥ यारे० ॥ २ ॥ ईशानेश हा नित्य स्मशानवासी । सकळ भुतावळि आहे त्यापाशीं । राज्य सोडुनि निघाला तापसी । राम जपतो कीं त्रिविध ताप हराया ॥ यारे० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे हा विश्वंभर । ज्याला गाती हे नारद तुंबर । दशदिशांचें पांघुरला अंबर । जटाधारी हा अवधूत दिगंबर ॥ यारे० ॥ ४ ॥

पद ६२.

स्मर पार्वतीच्या वराला ॥ ध्रु० ॥ श्रवण मनन निजध्यास नयनीं जनिं वनीं पाहुनी विसरीं तूं आपपराला ॥ स्मर० ॥१॥

जटामुकुट नीलकंठ त्रिलोचन पंचानन मुनिजनमनमोहन वृषभारूढ हराला ॥ यारे० ॥ २ ॥ खपरुडमरुधर पिनाकपाणी दक्षयज्ञमथन मदनारी देतो परम अभयप्रद वरद कराला ॥ यारे० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा अर्चन वंदन आत्मनिवेदन नवविध भजन सकळहि संपत्ति चालुनि येती घराला ॥ स्मर०॥४॥

पद ६३.

शिव हर शंकर मदनारी देह हें अर्पण तुज केलें ॥ ध्रु० ॥ तव भजन पूजन ध्यानीं मन हें । तन्मय होउनि ठेलें ॥ शिव० ॥१॥ चित्त हें गिरिवर वधूवल्लभा । स्वरूप पहावया भुकेलें ॥ शिव ०॥ २ ॥ जय विश्वेश्वर भगवान् स्मरतां । विषयस्मरण गेलें ॥ शिव० ॥ ३ ॥ जीवन्मुक्त करुनि भक्तासीं । त्वां कैलासभुवनीं न्हेलें ॥ शिव० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे तरि होऊं सके । बहुत जन्मीं पुण्य केलें ॥ शिव० ॥ ५ ॥

पद ६४.

जयजय शंभु सदाशिव शंकर पशुपति गिरिजावरा रे ॥ ध्रु० ॥ नमन करुनि सद्भावें तुज मन अर्पण विश्वंभरा रे । अनाथनाथ नमो दिनबंधू वांछित दे ईश्वरा रे ॥ जय० ॥ १ ॥ त्रिभुवनपति तूं सकळहि संपति लंकापती देसी वरा रे । मुनिजनमोहन मानसहंसा ये मम हृदयसरोवरा रे ॥ जय० ॥ २ ॥ प्रसन्नता तव स्वप्रभउदित उदय दिनकरा रे । प्रकाश पडतां आकाशभरि मति विकाश इंदीवरा रे ॥ जय० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा भक्ती ज्ञान वैराग्य सहपरिवारा रे । परा प्रेम प्रमदामुख सेंवर ब्रह्मरंध्रगिरिवरा रे ॥ जय० ॥ ४ ॥

पद ६५.

दिगंबरा जोगी जटाधरा शिव शंकरा तुजला नमो ॥ ध्रु०॥ पचमुख सुख शांत स्वरूप तूं मदनदहन वनवास । गौरवर्ण वपु

सुगंध हर जय जय जगन्निवास ॥ दिगंबरा० ॥ १ ॥ सुरवर गाती ध्याती तुजप्रती आनंद बारा मास । सत्यलोक वैकुंठ भुवनावरी स्थान तुझें कैलास ॥ दिगंबरा० ॥ २ ॥ देह हें साजवी मनची माजवी काळ वाजवी तास । प्रपंच करितां श्रमचि शेवट कांहिंच नलगे हातास ॥ दिगंबरा० ॥ ३ ॥ बंधन सोडवी वंदन करितो सद्भावें सोहिरा दास । शमदमीं सोडी इंद्रियें कोंडी तोडी हे मायापाश ॥ दिगंबरा० ॥ ४ ॥

पद ६६.

शिव स्मर हर हर गिरिजावर ध्यानीं । भजन पूजन कल्याणकर्ता दाता हा वरदानीं ॥ ध्रु० ॥ विभूति वरी जीत पिशाच सहचर वास स्मशानीं । पंचवदन त्रिलोचन भूषित- नाग कुंडलें कानीं ॥ शिव० ॥ १ ॥ गजचर्मवसन व्याघ्रांबर धर वर आसनीं । कैलासभुवनींचा नृपवर कीं तपोनाथ हा याग ज्ञानी ॥ शिव० ॥ २ ॥ द्वापारयुगीं कीं किरातरूपें महाकाननस्थानी । पार्थाप्रति हा झुंजत घेउनि तकस आणि कमानी ॥ शिव० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा सकल सृष्टिचा प्रळय करीत निदानीं । भक्तकाजकल्पद्रुम शंभु स्वात्मसुख दरम्यानी ॥ शिव० ॥ ४ ॥

पद ६७.

सार्थक जन्माचें कर । भावें स्मरीं हरिहर रमापती गिरिजावर । जनीं जनार्दन हा विश्वंभर ॥ ध्रु० ॥ आत्माराम पाहीं, सखा ज्याला नाहीं, रूप रेखा अनेका घटीं या एका सर्वभूतिं ईश्वर ॥ सार्थक० ॥ १ ॥ शांती. सुख नित्य वर, निजबोध निरंतर, निर्वाळुनि अंतर । अनाहत नित्य वाजे वाजंतर ॥ सार्थक० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे हा अमर, अर्धनारीनटेश्वर, भक्तिभावाला तत्पर, पूर्ण ब्रह्म ध्याई हा परात्पर ॥ सार्थक०॥ ३ ॥

पद ६८.

तो हा पंढरिचा राणा । व्यापक अणुरेणुप्रमाणा ॥ ध्रु० ॥ दृष्टी दीसे तो सुजाणा । ज्याणें न्हेलें मीतूंपणा ॥ १ ॥ त्रिभुवनचाळक । स्वामी विश्वाचा पाळक ॥ २ ॥ अनंतरूपीं एक । ब्रह्मांडनायक ॥ ३ ॥ अनाथ दीनबंधु । जो कां सुखरुप कृपासिंधु ॥ ४ ॥ ज्याची अनाहत नौबत वाजे । राजा गैबींचा विराजे ॥ ५ ॥ भेदुनियां नादबिंद । योगियां लावितो समाध ॥ ६ ॥ जो निर्गुण निरामय । भक्तां करितो आनंदमय ॥७॥ ज्ञानगंगा चंद्रभागा । आहे तटाकीं उभा गा ॥ ८ ॥ निश्चय पुंडलीक जेथ । देखोनि जवळीच आहे तेथ ॥ ९ ॥ निराकार निर्विकार । जेथुनि उमटला ॐकार ॥ १० ॥ जो आरंभरंभस्तंभ । सोहिरा ह्मणे निरालंब ॥ ११ ॥

पद ६९.

विठ्ठल रुक्मिणीरमण । चुकवी अनेक भ्रमण ॥ ध्रु० ॥ जीव नुरवी जीवपण । समूळ न्हेतो मीतूंपण ॥ १ ॥ त्याचे लक्षुनि चरण । अनन्य यावें कीं शरण ॥ २ ॥ त्याचें घेत कीं दर्शन। करितो मन हें समाधान ॥ ३ ॥ कूर्मदृष्टी निरीक्षण । करितो भक्तांचें रक्षण ॥४॥ जो कां योग्यांचा एकांत । तो हा लक्ष्मीचा कांत ॥५॥ जग बुद्बुदाचें जळ । सोहिरा ह्मणे हा गोपाळ ॥ ६ ॥

पद ७०.

वंदीं तूं शिवशंकरा गिरिजावरा करुणाकरा । अंत नलगे अनंत रूप हें संत स्मरती जगदीश्वरा ॥ ध्रु० ॥ त्रिशूलडमरुधरा गजचर्म सह व्याघ्रांबरा । आरुढोनियां नंदीवरी आनंदयुक्त दिगंबरा ॥ वंदीं० ॥ १ ॥ पंचवदन वपु विभूतिलेपन शिरीं भूषित शशिधरा । जटाजूट करि भुजंगभूषण त्रिभुवनपति हरिहरा ॥ वंदीं० ॥ २ ॥ भवमोचना हे त्रि-

लोचना भज भक्तकाजतत्परा । प्राणिया तूं उगाणिया करिशी कृतमत्परा ॥ वंदीं० ॥ ३ ॥ सार हा संसार हा परीपार पाव तूं नरा । अज्ञान नासुनि ज्ञान प्रकाशुनि ध्यान लावीं विश्वंभरा ॥ वंदीं० ॥ ४ ॥ पिंडींचा किं ब्रह्मांडिंचा तो हा द्विधा अहं परिहरा । सोहिरा ह्मणे तो हिरा जो कां अनुसरला मनोहरा ॥ वंदीं० ॥ ५ ॥

पद ७१.

शरण ये तूं रमापति पाव मोक्षपद सुखसंपति । शेषशयन हरी कमळनयन स्मर यमदूत हे कांपती ॥ ध्रु० ॥ श्यामसुंदर वैजयंती गळां चारी भुज विराजिती । किरीट कुंडलें मुकुट मेखळा क्षुद्रघंटिका वाजती ॥ १ ॥ श्रीवत्स कौस्तुभ गोपीचंदन नामें सूक्ष्म साजती । श्रीललित नीलतनुवरी पीतवसनी विजू लाजति ॥ २ ॥ मालमंजरी गदापद्मधरी शंख चक्र चहुं हातीं । दीनोद्धार उदार कृपानिधी मुनिजन ज्याला ध्याती ॥ ३ ॥ मत्स्यरूप धरी प्रवेशे सागरीं शंख मारी महामति । वेद उद्धरी धर्म सिद्ध करी प्रथम अवतारी रितीं ॥ ४ ॥ कूर्मरूप धरी पृथ्वीपृष्ठीवरी दानव प्रबळ बळोन्मति । हिरण्याक्षिया दमुनि सोडविली वराहरूपें हे क्षिती ॥ ५ ॥ भक्तराज प्रल्हाद वैष्णव स्मरणा नाहीं विस्मृति । तया पितेया कारण नरहरी प्रकट स्तंभाप्रति ॥ ६ ॥ आत्मनिवेदन बळि प्रतिग्रह वामन द्विज रूप यथास्थिति । पाताळभुवनींचें राज्य देउनि द्वार रक्षी तो परमप्रीति ॥ ७ ॥ क्षत्री मारिले वचन पाळिलें जननि रेणुका सती । परशरामीं शिरीं लाउनि शरें हा फिरविला अपांपति ॥ ८ ॥ लंकापतिप्रति युद्धप्रसंगीं वानर ज्याचे जुत्पती । दाशरथीराम रंगधीरवीर रामचंद्र सीतापति ॥ ९ ॥ नंदसुत अद्भुत पराक्रमी प्रवर्तला अतिनति । गोकुळिं काना नानालीला गोपवधूंसि

करि रति ॥ १० ॥ बौद्धकलंकी युग कलीचें प्रस्तुत अदृश्य गति। ह्मणे सोहिरा भक्त रक्षितो प्रकटुनि युगयुगाप्रति ॥ ११ ॥

पद ७२.

स्मर कानया कृष्णा ॥ ध्रु० ॥ सज्जनरंजन हा भवभंजन व्यक्तिवितृष्णा । आनंदनादबिंदाविरहित विशिष्ट उत्कृष्णा ॥ १ ॥ रविरूप हे सत्ता ज्याची कडाडित उष्णा । शशी माजी भूतरसात्मकीं हें जीवनरूपें पुष्णा ॥ २ ॥ वार्द्धविसि वहु कशासि मृगजळीं आशा हे तृष्णा । तन मन धन अपहारचि केलेंसि उदरा आणी शिष्णा ॥ ३ ॥ कर्में योनिबंधन पडतें न सुटे हो उष्णा । जन्मा येउनि सुखदुःखा मग कशासी हो रुसणा ॥ ४ ॥ भक्तीला भाळतो देव हृदयीं करी घुसणा । ह्मणे सोहिरा एतद्विषयीं नलगेचि पुसणा ॥ ५ ॥

पद ७३.

त्याणें भवसिंधु तारला । व्यापक अनंत जो विस्तारला ॥ ध्रु० ॥ ज्याणें निर्मिलें पिंड उदंड निपट नाहीं तेथ कपट मात्र हे पृथ्वीपट चितारला ॥ १ ॥ जपतप ध्यानिं किं पूर्व पुण्यें हा निःस्पृह हृदयीं वीतराग अवतरला ॥ २ ॥ ध्यासाया अभ्यासामध्यें मंत्र तंत्र जंत्र जो प्राणी चाखपाख उतारला ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा अंतरसाक्षी भगवंताला । भक्तचि ऐसा निश्चयरूपें करारासी उतारला ॥ ४ ॥

पद ७४.

त्या गिरिवरधर गोविंदा । नंदाचा नंदन वंदा ॥ ध्रु० ॥ तपें तपति जे मुनिजन जपति ज्या विपत्ति नाशित श्रीपति तो हा कुंजवनाप्रति यौवनयुवति जाति प्रतिदिनीं हा अति विलसत रतिछंदा ॥ १ ॥ सज्जनजनमनरंजन हा भवभंजन निरंजन निर्गुण जो गंजन अरी करी व्यंजन नयनीं अं-

जन भरी त्या भुवनत्रयमुळकंदा ॥ २ ॥ अंतवंत जिवजंत नेणसी खंत उपजुनि दंत विचकसि तंत नाहीं तुज अनंत भजनीं संतसमागम न रुचे तुजला न सुचे कांहीं मतिमंदा ॥३॥ खगासनावरी अघनाशन जो ग्रासन करितो प्राशन सकळिक काळकळित हा दुरित त्वरित हरी स्मर नित्यानित्य सर्वहि सोडुनि धंदा ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा यदुवंशदिनमणी कीं मर्दुनि फणिदैत्यदेवर्णिकिं दुर्धर रणिं विजय सुरगणीं नमियला धणी जगाचा वेषधारी जो शेषशयन हा सदैव दे आनंदा ॥५॥

पद ७५.

ये देवा भवसिंधु तारणारा ॥ ध्रु० ॥ आवर्त हा निवर्त मोहावर्त तुकियामनि कैवर्त केशवा तूं जन्ममरण वारणारा ॥ १ ॥ देह नाविदेह हें संदेह गेह नासुनि ग्रासुनि हे साहि अनुज दनुज मारणारा ॥ २ ॥ गोपिका त्या वोपिति जिवित्व किं निरोपिती वृत्तांत तुज श्रीपति तूं नंदसुत वंदुनि आनंदति त्या गोपपती गोकुळीं तूं अवतारणारा ॥ ३ ॥ कलत्र पुत्र वित्त हें चरित्र किं समान सूत्र खेळ हा विचित्र बहु दाविसि कीं विश्व चित्र हें चितारणारा ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे वसला ना उभा तूं प्रभा तुझि नभावरी स्वभाव दुभाव हे निभाउनि अभाव लावीं शुद्धभाव स्मरणीं दुरित हारणारा ॥ ५ ॥

पद ७६.

भगवंता तुझी गोडी लावरे । परमानंद परात्पर पूर्ण स्वरूप तुझें कीं दावरे ॥ ध्रु० ॥ जेणें करोनी हे निघोनि जातिल रज तम दुष्ट स्वभाव । चिद्घन सहज अनंतरूपिं या उपजों हा सद्भावरे ॥ १ ॥ दृश्य भास हा मिथ्या यांतील कशास धरणें आव । जन वन कोठें कांहिंचि नाहीं दिसे हे तितुकी मावरे ॥ २ ॥ संन्यास ह्मणणें या यांतचि होतो चित्त हें शून्यीं स्थिराव । वा-

ह्यात्कारें कशासि घालणें शुभ्र वसनाला कावरे ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा आत्मा स्मरण हें मोठा कीं मोक्ष उपाव । सदैव कीर्तन करणें भवसिंधु तराया नावरे ॥ ४ ॥

पद ७७.

कांहो गिरिवरधारी क्षणभरी हरि गाना ॥ ध्रु० ॥ अशाश्वतावरी विटोनि शाश्वत मोक्ष कांहो मागाना । श्रवण मनन निजध्यासें ईश्वरीं छंद हा लागाना ॥ १ ॥ गुणानुवादीं सदसंवादीं तृप्त करिना कां काना । गोकुळीं गोविंद अवतरला यदुपति काना ॥ २ ॥ आदिपुरुष हा विसरोनि तुह्मीं दैवत स्मरूं नका आना । सुरनरउरग हें स्थिर ज्याणें निर्मीयलें नाना ॥ ३ ॥ भक्तसंकटीं धांवत बैसोनि वैनतेयवाहाना । तो हृदयस्थ हा अंतरीं पहावा चिंता हे वाहाना ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा सारासार विचार करुनियां भवभ्रम कां त्यजाना । कोटील कोण मीं जन्मा आलों अंतीं काय या मुळावरी जाना ॥५॥

पद ७८.

ये हरी ये हरी अंतरनिष्ठ जरी त्यां तरी ॥ ध्रु० ॥ हिरोनि संपत्ति कौरव नृपति योजित विपत्ति देखोनि भूपति चित्तीं विलपति नयनलंपति पांडव पति हे तुलंघिति शपति मनींचि तपति कर्ण शकुनि दुःशासन कुमति कृत्रिम जपति जाण तूं श्रीपति पाव मला लौकरी ॥ १ ॥ मोरमुकुटपीतांबरधारी गोकुळवृंदावनविहारी गोपपति गोवर्धनधारी मुरलि मनोहर धेनूचारी विस्मित नारी कंसकाळ तो पूतनारि महाविष्णु तूं पूर्णब्रह्म अवतारी ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा चिदानंदघन चिद्रूवना तूं चित्तचाळका सकळपाळका या आकांता कमळाकांता पाव अनंता भगवंता तूं अनाथनाथा गुणरूपलावण्य पक्षिणी पतिव्रता ते द्रौपदी संकटीं स्मरी ॥ ३ ॥

पद ७९.

हरीविणें आणिक नाहीं सखा मज ॥ ध्रु० ॥ सारासार हें दाउनि अंतर । सांगतसे मज जिवींचें निजगुज ॥ १ ॥ समज समजउनि निज सुख लाधोनि । निवटिलें ज्यांहीं सगुणरूपीं नीज ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे जहीं नीज घ्यावया । दिधली ज्यांहीं मज सहज समाधी सेज ॥ ३ ॥

पद ८०.

तुजविणें आणिक नाहीं काम ॥ ध्रु० ॥ कार्याकारण निरसुनियां जहीं । पावीजे निजस्वरूपीं आराम ॥ १ ॥ काजें काज हें जाणोनियां निकें । सर्वहि देखतां आत्माराम ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग नग रूप हारोनि । निवटीजे एक सकळीं हेम ॥ ३ ॥

पद ८१.

रामभजन मनरंजन ॥ ध्रु० ॥ मीपणनाशक, निजप्रकाशक । सर्वे करी भवभंजन ॥ १ ॥ ध्यानीं जो पूर्ण, आपेंची आपण । होउनि तें जन विजन ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे, निशिदिनीं । प्रेमें गाती ते निज सज्जन ॥ ३ ॥

पद ८२.

श्यामसुंदर घननीळा ॥ ध्रु० ॥ तुझा तूंचि एकचि साचा । तुजवीण नाहीं वेगळा ॥ १ ॥ थोर थोरां देव सुरवरां । नाकळेचि तुझी लीळा ॥ २ ॥ आत्मानुभवें प्रेमस्वभावें । योगियांसि जिव्हाळा ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे निजदेहीं सुखामृत । पूर्ण तूंचि हे कीं चित्कळा ॥ ४ ॥

पद ८३.

हरीं हो अभिमान- दयाब्धिघना ॥ ध्रु० ॥ देईं अखंड तुजविण आन नसे कांहीं । जैसें गंगाजळ समता आणि मना ॥ १ ॥ नित्य अनुरक्त करीं मन-उन्मन । निरसिं विकारिक

छंद नाना ॥ २ ॥ तन मन रंजन दे सुखसज्जन । संगत सो-
हिरा समसदना ॥ ३ ॥

पद ८४.

करुणा करीं कां रे स्वामी ॥ ध्रु० ॥ चिदानंद चिंतन सन्म-
नरंजन । दे सुख सज्जन तव नामीं ॥ १ ॥ पूर्ण दया करीं
ताप समूळ हरीं । दे सुख अंतरीं निरिच्छ पर दामीं ॥ २ ॥
करीं अवलोकन भवविच्छेदन । सोहिरा शरण तव पद-
पद्मीं ॥ ३ ॥

पद ८५.

राम धणी माझा अलगट देखेन मीं कधीं हो ॥ ध्रु० ॥ माया
अहंकार सर्वही निरसुनि । सर्व पदीं समभान तदीं हो ॥ १ ॥
सर्व सुदीन हरी दुःख निवारी । पार करी भवनीरनदीं हो ॥२॥
निज ज्योति कळा दावीं घननीळा । सोहिरा शरण तव निज
पदींहो ॥ ३ ॥

पद ८६.

पूर्ण हरी भव तारी निजजन ॥ ध्रु० ॥ आपण प्रकटुनि
भक्तजना सुखि । प्रेम घेतो निज नाम तन मन ॥ १ ॥ निज
ज्योतितत्वीं आपण तत्वता । करी भक्त भवबंधीं मोचन
॥ २ ॥ जाणुनियां मनिं सोहिरा अनुदिनीं । भावें करी तुझें
ध्यान भजन ॥ ३ ॥

पद ८७.

हरी तूं मीं एक पाहतां निष्टंक ॥ ध्रु० ॥ वेदशास्त्रें वाचाळ-
पणें । मिथ्याभेदी ते वादीक ॥१॥ चहुंवाचातीत सौख्य ज्याचें ।
काय सांगों तें अमुक ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निर्गुणीं भावोनि ।
सगुणींचा जो नायक ॥ ३ ॥

पद ८८.

सारंगपाणी आणी आणी हो ॥ ध्रु० ॥ विरहपणें मज नाहीं निजीं निज । विषयसुख नयनीं नाणीं ॥ १ ॥ मथुरेसी जाऊनी सर्वेचि येउनी । येईं सये वो साजणी ॥ २ ॥ गोरस घेउनी नित्य सेवितो । सोहिरा वंदी हो निज दाणी ॥ ३ ॥

पद ८९.

बोलरे नाम गोविंदाचें ॥ध्रु०॥ तन मन धन तें जाणुनि अंतरीं । घोष करीं कां निशिदिनीं वाचे ॥ १ ॥ नामस्मरणीं भवभयहरणीं । जयप्रद निजसुखाचें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे नाहीं मीतूंपण । हरेल भान हें विषयसुखाचें ॥ ३ ॥

पद ९०.

रामा काय तुज विसरूंरे ॥ ध्रु० ॥ पहातां नयनीं जन तद्रूप अवघें । दीधलासी पूर्ण अभेदवरू ॥ १ ॥ साम्य समाउनि निजरूप दाउनी । ठेविसी निजतलयासि स्थिरू ॥ २ ॥ बोलवेना बोलें ऐसें तुवां केलें । सोहिरा ह्मणे देहीचि तरू ॥ ३ ॥

पद ९१.

येईं वो हरी सांवळिया ॥ ध्रु० ॥ अहर्निशि गोधनें चारिसी न दिससि गोवळिया । सहस्र गोपींत तूं खेळसि आनंदें घालीसि गोंदळिया ॥ १ ॥ कदंबाचे तळीं मुरली वाजतां ऐकुनि येती मज कळवळिया । सर्वरूपीं तूंचि एक देखोनि सोहिरा ह्मणे गातों लळिया ॥ २ ॥

पद ९२.

हर हर भोळा । जिविं जीवाचा जिव्हाळा ॥ ध्रु० ॥ जीवपणाला जाणोनि, जिवपण आपणीं, यांतें नेणोनि, जो निराळा ॥ १ ॥ अवंच योगसमाधी, बुद्धिवंता टकली बुद्धि, ते चित्कळा ॥ २ ॥ कर्ता करविता हे दोन्ही, नाहिं एकपणालागुनि,

जैसें तरुचें फळ जावळा ॥ ३ ॥ सोहिरा बोले अनेक जल्पा, ज्याचें स्वरूप आहे अजपा, जाणें विरळा ॥ ४ ॥

पद ९३.

अरे कां रे दया करीना जगज्जीवना ॥ ध्रु० ॥ विकल्प उपजविसी, सर्वें नश्वर या जीवासी । निश्चय एकचि होईना॥१॥ वृत्ति हे डळमळी, माझी प्रवृत्ति कळवळी । येती विकार नाना ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निजतत्वचि कीर, येर हें मृगनिर । ऐसें दावीं निरंजना ॥ ३ ॥

पद ९४.

मन माझें हरीनामीं रंगलें ॥ ध्रु० ॥ ज्यांहीं करोनियां, निघलों निजावया । तेथेंचि तें रमलें ॥ १ ॥ अनाहत गजर, नाद निरंतर । ऐकुनियां भुललें ॥ २ ॥ जेथ पाहुं गेलें, परतोनि न आलें । सोहिरा ह्मणे मोह पडिलें ॥ ३ ॥

पद ९५.

मुकुंदा आनंदकंदा ॥ ध्रु० ॥ तुजलागीं ध्यातां । हृदयीं दिससि सर्वदा ॥ १ ॥ निजस्वरूप देवतां भवबंध तुटतां । नलगे जन हें आपदा ॥ २ ॥ सनकसनंदना योगियां दुर्लभा । तें सुख निजपदा ॥ ३ ॥

पद ९६.

आणी आणी यदुराज सये ॥ ध्रु० ॥ स्वरूपानुसंधनीं, श्रोत्रत्व वेधुनी, तेंचि निजकानीं कुंडलें विराज ॥ १ ॥ जगदाभास हा, अभिन्नपणीं, देखति नयनसरोज ॥ २ ॥ एक वर्ण हें, श्यामतनु दिसे, पुरुषार्थ चतुर्भुज ॥ ३ ॥ अंतरदृष्टि हे, त्रिकुटावरी, भाळी टिळक देख रज ॥ ४ ॥ कदंबावरुनि हरी, गोधनें चारी, मुखिं अनाहत वेणु वाजे ॥ ५ ॥ मूर्ति मोहनि, आणुनियां मनीं, सोहिरा योजी निजकाज ॥ ६ ॥

पद ९७.

श्रीहरीच्या निज लाग छंदा ॥ ध्रु० ॥ उत्तमांतील उत्तम पद हें जाण सुखादिक जें सांडुनि सकाम धंदा ॥ १ ॥ दृश्य विषय त्यागीं बरवें आत्मसुख भोगीं सावध स्वरूपीं हो मंदा ॥ २ ॥ निज तेंजीं सोकारिं पहिलें सोहंबीज होंकारीं निर्मूळउत्पत्तिकरकंदा ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा निजरंगीं पै रमतां केवळ स्वपद ये हाता सर्वें देखसी गोविंदा ॥ ४ ॥

पद ९८.

करीं करुणा जगदा प्रेम निरंत ॥ ध्रु० ॥ एक बहुपणें साम्य समाहित । गुणीं असोनि गुणातीत ॥ १ ॥ वंदिन मानसें भलंतशी मिसें । देखे स्वरूप रूपादीत ॥ २ ॥ हरणि करोनियां जाइल वायां । जाणोनियां मग नेणत ॥ ३ ॥ मागील पुढील कांहींचि नाहीं । सोहिरा देहिंचि देहातीत ॥ ४ ॥

पद ९९.

हे महाराजा दीनदयालनिधी ॥ ध्रु० ॥ आपें आपण देखलिया निज । असती तूं सहज समाधी ॥ १ ॥ पूर्णपणें तुज नलगे हें कांहींच । सुख दुःख भवधी ॥ २ ॥ एकी एक हा भावोनियां जहीं । न राहे सोहिरा विविधीं ॥ ३ ॥

पद १००.

हरी माझा सखा जिवलग जो निधान ॥ध्रु०॥ आपणावीण कांहिचि नाहीं । देत असे निजध्यान ॥ १ ॥ दोन्हि वेळे साभासिंच हे देख । जयाचें निर्गुण अभिधान ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निजस्वरूपीं । ज्यांहीं लाविलें अवधान ॥ ३ ॥

पद १०१.

निजजिवींचा जिवलग राम बोल ॥ ध्रु० ॥ तनमनध्यान करोनि निमग्न । घे अनुभव सखोल ॥ १ ॥ जीवशिव दोन्ही

वेगळे नाहीं । ऐसें ज्ञान गमेल ॥ २ ॥ प्रेमानंदीं धरोनि विविधीं । चित्त स्वरूपीं जडेल ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मग निवृत्ति पावोनि । प्रवृत्ति दिसे नवल ॥ ४ ॥

पद १०२.

या हरिनें माझें हरिलें मन ॥ ध्रु० ॥ अवघाचि आपण बुजउनि हे खुण । पालतां जहीं झालें अमन ॥ १ ॥ स्वरूप सोडुनि दुजे भावनीं । करूं नये मग दूरी गमन ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग इंद्रियवृत्तिसि । तें सुख सेऊनि झालें शमन ॥ ३ ॥

पद १०३.

श्रीरामनाम वदनीं वद कांरे प्रियकर भक्ता ॥ ध्रु० ॥ दोन्ही करकमळ सज्जित, टाळी पिटीं करि निर्धूत । घोष करीं नाम गर्जत, आणि निजनयनीं अव्यक्तव्यक्ता ॥ १ ॥ लक्ष निजस्वरूपीं लाहें, त्यांत परब्रह्म आहे । दुजें निजदृष्टीं न पाहें मार्ग लक्षिती तुज निजमुक्ता ॥ २ ॥ माया प्रवृत्तिचा भास, व्यर्थ सर्वचि होत नाश । जातो वया वा नाश, सोहिरा प्राथितसे निजस्वरूप उक्ता ॥ ३ ॥

पद १०४.

नारायण चतुराक्षरीं जपतां प्रकटे स्वस्वरूप । सज्जनिं भजनीं विजनिं जनिं या रूपातीतरूप ॥ ध्रु० ॥ नाना छंद नाना लीला खेळतसे जना । नाम ज्याचें घेतां पुरवी सकळहि कामना । नाना शास्त्रें न लगति कांहीं आणिक साधना ॥ १ ॥ रासक्रीडा खेळत असतो यमुनातीरा । राधिका समवेत संगें अनेक सुंदरा । राजा रंक समान ज्यासी स्वरूपीं निर्धारा ॥२॥ यशवंत जाणोनि ज्याचा यम धरी भय । एकचि निश्चय भावीं

---

१. पहिल्या पदाप्रमाणें यांतही “नारायण” या चार अक्षरांवर चार कडवीं रचिलीं आहेत.

त्यातें सुख अप्रमेय । येणें जाणें नाहीं पुनरपि निर्गुण निर्भय ॥ ३ ॥ णकार स्मरतां नित्य होय निजनादश्रवण । जेथ गेल्या जुरेचि मग हें माझें मीपण । सोहिरा ह्मणे कीं मग हें चुकतें भवदुःखभ्रमण ॥ ४ ॥

पद १०५.

आणि हरी सये वो निजनयनीं ॥ ध्रु० ॥ आत्माराम हा भावि आराम । त्याविणें नीज नये ॥ १ ॥ आपें आपण पुरुषपण । देखोनि सुंदर प्रिये ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग प्रेमसुखामृत । सेऊनि सहज निलय ॥ ३ ॥

पद १०६.

असें वाचे बरें बोल । रामरंगीं डोल ॥ध्रु०॥ जीव रूप हा शिवपदीं पावाया । अनुभव एक सखोल ॥ १ ॥ देहभावासि या विवशी येउनि । चित्त स्वरूपीं वेधेल ॥ २ ॥ मायाजाळ हें मिथ्या भावोनि । चैतन्य एक निवटेल ॥ ३ ॥ सकळ मनोगम हारोनि आराम । निलय तें सोहिरा समजेल ॥ ४ ॥

पद १०७.

जय जय महादेवी । तुज गाईन अनुभवीं ॥ ध्रु० ॥ अंतरदृष्टी नांदसि, सवें निजसुखें वससि । नससि अविद्याग्रामीं ॥१॥ उभयपदींची स्वामिणी, सवें देखिजे निर्गुणी । एकीं एक तूं बरवी ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग गुण गावे, या करिसी उपाया । चारी वाचा चोववि ॥ ३ ॥

पद १०८.

गंगे निज भागीरथी ॥ ध्रु० ॥ चहुंवाचि वाचाळ, धोवोनियां निर्मळ । न्हेइं शांतीचिया पंथीं ॥ १ ॥ शम दम शांतिणी, तटांकाचे स्वामिणी । तुजविणें योगचि हा नाथीं ॥ २ ॥ कलिमलनाशिनी, विमळाक्षलक्षणी । सोहिरा ह्मणे जीवन वो मथीं ॥ ३ ॥

पद १०९.

मुरारी नांदे निरंतरीं ॥ ध्रु० ॥ ऐसेंचि भावुनी नित्य समाधानीं। पाहें पां अंतरीं ॥ १ ॥ ज्याचिये स्मरणीं ज्ञान उगाणी। भवभ्रम दूर करी ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग अनुभवीं पाहतां। जन्ममरण वारीं ॥ ३ ॥

पद ११०.

याहो या वर गिरिवरधारी रंग भर ॥ ध्रु० ॥ मोहन मूरत, सांवळी सूरत। मोर मुकुट आभार ॥ १ ॥ नेसे पीतांबर, निज मुखांतर। मुरली ध्वनि हे नभभर ॥ २ ॥ सोहिरा म्हणे, तुझे कृपे लागुनी। न धरेचि हा भवभार ॥ ३ ॥

पद १११.

हरी हरी म्हणतां रे अपार सुख तें ॥ ध्रु० ॥ स्मरणें निमग्न स्वरूपीं सलग्ना। सगुणीचि निर्गुण सुख तें ॥ १ ॥ अंतरसाक्ष जपणें अलक्ष। सर्वे निवारी दुःखातें ॥ २ ॥ मन विलास हा होय निरास। विषयसुखचि मग दुःख तें ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे निजानंदीं। पावोनि सेवीं पीयुख तें ॥ ४ ॥

पद ११२.

चार चारती धेनुरे। गोपाळ वाजवी वेणु ॥ ध्रु० ॥ उषःकाळिंचे समयीं, गिरिधर प्रेम लयाचा ठाई। नूपुरें वाजति रुणझुण ॥ १ ॥ शुक बोलत होते शब्द, ऐकोनि सकळ झाले स्तब्ध। नादीं लुब्धला हरणु ॥ २ ॥ तर्कस लाउनियां, वोढिली कानाडि। ऐकोनि विसरला तो बाणु ॥ ३ ॥ गुण ऐकोनि दुर्लभ, सोहिरा ह्मणे होतो लाभ। ऐशा कैसा ध्यानीं नाणुं ॥ ४ ॥

पद ११३.

आतां चिंता ते कायसी। निजसुख घरीं आपैसीं ॥ ध्रु० ॥ सदैव निज उल्हासीं। राहोनी हरीं हे माया विवसी ॥ १ ।

कांहीं कल्पूं नका मानसीं । स्वेच्छा करितो हृषीकेशी ॥ २ ॥ भक्तांचेया काजा । धांवणें लागे अधोक्षजा ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे करणें धरणें । अवघें देवा हातीं होणें ॥ ४ ॥

पद ११४.

नित्य स्मरण तुझें हरी रूप दुजें ॥ ध्रु० ॥ हें बहु नाम, पाववी निजधाम । परमामृतसुख सेउं जें ॥ १ ॥ आपेंचि आपण, येथील हे खुण । जाणोनि माझें हें मीचि बुझें ॥ २ ॥ कल्पविकल्प हे, हारोनियां जहीं । सांगत निजजीवींचि गुजें ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे मग, तेंही विसरोनि । निजसुखीं निजलाचि निजें ॥ ४ ॥

पद ११५.

दावीं वदन हरीं हा मदन ॥ ध्रु० ॥ याविसीं मज-देईं विवसी । येउनि पावें तें निजसुखसदन ॥ १ ॥ सकळ इंद्रियें न्हेईं निजलये । सर्वेंचि आटुनि करीं कां कदन ॥ २ ॥ सोहिरा म्हणे परात्पररूपी । जीवपण हारोनि करि कां तदन ॥ ३ ॥

पद ११६.

तुझा तूंचि राखें जी हें निजब्रीद ॥ ध्रु० ॥ निःकाम निर्द्वंद्व निःसंग निर्मळ । जितेंद्रिय तूं ब्रह्मविद ॥ १ ॥ तुजला देखतां आपेंचि तत्वतां । आनंदती नयनारविंद ॥ २ ॥ सोहिरा म्हणे निशिदिनीं भावितां । हृदयींचि तूं गोविंद ॥ ३ ॥

पद ११७.

हे घनश्यामा करीं कां आरामा ॥ ध्रु० ॥ आनंदें आनंद होय स्वतःसिद्ध । अंतरीं चित्तरामा ॥ १ ॥ हें सुख सार जाण निरंतर । संवें हा भवभास विरामा ॥ २ ॥ एके एक हा सर्व समूहा । तेथ देखे कोण परामा ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे जहीं आहे अनुपम । येथ येऊं कोण सरामा ॥ ४ ॥

पद ११८.

तुझी अघटित करणी। बोलणी हीचि उणी॥ ध्रु०॥ आपें आपण दृश्य प्रकाशिक। देखों दिलाजे तरणी॥ १॥ अविनाश तूं नाशिवंत हें। देह जननमरणीं॥ २॥ आत्मानुभवीं माया अवयव। हरसी संसरणी॥ ३॥ सोहिरा म्हणे जहीं एकी अनेक। भावोनि लागें चरणीं॥ ४॥

पद ११९.

गोपिनाथ गोवर्धनधरणा करीं याचि स्मरणा। अनन्यगतिनें शरणागत हो चुकवीं भवभ्रमणा॥ ध्रु०॥ गोधनें चारी वेषधारी छंद मना लागो। गोकुळिं काना नाना लीला करोनि निस्पृह गो। गोळा भक्षित नवनीताचा चोरी लग नलगो। गोडी लावीत गोपस्त्रियांला विलसत रसरंगो॥ १॥ पिष्ट पाडि तो दानव मर्दुनि पाळितो अनुतापीं। पिडा निवारित संसाराची कामक्रोध शापी। पिशाच उन्मत बाळवृत्तिनें पाहती कुप वापी। पिकलें सुख हें समाधिचें जो कधिना उत्थापी॥ २॥ नामरूपातीत चिंतुनी लाउनियां ध्याना। नारी नव्हे पुरुष नव्हे तर्काला येईना। नारायण अवतार वसंत हा यदुवंश राना। नाहीं आहे ह्मणतां नये वेदस्तुति रिघेना॥ ३॥ थरारीत हें पातक ज्याचा स्मरतांचि पंथ। थकित चकित हे साधक सिद्ध कथिती हो ग्रंथ। थराथरानें त्रिभुवनिं भरिले जिव हे अनाथ। येथ सोडुनि ह्मणे सोहिरा पाव तूं परमार्थ॥ ४॥

पद १२०.

केशव अचुत परमानंदा स्मर त्या गोविंदा। सर्व त्यागुनि अंतरिं स्मर तूं याचि लाग छंदा॥ ध्रु०॥ केशि मारिला प्रताप केला दैत्य सकळ जिंके। केवढी ज्याची महिमा वर्णन

१. या दोन्हीं पदांत पहिल्या पदाप्रमाणेंच अनुक्रमें "गोपीनाथ" व "केशव" या अक्षरांवर कडवीं रचिलीं आहेत.

वेद करूं न शके । केवैला जेवढा खेळ जयानें क्षणभंगुर असके । केवळ ब्रह्म हें जाणुनि बैस विमनाचिये वसके ॥ १ ॥ शरणागत हा वत्सल स्वामी सर्वांचा ईश । सद्गुण ऐश्वर्य ज्यापाशीं तें पावसी तूं यश । षट् नष्ट हे कामक्रोध कीं पावति हे नाश । शशि सूर्य ज्या तेजें झांकती अनादि अविनाश ॥ २ ॥ वर्जित दृश्य पदार्थ ही ऐसा देतो अनुभव । वरचील मत हें नचले जेथ आहे स्वयमेव । वश्यभक्तिला होय निपट वेडा कीं देव । वरद सोहिरा वदे किं ऐसा एकचि जिव शिव ॥ ३ ॥

पद १२१.

हरी निज निर्धारीं भावा तुम्हीं निरंतरिं हो ॥ ध्रु० ॥ स्मरण सुखें संतोषे, निज आनंदें उल्हासे । आपण प्रकटे पां अंतरीं हो ॥ १ ॥ अवलोकितां सृष्टी, सर्वे निजात्मतेचे दृष्टी । दिसे आपण चराचरीं हो ॥ २ ॥ भावें जऱ्हीं भावाल, सर्वे निजसुख पावाल । श्रम नाहीं हे संसारीं हो ॥ ३ ॥ साभासाला हरीला, भासीं अवभास दावीला । सोहिरा ह्मणे निराकारी हा ॥ ४ ॥

पद १२२.

कां सत्व पाहासी हृषीकेशी । प्रकट न करितां अंतरीं आपैसीं । पाडिसी मिथ्या अविचार माया विवसी । -अझुनि करुणा तुजला नये रे कैसी ॥ ध्रु० ॥ मज या देहीं देउनि जीवपण । विषयविलासीं लाउनियां भ्रमण । माझें मज न दाउनि निज उगाण । ऐसें तुझें काय तें बरवेपण ॥ १ ॥ जगप्रसिद्ध तूं कीं दीनदयाळ । तुजला उपजे निजभक्तांची कळवळ । त्याकारणें परमामृत कल्होळ । सेविसी तूं अंतरींच घननीळ ॥ २ ॥ कां रे सत्वर नवजाइं मीं या विकल्पाच्या काजा । ऐसें करिं कां जगज्जीवना अधोक्षजा । कारण कार्यीं प्रकटोनियां सहजां । हेंचि भावोनि अभाव निजीं निजा ॥ ३ ॥ सोहिरा

तुज शरण येतो भावें । भावातीत परब्रह्मचि आघवें । बोलों जातां तें शब्दासी न ठावें । पूर्णज्ञान आपणापेंचि घावें ॥ ४॥

पद १२३.

निराकार निर्द्वंद्वा निर्गुण परब्रम्हा । तुझेनि योगें परमसुख आम्हां ॥ ध्रु० ॥ तुझिया स्वरूपाचि नकळे मजला मति । वाचा कृष्ण कृष्ण म्हणउनि गाती । निरंजना पावों तुज श्रीपति । तुझी देइं मजला निजभक्ति ॥ १ ॥ तुझा तूंची बोलविसी वाचे करवीं । अनुभवाचीं बोलणीं ऐसीं बरवीं । मनकमळ प्रकासीं आत्मारवि । तुझें ज्ञान योगीं हा मिरवीरे ॥ २ ॥ निराकार तुझा तूंचि सहज महाराजा । सर्वस्वरूपीं अससी तूं विराजा । तूंची जीवन नलिनी कायाकंजा । तुझिया नामाचा त्रिभुवनीं गराजा ॥ ३ ॥ सोहिरा तुझ्या नामेंचि रुतला । प्रेमयुक्त तेथेंचि गुंतला । परमामृत सेवुनियां शांतला । ज्याचे दृष्टी भव हा विरूंतला ॥ ४ ॥

पद १२४.

नाम तुझें म्यां घेतां निशिदिनीं विसरें हें भवदुःख ॥ ध्रु०॥ राम कृष्ण ह्मणतां वाटे सहजींचा हरिख ॥ १ ॥ परा प्रमेय होवरियेंत भोगीं शांती सुख ॥ २ ॥ निरंजनीं निजल्या मन हें असतां नाहीं देख ॥ ३ ॥ अध भास हा सोडुनि आपेंचि करीं तें ऊर्ध्वमुख ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे हें अनादी । भेटे मजमाजी पियूख ॥ ५ ॥

पद १२५.

हरी नाम सुधारस हा नित्य सेउनियां ध्यावें ॥ध्रु०॥ आपेंचि आपण, घेउनि हे खुण । मोक्षसुख साधावें ॥ १ ॥ अलक्ष लक्षुनि, सहज समाधी हे । चित्त स्वरूपीं वेधावें ॥ २ ॥ सोहिरा म्हणे, सकळांसि गणी ते । मीपण हें शोधावें ॥ ३ ॥

पद १२६.

अपरिमित अविनाश अनामा ॥ ध्रु० ॥ निराकार निर्विकार निरालंबीं निजसुख धाम ॥ १ ॥ निरामय निर्गुण निरंतर निगम अगम्य आत्मारामा ॥ २ ॥ निरुपाधि निसंग निर्मळ निर्भर अत्यानंद निरुपमा ॥ ३ ॥ अनादि अखंड अद्वैत अभेद अनवरत अमृतघन आरामा ॥ ४ ॥ देवा भक्तकल्पद्रुमा हृदय-आरामा मुनिजनमनविश्रामा ॥ ५ ॥ जगअभ्रव्योमा परा प्रमदा प्रेमा सोहिरा म्हणे अगमा ॥ ६ ॥

पद १२७.

छंद लागला हो अखंड श्रीनाथजीचा ॥ ध्रु० ॥ सहज हरीख जेथ नाहीं रूप रेख । तो हा देख गोरखनाथजीचा ॥ १ ॥ मनमोहन गहन सज्जनरंजन । आलेख निरंजनजीचा ॥ २ ॥ निःसंग निःकाम कल्पद्रुम हा आराम । सहज आत्माराम नाथजीचा ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे भोगी ना त्यागी अनाहत शिंगी । विराज राजयोगी जोगीनाथजीचा ॥ ४ ॥

पद १२८.

लागो रे आवडी तुझीच अखंड आत्मारामा ॥ ध्रु० ॥ आजी मजमाजी भक्तकाजकल्पद्रुमा ॥ १ ॥ जीवींचें हें गुज सोहंबीज निजधामा ॥ २ ॥ कल्पना हे टाळों मीं गळों मिळों निरंतर आरामा ॥ ३ ॥ निराकार निराधार निःसंग निःकामा ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे आकार सांडुनियां तदाकार सदा सुख आह्मां ॥ ५ ॥

पद १२९.

देशिल जरी तरी हें देणें ॥ ध्रु० ॥ मींपण मावळे दिठी पुंजाळे कल्पना गळे जग जळे हें तेणें ॥ १ ॥ विषयां वेगळें सुख नाहीं रूपरेख सहज समाधान होय जेणें ॥ २ ॥ जळीं मिळालें

लवण जळचि झालें तेवीं मनासि नाहीं येणें ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे जया काया नाहीं माया पवन गगनीं लयासि न्हेणें ॥४॥

पद १३०.

तुजविणरे दाता तारी कोण मज आतां ॥ ध्रु० ॥ या त्रिविधपणें मज वेढुनि केला वहुसाळ वेडा येथ न चले मम सत्ता ॥ १ ॥ विदेहता नाठवूनि झाली देह स्वसिद्धता अज्ञानें आकळुनी पृष्ठीं लागली ममता ॥ २ ॥ विकल्प उदधी पडोनि बुडतों समूळ मी पाहीं काढी कोण तरि वरुता ॥ ३ ॥ जाणोनियां मानीवरी तूं अकल्पित देसी वंदी सोहिरा देहातीता ॥ ४ ॥

पद १३१.

तुझिया स्वरूपीं हें मन सुखावलें हो ॥ ध्रु० ॥ आकारातीत निरंतरा तूं निर्गुण निराकारा ॥ १ ॥ परात्पर प्रेमातीत अकल्प कल्पद्रुमा ॥ २ ॥ सदसत्संता देवा तूं प्रबुद्धवनवसंता ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे दीनबंधु परमामृतसिंधु ॥ ४ ॥

पद १३२.

रंगलों या हरी रंगीं लौकिक लाज सांडुनि ॥ ध्रु० ॥ नगवत् जग मग मानुनि शुद्ध सुवर्णीं सुरंगीं ॥ १ ॥ सोडुनि संग निसंग झालों चैतन्यसिंधुतरंगीं ॥ २ ॥ सोहिरा म्हणे मज अवचित देणें येणें जग चळे जेणें येकचि हा तंतु दुरंगी ॥ ३ ॥

पद १३३.

करणी तुझी अलगट ॥ध्रु०॥ आपलिया पदीं या प्रेम देउनि । हरिसी भवसंकट ॥ १ ॥ स्वरूपसंबंधीं देसी समाधी । नित्य सुखामृतघोंट ॥ २ ॥ सोहिरा म्हणे जहींचि विकृति । झाली मनासि तहीं भेट ॥ ३ ॥

पद १३४.

आलों संसारीं आम्हीं कराया सेवा ॥ ध्रु० ॥ भावातीत निखिल निरंजन निर्विकार या निर्गुण देवा ॥ १ ॥ सर्वही सोडुनि प्रपंच हा घेउनि बैसलों निजधन ठेवा ॥ २॥ श्रवण मनन निजध्यास तुजसीं ध्यातों निशिदिनीं दयार्णवा ॥ ३ ॥ नको हे जन नलगे भोजन खाउनि बैसलों हाचि मेवा ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे तुज अनादिसिद्धा गोसांविया महानुभावा ॥ ५ ॥

पद १३५.

देव म्हणोनि हाक मारोनि सरली मग उरली चैतन्यप्रभा॥ध्रु०॥ देव म्हणोनि पाहुं जातों शेवटीं होय तोचि तो ॥ १ ॥ पाहाणेचि पडली तुटी तंव जिवनामाचि जाहाली बोभाटी ॥ २ ॥ सोहिरा म्हणे हेंचि समज बिज मग सुखेंचि निज आपुल्या ठायीं ॥ ३ ॥

पद १३६.

माई वो सखि दीनदयाळी ॥ ध्रु० ॥ भावें भावितां करणी अगम्य तुझें स्वरूप नवाळीहो ॥ १ ॥ ऊर्ध्व मुळींहुनि शाखा आदी करोनि तरूची जिव्हाळीहो ॥ २ ॥ साम्यसमरसी चिद्विलासी असंसी निजि निर्मळीहो ॥ ३ ॥ आर्तरूपें तुज जाणुनि सहज सोहिरा शरण तव चरणकमळींहो ॥ ४ ॥

पद १३७.

कायतरी उणें निजस्मरणें ॥ ध्रु० ॥ याही सुखाहुनि थोर आनीं । नाहीं दुजें तुळणें ॥ १ ॥ सौख्य परात्पर भावोनि तत्पर। द्यावें हें शाहाणें ॥ २ ॥ निजघर टाकुनि दुजे स्थानीं । कासयासि फिरणें ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे दृढ पैंगा । निजहृदयीं धरणें ॥ ४ ॥

पद १३८.

नाम हरीचें जपतां गोड ॥ ध्रु० ॥ प्रेमोल्हासें ज्योति प्रकाशे । पुरतें निजसुख कोड ॥ १ ॥ नित्य निजरंगीं ज्ञान

अनंगीं । नलगे इंद्रिय चाड ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग निज संजीवनी । न धरे संशय आड ॥ ३ ॥

पद १३९.

तुज कोण तरी गाय हरी ॥ ध्रु० ॥ सद्रूप भास हा अमल शोपणी । देती झुळत झुलरी ॥ १ ॥ चिद्रूप सागरीं आपुलिया भरीं । आपेंचि येती लहरी ॥ २ ॥ आनंदात्मया ब्रह्मांडीहुनी । बोलवी निज वैखरी ॥ ३ ॥ स्वरूपीं संभाउनि ज्योति प्रकाशुनि । सहज सोहिरा देहधारी ॥ ४ ॥

पद १४०.

हे घनश्याम गाऊं निज नामसुधा ॥ ध्रु० ॥ निजसुख एकचि मानुनि साचि हरूं हा भास विविधा ॥ १ ॥ नित्य ध्यान हें गोड निदान नाहीं मग हा भवबाधा ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निज दिठीलागोनि देखे स्वरूप अगाधा ॥ ३ ॥

पद १४१.

लागोरे तुझें ध्यान परब्रह्म ॥ ध्रु० ॥ व्यक्त ना वर्ण आनंदपूर्ण । तेथें हें अंतःकरण ॥ १ ॥ आत्म आडवीये निर्गुणा चाडि हे । अविट गोडिये मन ॥ २ ॥ घेऊं जातां बुद्धि विराली हे बुद्धि । निरंतर समाधी ॥ ३ ॥ सर्व सदोदित दिवस ना रात । अचिंत चिंतनीं चित्त ॥ ४ ॥ नाम न पवन गगन लगन । सर्वा निराळा ब्रह्मांड गोळा तेथचि किं हा डोळा ॥ ५ ॥ सृष्टीचें बीज सत्ता सहज हें उन्मनि निज । सोहिरा ह्मणे निजधाम अनामा अखंड आत्माराम ॥ ६ ॥

२. उपदेशपर पदें.

पद १.

तो धन्य प्राणी। हरिगुण अति रस वर्णित वाणीं ॥ध्रु०॥ नरदेहीं सावध जाहला, विवेक हा हृदयीं आला, नित्य निजबोधें धाला, ब्रह्मानंदें निमाला। संकल्प विकल्प चित्तीं न आणी ॥ तो धन्य० ॥ १ ॥ भ्रमभेद ज्याचा गेला, निश्चय हा ज्याणें केला, तन्मय होऊनि ठेला, जिताचि असतां कीं मेला। अंतीं गति पावला निर्वाणीं ॥ तो धन्य०॥ २ ॥ अविनाशीं घेतो गोडी, नाशिवंत संग सोडी, कल्पना हे समूळ मोडी, मनाच्या अनेक ओढी। पुनरपि न पडे ताणाताणी ॥ तो धन्य०॥ ३ ॥ नामरूप मिथ्या भास, म्हणुनियां धरिना आस, वैराग्यें हा उपजे त्रास, करी निरंजनीं वास। आत्महित पुरतें ध्यानीं आणीं ॥ तो धन्य० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे सारांश, शोधियला शुद्धांश, ज्याणें उद्धरिला वंश, जैसा कीं तो राजहंस। निवडितो दूध आणि पाणी ॥ तो धन्य० ॥ ५ ॥

पद २.

स्मर हर त्रिभुवनपती, तूं प्राण्या पावसि परमा गती ॥ ध्रु०॥ सद्बुद्धि नारी पतिव्रतेला, प्रियकर जो कां पती। निःसंग अनंग बहुरंग दावी, जग तरंग अपांपती ॥ स्मर० ॥ १ ॥ जयालागीं हें जप तप साधन, साधकजन विलपती। ध्यानामृत पित तद्रुप जाहलें, संसारीं न लपती ॥ स्मर० ॥ २ ॥ अंतर्गत हा न कळे आत्मा, जीव विस्मृत मूढमती। चिदानंद चित्स्वरूपीं सावध, करीं बा दृढतर मती ॥ स्मर० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा लाघव घेईं तूं, भजन कळा धांवती। ईश्वरीं लय हें लाविं जों वरी, आयुष्याची आवती ॥ स्मर० ॥ ४ ॥

पद ३.

क्रम परमेश्वरभजनीं काळ ॥ ध्रु० ॥ विषयविलासीं, भुकाळ असती, मूर्खपणेंचि हा काळ । हरिनामाचा सुकाळ, न करिसी दंडिल यम हा सकाळ ॥ क्रम० ॥ १ ॥ इतर कल्पना गाळ, भावें संतचरण चोंगाळ । होउनियां प्रेमाळ, अंतरीं हेचि धरीं जपमाळ ॥ क्रम० ॥ २ ॥ ज्ञानाग्नीची ज्वाळ, वरी हा घालीं मनोगत राळ । उडत अंबरीं मराळ, तेवीं लय लावीं अंतराळ ॥ क्रम० ॥ ३ ॥ आत्माराम नृपाळ, तुजवरी होईल पूर्ण कृपाळ । मग पिटणें नलगे कपाळ, सद्गुरू उपदेशवचन पाळ ॥ क्रम० ॥ ४ ॥ म्हणे सोहिरा देख ढिसाळ, तो महानद सिंधु रसाळ । उगेंचि शिणउनि काय शिसाळ, हे इतर देव नदिन्हाळ ॥ क्रम० ॥ ५ ॥

पद ४.

आतां तरीं सोडींरे हा संग । जनीं वनीं हो निःसंग ॥ ध्रु० ॥ विषयसंयोगें धरिसी सोंग, दुःखेंचि होसी दंग । अभ्र साहुलि जेवीं बाहुली, वेगडीचा हा रंग ॥ आतां० ॥ १ ॥ परनारीसी करूनी परती, आवरीं हा कीं अनंग । ब्रह्मरसाचे भावाविण रज, तमें होय जिव वंग ॥ आतां० ॥ २ ॥ योगाभ्यासें करुनी साधीं, बैठक पवनतुरंग । धांवे जेथ कीं तेथ धरावा, हा मन चपल कुरंग ॥ आतां० ॥ ३ ॥ नसोनि दिसतें केवळ जग हें, मृगजळींचे कीं तरंग । चिद्भानु हा कारण आत्मा, पहा तूं कीं अंतरंग ॥ आतां० ॥ ४ ॥ म्हणे सोहिरा निर्गुण ध्यानीं नये तरि, स्मरी सांवळी मूर्ति सुरंग । वैकुंठपति हा व्यापक विष्णु, अवघाचि कीं श्रीरंग ॥ आतां० ॥ ५ ॥

पद ५.

तुम्हीं अचल पदीं राहोन सदोदित अद्वय सुख कां घ्याना ॥ ध्रु० ॥ प्रथमहि वाटत गोड विषयसुख, शेवट विषवत् भाना ।

श्रवण मनन अध्यात्म निरूपण, क्षणभरि चित्त कां ध्याना ॥ तुह्मीं० ॥ १ ॥ मायामोहें भ्रमतां रमतां, चेष्टा करितां नाना। ध्यानीं भजनीं मनची नाहीं, व्यर्थचि करितां तनाना ॥ तुह्मीं० ॥ २ ॥ जागृति स्वप्न सुषुप्तित साक्षी, कवण तो आणुनि ध्याना। अभिप्राय गुरुगम्य हें दुर्लभ, नेणुनि आत्मज्ञाना ॥ तुह्मीं० ॥ ३ ॥ निर्मल निश्चल जाणूयां तव, स्वरूप जया अनुमाना। ह्मणे सोहिरा ब्रह्मभुवनिंचें, परमामृत कां ध्याना ॥ तुह्मीं० ॥ ४ ॥

पद ६.

हरिस्मरण विस्मरण तरी तुझें काय जिणें रे असून ॥ ध्रु० ॥ स्वार्थचि साधिसी सार्थक नेणसी, कोणासि पहा तरी पुसून। पुढें नाहीं गति मळिण जाहलि मति, साधुचि संगती नसून ॥ हरि० ॥ १ ॥ रतीविलासीं लंपट होसी, मानस गेलें डसून। लवकर सर कीं पडसिल नरकीं, फुकट मरसिल कुसून ॥ हरि० ॥ २ ॥ आळशि कामा उगा रिकामा, थट्टाचि करिसी बसून। कुकर्माच्या कांहिं वर्मांच्या, गोष्टी सांगसी कसून ॥ हरि० ॥ ३ ॥ शरीर फिरवी तुजला मिरवी, देव असेरे रुसून। जवळी असून तुझे हृदयीं वसून, भगवंत नयेरे दिसून ॥ हरि० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा गुरुनाथ हा, माझ्या हृदयीं घुसून। जनासी उद्धरावया कारणें, वचन सांगतो ठसून ॥ हरि० ॥ ५ ॥

पद ७.

मीं कोण कोठुनि आलों, या शरिरीं हें स्मरण धरा ॥ ध्रु० ॥ कवण कर्म हें केलें, नरदेह कशानें प्राप्त जाहलें। सुख दुःख हें कळुनि आलें, कैसें हाचि विचार करा ॥ मीं कोण० ॥ १ ॥ स्थूल सूक्ष्म पंचभूतांचें, मिथ्या अवघें दिसतें साचें। लाघव सकळिक संसाराचें, सत्वर यांतुनि कढे सरा ॥ मीं कोण० ॥ २ ॥

निरसुनि काम क्रोध, करूनियां दृढ निरोध। जेणें होय कधिं ब्रह्मबोध, हा अंतरीं घ्या शोध बरा ॥ मीं कोण० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणें हेंचि ध्यावें, दृश्यातीत मन व्हावें। फिरूनि आपुल्या मुळीं कीं यावें, येणेंचि हा भवसिंधु तरा ॥ मीं कोण०॥ ४ ॥

पद ८.

हरिभजनाविण काळ घालवूं नकोरे ॥ ध्रु० ॥ दोरिच्या सापा भिउनि भवा, भेटि नाहीं जिवा शिवा। अंतरींचा ज्ञानदिवा, मालवूं नकोरे ॥ हरि० ॥ १ ॥ विवेकाची ठरेल ओल, ऐसे बोलावे कीं बोल। आपुले मतें उगींच चिखल, कालवूं नकोरे ॥ हरि० ॥ २ ॥ संतांचे संगतिनें उमज, आणुनि मनीं पुरतें समज। अनुभवावीण मान, हालवूं नकोरे ॥ हरि० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे ज्ञानज्योती, तेथें कैंचि दिवसराती। तयाविणें नेत्रपाती, हालवूं नकोरे ॥ हरि० ॥ ४ ॥

पद ९.

तो काय प्राणी। विसरला हरिला जन्मापासून ॥ ध्रु० ॥ करितां संसार धंदा, आठवीना गोविंदा, नित्य करी द्वेष निंदा, सांपडला भवबंदा, चिंतेनें चूर केला ग्रासून ॥ तो काय० ॥ १ ॥ भुलला जो शब्दनादीं, संतोषला शास्त्रवादीं। कीर्तिसाठीं विद्या साधी, त्याला अभिमान बाधी। नाना छंदीं बुद्धि गेली नासून ॥ तो काय०॥ २॥ देहाला मीं ऐसें मानी, निरंतर आपणा वानी। पडला संशयाचे रानीं, विचार हा न घे कानीं। डुलतसे मोहमदिरा प्राशून॥ तो काय०॥ ३ ॥ अवकाश जाहल्या वेळे, भलताचि खेळ खेळे। गर्वमदें सदां घोळे, अन्यथा सुखांत लोळे। सांगूं जातां बोले डोळे त्रासून ॥ तो काय० ॥ ४ ॥ लटिकें खरें करी बासून, संसारीं जो घेतो घांसून। नकल करी मारी हांसून, त्रिविधतापें घेतो लासून। दुःखशोकें पडतो दांत वासून ॥ तो काय० ॥५॥ सोहिरा ह्मणे व्यर्थ जन्म

निष्फळ त्याचें क्रियाकर्म। पांघुरला शरीरचर्म, जो कां नेणे शुद्धिचें वर्म। कोण्या कामाचा हा काय असून ॥ तो काय०॥ ६ ॥

पद १०.

केवळ विस्मृति हा प्राणी, ईश्वरीं लय लावीना ॥ ध्रु० ॥ वितंड पाखंड स्थापी, आचरणें महापापी। निंदाद्वेषें सदां दापी, भरेना कीं अनुतापीं। अद्यापिही विषयीं विट येईना ॥ केवळ०॥ १ ॥ आत्मशुद्धि नाहीं ज्याला, उद्योगाखालींच गेला। संसार सराचि केला, निवांत होउनि ठेला। अद्यापिही समजुनि उमजुनि दुष्टबुद्धि जाईना ॥ केवळ० ॥ २ ॥ बहुत जन्म फिरला मागां, अद्यापि जो नव्हे जागा। ज्याला पुढें नरकीं जागा, त्याला तुह्मीं किती सांगा। नायकेच तो येतो रागा, वृत्ती कांहीं साहीना ॥ केवळ० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे संतांचे, भेटिला जो कधीं न वचे। श्रवण मनन कीर्तन न रुचे, निंदा द्वेष बहुत सुचे। विश्वव्यापक हृदयस्थाचे, नित्य गुण गाईना ॥ के० ॥४॥

पद ११.

विसरूं नको तो देव। जो हरी साक्षिभूत स्वयमेव ॥ ध्रु० ॥ तारुण्यकाळीं पुण्यदशेचा होउं पाहतो चेव। रंगरूपाला भुलूं नको तूं पाहत स्त्रियांचे ठेव ॥ विसरूं० ॥ १ ॥ अंतकाळ हा पावे तोंवरी भवसागर हा पेंव। वैराग्यविवेकें संगाविरहित सदैव सुख हें सेव ॥ विसरूं० ॥ २ ॥ पराधीनता पावेल तेव्हां विस्मय पडेल भेव। स्वइच्छ असणें यास्तव घरघर भिक्षा मागुनि जेव ॥ विसरूं० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा त्यावांचून हें शरीर केवळ शव। स्वयंप्रकाशक सत्ता ज्याची चालवी हे अवयव ॥ विसरूं० ॥ ४ ॥

पद १२.

ब्रह्मचि तूं ध्यानीं आणरे प्राण्या ॥ ध्रु० ॥ सर्वांसी पाळक, मनाला चाळक, आंतलीच कळा जाणरे ॥ प्राण्या० ॥ १ ॥

मोहाचें गेह, जीव सहित देह, कोठुनि झालें निर्माण रे ॥ प्राण्या० ॥ २ ॥ नित्य तें पाहतां, तेथेंचि राहतां, कल्पनेची मोडे त्राण रे ॥ प्राण्या० ॥ ३ ॥ आदि मध्य ना, अंत जयाला, विश्रांतिचें हें ठाण रे ॥ प्राण्या० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे, होणें नाहीं, त्याविण निश्चय हाचि प्रमाण रे ॥ प्राण्या० ॥ ५ ॥

पद १३.

मनीं चिंती तो भगवान् । प्राणी मोठा भाग्यवान् ॥ ध्रु० ॥ थोर आणि लहान, ज्याला सर्वही समान । न धरी कोणाची गुमान, कांहीं नलगे आदरमान ॥ मनीं० ॥ १ ॥ पुढें जाणुनि निदान, आधींच देह करी दान । हरिगुणानुवादान, नित्य करी पवित्र कान ॥ मनीं० ॥ २ ॥ चाले वेदशिरोपान, अवरोधी प्राणापान ॥ मनीं० ॥ ३ ॥ जन्ममृत्यूचिया भयान, त्याचें जतन करी ध्यान । सोहिरा ह्मणे झालें त्याला, पूर्ण ब्रह्मज्ञान ॥ मनीं० ॥ ४ ॥

पद १४.

कोठुनि प्राण्या आलासी कोण तूं गा ॥ ध्रु० ॥ भुललासी देहसोंगा, गुंतलासी विषयभोगा, कुपथ्यचि होय भवरोगा, मृगजळाचिया ओघा ॥ कोठुनि० ॥ १ ॥ भार वाहसी वाउगा, श्रमलासी करितांचि निगा, पंचभूतांचा हा बिघा, अम्मल जातें हें तिघां ॥ कोठुनि० ॥ २ ॥ कर्म आलें तुज विभागा, कुरवंडी हे काळ कागा, सुखदुःख हें मागोमागा, विश्रांतीशीं कोण तो जागा ॥ कोठुनि० ॥ ३ ॥ जागृतींत कोण सांगा, स्वप्नावस्थेंत कोण जागा, लावुनियां देहा थांगा ॥ कोठुनि० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे सांग बा गा, कांहीं नको येऊं रागा, न कळे तरी लया लागा ॥ कोठुनि० ॥ ५ ॥

पद १५.

सद्गुरुसी हटका, आतां करा आपली सुटका। दृश्य भास नाश पावे, स्थिर नोहे घटका ॥ ध्रु० ॥ लिंगदेहा ये मृदुता, सांपडेल अटका। आत्मज्ञान उमजुनियां, आधींच तुह्मीं सटका॥ सद्गुरुसी० ॥ १ ॥ करितो लीला टिळे माळा, प्राणी नीटनेटका। केव्हां नेणो पाठीवरी, काळ मारिल झुटका॥ सद्गुरुसी० ॥ २ ॥ भजनावांचुनि कधीं वेळ, नका घालऊं लटका। मनीं राम मुखीं नाम, करीं मार चुटका ॥ सद्गुरुसी०॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे राहुं नका, घट जसा फुटका। निरंजनीं पूर्ण बोध, प्रेम पिवा घुटका ॥ सद्गुरुसी० ॥ ४ ॥

पद १६.

तसा तूं भजरे आपुल्या मुळाला ॥ ध्रु० ॥ नदाखवितां गोडी गुंतुनिया चावडी। शोधुनि काढी जसी मुंगी गुळाला ॥ तसा तूं० ॥ १ ॥ कोठें तें वन कोठें जीवन। धांवत कोरी भ्रमर जैसा कमळाला ॥ तसा तूं० ॥ २ ॥ चंदन आंगा उमगुनी चांगा। जडला तो नाग जसा परिमळाला ॥ तसा तूं० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा देवभक्त एकचि होती। जोतीला ज्योति मिळोनि जाय जसें लवण जळाला ॥ तसा तूं० ॥ ४ ॥

पद १७.

पावेनासी घुर्का, कसारे तूं मूर्खा। जिवाचा हा कोण धणी, आण वेगीं तर्का ॥ ध्रु० ॥ नानापरी संसारींचा, बसतो तुला चर्का। लाज सोडुनी काज करीसी, फुकट पडसी नर्का ॥ पावेना० ॥ १ ॥ रसनेविण कसा घ्यावा, ब्रह्मरस भुर्का। कसा धावा मनावरी, गगनाचा हा बुर्खा ॥ पावेना० ॥ २ ॥ पाखांड लंड बंड द्वेषी, स्पर्श होतां तुर्का। ब्रह्म बीज हाचि द्विज, देखुनियां गुर्का ॥ पावेना० ॥ ३ ॥ आला वेळ तूर्त घ्यावा, साधु-

निया हुकी । विन लज्जा बोध गांज्या, गैव मार झुकी ॥ पावेना० ॥ ४ ॥ वात पित्त देहीं अंतीं, कफाचा हा बकी । सोहिरा ह्मणे जे रीतीनें, मोक्षकाज उकी ॥ पावेना० ॥ ५ ॥

पद १८.

त्या देवाचें तूं दर्शन घे । संसारमोहांतुनि त्वरित निघें ॥ध्रु०॥ आदि मध्य ना अंत जयाला, नेति नेति ह्मणती वेद तयाला । ज्यापासुनि हा ॐकारचि जाहला, ब्रह्माविष्णु हर हे तिघे ॥ त्या देवाचें० ॥ १ ॥ अगम अगोचर सत्ता ज्याची, सहज लीला हे त्याची । जारज स्वेदज अंडज उद्भिज, ज्यापासुनी हे सहज निघे ॥ त्या देवाचें० ॥ २ ॥ दृश्य सकळही निवडुनी पाहतां, निरालंबीं राहतां । प्राणापान ऊर्ध्वही वाहतां, आनंदभुवनीं मन हें रिघे ॥ त्या देवाचें० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा नाहीं शून्याकार, रूप आकार । परब्रह्मची निर्विकार, अंतरीं बाहेर आवघें ॥ त्या देवाचें० ॥ ४ ॥

पद १९.

हकनाहक आयुष्य जाय, प्राण्या तूं उगाच बसशी काय ॥ध्रु०॥ मनासी मानेल तेंच तूं करिसी, देवासी जें कां न साय । विचार बोलुनी करिसी तूं अवघा, कृत्रिम व्यवसाय ॥ हक० ॥१॥ अति प्रीतीनें देहा पाळिसी, भिक्षुकां देसी दुराय । अनुतापाविण नरकीं पडसी, मग हा नचले उपाय ॥ हक० ॥ २ ॥ स्वदारा हो परदारा हो, भुलणें हाचि अपाय । भोग भोगितां रोग उठती, रक्तपित्तकफादिक वाय ॥ हक० ॥ ३ ॥ अनादि हा सत्य ईश्वर, ह्मणोनी सोहिरा गाय । मलाही दिसतो तुलाही सांगतो, पुढील तरणोपाय ॥ हक० ॥ ४ ॥

पद २०.

प्राण्या सदा सुखी त्वां असावें ॥ ध्रु० ॥ अवचट हें निर्माण होतें, याचि प्रकारें विलया जातें । सखेद होउनि उगीच अ-

सतें, तेथें कोणावरी वा रुसावें ॥ प्राण्या० ॥ १ ॥ चिंता वाहतो कोण पाहतो, अचल अमर येथें कोण राहतो । त्रैलोक्य पोटीं कोण साहतो, स्वरूप तुला तें दिसावें ॥ प्राण्या० ॥ २ ॥ प्रपंच . मायेची माव, सुखदुःखाचे वसती घाव । एक वेळ निरंजनीं पहा तत्व, हें पंचविसावें ॥ प्राण्या० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे स्वस्थ असावें, मन हें संशयभूत नसावें । परब्रह्म हें हृदयीं ठसावें, मग आनंदें स्वस्थ असावें ॥ प्राण्या० ॥ ४ ॥

पद २१.

तरी हो काय येउनियां जन्मासी, विषयीं जडला गुळावरी जैसी माशी । परिणामाच्या नलगे हो कामासी, ओळखेना भूत हृद्गत या रामासी ॥ ध्रु० ॥ चंचळ चित्त हें परब्रह्मीं लाहेना, सहज समाधी स्थिर हें राहेना । व्यापक चैतन्य सर्वत्र आहेना, मीं हा कोण ऐसें जरी पाहेना ॥ तरी० ॥ १ ॥ चित्सूर्य हा उदेला हो उमगेना, अद्वयाब्जीं निजरीं कां अनुरागेना । सद्गुरु कानीं बीज सांगेना, निर्गुणनिरंजनीं छंद हा लागेना ॥ तरी० ॥ २ ॥ मनसहित इंद्रियें न निरोधी, मग्न राहना जंव या ब्रह्मबोधीं । भृंगवत् नलगे या अमोदीं, मोक्षाची वाट कवण ते न शोधी ॥ तरी० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे अविनाश कैंचें त्याला, गंगा टाकुनि मृगजळीं जो न्हाला । अमृत ह्मणुनि जो कां कांजी प्याला, आपुले छायेसी आपण भ्याला ॥ तरी० ॥ ४ ॥

पद २२.

जगतरंगरंगसंग क्षणेक भास ॥ ध्रु० ॥ विषयविलास, अवघा त्रास, अंतीं पावे नाश ॥ १ ॥ उनायोगें, उखरासंगें, देखोनी गंगे, ठकलीं जैसीं मृगें ॥ २ ॥ गळां शेळीचे स्तन, कीं हें आरशांतील धन, जैसा जळावरील फेण, जैसें निद्रिस्थाचें स्वप्न ॥ ३ ॥ शरीर असे जंव, सकळ भासे तंव, विकार विं-

चुचें हें पेंव, लटिके चितेचा हा गांव ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे कीं नेमी, जड हें शरीर नोहें मीं, आजि राहतों निजधामीं, यांचा समुद्र तो कीं मी ॥ ५ ॥

पद २३.

संसार माण्या थोडारे थोडारे । जैसा पाण्याचा बुडबुडा वेगीं सोडारे ॥ ध्रु० ॥ त्रिकुटीं मन हें ओढा, ब्रह्मरंध्र फोडा, विषय गोडा, वरिली माशी तेवीं मोहपाश तोडारे ॥ संसार० ॥ १ ॥ इंद्रियें हीं कोंडा, वरी नेमाचाही धोंडा, ठेवुनि अभिमान दवडा, दूर करोनियां कधीं विकल्प मनिंचा मोडारे ॥ संसार० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे गाढा, नाडा पंचभुतांचा हा झाडा, यांतुनि हें चित्त काढा, अविनाश गुरुपद जोडारे ॥ संसार० ॥ ३ ॥

पद २४.

स्वरूपीं मजरा लावीं ठीक । उदरा मागुनि खाणें भीक ॥ ध्रु० ॥ स्वइच्छ रहाणें, अलक्ष पहाणें, भजन करूं नको दांभिक ॥ १ ॥ अचिंत्य स्मरणीं, अगम्य करणी, अनादि आरंभिक ॥ २ ॥ म्हणे सोहिरा निराकारी, निराधारीं, मन करणें राबीक ॥ ३ ॥

पद २५.

अशा चिखलीं गेला माण्या जन्म तुझा व्यर्थ । कवण मीं हा कोठिल तुजला नकळे परमार्थ ॥ ध्रु० ॥ अरूप आत्मा ब्रह्मस्वरूपीं नलगे लक्षांश, अनेक शास्त्राभ्यासें तुजला मियकर वाच्यांश, जितुकी विद्या तितुका वृत्तीचा आढळतसे अंश, परतुन दृष्टि न पाहे नाथसंकेतीं चिदंश ॥ अशा० ॥ १ ॥ ऋद्धि सिद्धी गारुड पाहतां लाभ काय तुजला, प्रमाण मानुनि देह केवळ भुलसी धातूला, अंतरीं ज्ञानप्रवेश न होय नाशचि हा तुला, अमुक ऐसा नकळे तुजला चाळक आंतुला ॥ अशा०

॥ २ ॥ गगन वनाचे ठायीं न होय मन हें विश्राम, संकट वाटे मोठें सोडितां इंद्रियग्राम, तीर्थें व्रतें दान धर्मही तितुकीं सकाम, निरालंब हें निर्गुण येणें न मिळे निजधाम ॥ अशा० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा कणासि टाकुनि उपणीसी कोंडा, आत्मज्ञानीं अनावड्री जसी अवरूची तोंडा, मायानदिचा हा तुजवरि आलासे लोंडा, वाहत वाहत जाशिल तेथें प्राप्त नव्हे धोंडा ॥ अशा० ॥ ४ ॥

पद २६.

तुम्हीं वंदा, सकळहि साधुवृंदा, न करावी हे निंदा, सोडुनि सकळहि धंदा । संगति सद्गति पावे जिव हा अक्षय परमानंदा ॥ ध्रु०॥ ते संत, वृत्ति ज्यांची संत, विषयांसी घसंत, जे का न करिती पसंत । जेथें जाती तेथें चित्सुखज्ञानवनिंचे वसंत ॥ तुम्हीं० ॥ १ ॥ ते गाती, स्वरूपींचे सांगाती, देह तूं जाण हें माती, मिथ्या हे कुळ याती । अजरामरस्वरूपीं तद्रूप झाले हारपली दिनराती ॥ तुम्हीं० ॥ २ ॥ तें मन, झालें कीं उन्मन, इंद्रियां दमन, नाहीं पुनरपि आगमन। खेचरि मुद्रा लावुनि ज्यांहीं निर्गुणिं केलें गमन ॥ तुम्हीं० ॥ ३ ॥ शरण यावें त्याला, नको मानूं भलत्याला, द्वेषी वितंडमत्याला, परसुखीं झुरत्याला । म्हणे सोहिरा भाषण करणें पाहुनियां पुरत्याला ॥ तुम्हीं० ॥ ४ ॥

पद २७.

भगवंताला स्मराल, तरि हा भवसागर तुम्हीं तराल हो ॥ ध्रु० ॥ पापामध्यें न रहाल, शुद्ध हें पुण्यचि करा तराल । आणि योगी व्हाल, तरि मोहफणीचें विष उतराल हो ॥ भग० ॥ १ ॥ आत्मा ना विसराल, विषयतृष्णा ना पसराल । भ्रमांतूनी कसराल, आदिपुरुषाला अनुसराल हो ॥ भग० ॥ २ ॥

विचार हा विवराल, निरंतर भजनीं वावराल। निजशांतीला वराल, चंचळ मानस हें आवराल हो ॥ भग० ॥ ३ ॥ योगाभ्यासें झराल, अक्षय प्रेमातें पाझराल। निरंजनवनीं ठराल, तेव्हां नित्यानंदें भराल हो ॥ भग० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे कर्म हराल, कैंवी जन्मुनि पुढतीं मराल। चित्त चैतन्यीं सुधराल, तेव्हां उभय कुळें उद्धराल हो ॥ भग० ॥ ५ ॥

पद २८.

हरिस्मरण सुख हें जरि घे। तरि मोह मनीं न रिघे ॥ ध्रु० ॥ श्रवण मनन निजध्यासें करुनि, रज तम हा डाग निघे। मिथ्या मानिलें सकळ दृश्य हें, पुनरपि नयनीं न घे ॥ हरि० ॥ १ ॥ येणें पुण्यें करूनि वर्तन, किमपि न राहणें अघें। भक्तिज्ञान वैराग्य दशा हे, नित्य हृदयीं वळघे ॥ हरि० ॥ २ ॥ ध्यान धरोनी निरंजन वनीं, दृढाभ्यास लावुनि घे। तरि तें पद पावेल जेथ हे, ब्रह्मा हरि हर तिघे ॥ हरि० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा आत्मरसाची, प्राणी नित्य चव घे। अंतर बाहेर तेंचि किं व्यापक, ब्रह्मचि हें अवघें ॥ हरि० ॥ ४ ॥

पद २९.

प्राण्या तुझा परिणामीं कठीण प्रकार ॥ ध्रु० ॥ न करिसी भजन। न करिसी पूजन। नाहीं तुला आत्मज्ञानाचाही अधिकार ॥ १ ॥ तुला संत भेटेल कोठिचा। परि लाभ नाहीं भेटिचा। शिकविल्या बोला देशी वेंठीचा. हुकार ॥ २ ॥ तुला याद नाहीं आदली। कल्पना हे तुज बाधली। नाहीं योगारण्यें साधली मनमृगाची शिकार ॥ ३ ॥ आपणामाजी थोर। परी तूं देवापाशीं चोर। अवघा पदरीं बांधुनि घोर करिशी लटकी लकार ॥ ४ ॥ ज्याचें तुजपाशीं काज। तुला ह्मणती ते महाराज। होय होय जी जी करुनि करिती जयजयकार ॥ ५ ॥ अधःपदा धाडिल। शेखी पेंचा पाडिल। दोहींकडे नाडिल

स्थूलबुद्धिचा अहंकार ॥ ६ ॥ सोहिरा ह्मणे झांकळशी। जन्ममरणा आकळशी। जोंवरि अंतरदृष्टि नोळखशी ब्रह्म निराकार ॥ ७ ॥

पद ३०.

भगवान विष्णु स्मर अनंत व्यापक तो ॥ ध्रु० ॥ युगायुगीं जो धर्म स्थापी, पापी सकळही दानव कापी, प्रतिपाळी अनुतापी, अंतरीं काम क्रोध हे चापी, जग नग तरंग असे ज्या आपीं, तो हा अच्युत मधुसूदन मनमोहन हृषीकेशी, हा हृदयनिवाशी, अशासि टाकुनि कशासी जिव हा आणिकची वधतो ॥ १ ॥ अनन्यभावें, नाम घ्यावें, श्रवण करावें, हृदयीं धरावें, मनीं भरावें, तद्रूप व्हावें, पूर्वार्जित प्रारब्ध स्वभावें, देह हें पावे, ईश्वर देता, अनेक दाता, असें असुनियां पोटासाठीं, आटाआटी, करुनि शरीर हें कशासी हांसकितो ॥ २ ॥ गुरुदास्य हें कांहीं असावें, लटिकें मायिक दृश्य दिसावें, अविनाश तें काय पुसावें, ध्यान करित एकांतीं बसावें, पाखंड तंड वितंड वाद कशाशी हा शिकतो ॥ ३ ॥ भक्तजनांचा धांवा, करितो कृष्णस्वरूपीं पांवा, वाजवी गोप वधूंप्रती नांवा, नांवा उच्चारित रति रंग, लाल श्रीरंग, विराजित यदुवंशींचा वतंस हा हरी, शंखसुदर्शनधारी, मोक्ष देऊं सकतो ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा भारतसमयीं, सारथ्य करी तो भारतमथनीं नवनीत गीताअमृतवचनीं, उपवीती उपदेश करुनियां, उद्धरी पलें कीं हा पार्थ, प्रताप अर्थेचि परमार्थ, दावी करी आपणा समतुक तो ॥ ५ ॥

पद ३१.

मुखीं सत्य बोलणें सत्य बोलणें। निजानंदीं डोलणें ॥ ध्रु० ॥ दहावें द्वार उघडलें, मन ब्रह्मीं जडलें। त्याचें इष्टानिष्ट पडलें, लोकांनीं काय करणें ॥ १ ॥ धर्म कीं अधर्म घडो, सुख

दुःख गळां पडो । कांहीं असलें तरी, अनुभवबळें तोलणें ॥ २॥ आपण तत्त्वींचा, जो देखणा । हृदयांतील मीपणा, परतें खोलणें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे आपुलें हित, पहावें हें विहीत । ज्याला नकळे आपुली रीत, त्यासीं काय बोलणें ॥ ४ ॥

पद ३२.

भगवान्‌जी कसा तो व्यापक पाहत असा ॥ ध्रु० ॥ सद्गुरु सेवा करुनि निवृत्ती पंथ कवण तो पुसा । कळा ते पाहुनी अंतरीं या संसारीं असोनियां नसा ॥ १ ॥ मूढजनांचा सहवास हा कधीं नको करूं कीं फारसा । नित्यानित्य विवेकें उजळुनि अनुभव हा आरसा ॥ २ ॥ ज्ञानकमलदलीं अलिवत् चित्त उद्बोध आमोदीं डसा । त्याचि उपाया लागुनी सेवा अद्वय ब्रह्मरसा ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा ज्या रीतिनें दर्शन देईल प्रसन्न होइल जसा । त्याचि प्रकारें स्थिर करोनी मन सदैव स्वस्थ वसा ॥ ४ ॥

पद ३३.

सुखी हो कीं या सुखीं । जेथ मनाची नलगे नखी ॥ ध्रु०॥ जिवा तूं पक्षी उदास होईं ऊर्ध्वमूल महारुखीं । पुनरपि इच्छुनी पडों नको या प्रपंच परमदुःखीं ॥ १ ॥ भिन्न स्वभाव जनाचे देखत उपटुनि टांकी उखी । भगवंताचें अखंड स्मरण कीर्तन कर हें मुखीं ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा शरीर हें तव तृणातुल्य लेखीं । भोगी असतां जोगी हो तूं आदेस कर आळखीं ॥ ३ ॥

पद ३४.

हें काय कसें प्राण्या पहा पाहुनियां निश्चळ रहा ॥ ध्रु० ॥ शून्यामाजी देह हें भासे, भासत भासत केव्हांचि नासे । सबाह्य याला कोण प्रकाशे, जवळींच असोनियां न दिसे हा ॥ १ ॥

पंचभूतांची साक्षी येती, साक्षी कैसी ते दिठी न येती। प्राप्त व्हावी गुरुदयें ती तेची, कळेचा निजध्यास वहा ॥ २ ॥ पिंडब्रह्मांड त्यागुनि सुख हें, सदैव स्मरतां असे सन्मुख हें। समूळ विलया जातें दुःख हें, दृश्यातीत आनंद महा ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा रवि शशि चाले, ज्याचे सत्तेनें जग हें हाले। हेंचि देखोनी योगी धाले, नवलचि अहाहा ॥ ४ ॥

पद ३५.

प्राणिया उमजेना हें तुज। याचि तूं न करिसि कां तरतूज ॥ ध्रु० ॥ सुकृत हें निःकाम नसे, वरी ज्ञान उगें लाभेल कसें। हा निश्चय स्वरूपीं केंवी बसे, ही उपरमेना दिठी न कळे कीं हें गुज ॥१॥ शुद्ध सत्व हे सेना जुडती, सहज हे आकाशीं उडती। मवास रज तम यांवरि पडती, अतिशय लागतें झुज ॥ २ ॥ निरहंकृतिनें अद्वयभावें, जेथुनि आलें तेथ समावे। ब्रम्हीं नलगे हें अर्पावें, वरचेवरि हें कर्मा पडतें पूज्य ॥ ३ ॥ ज्ञानाविण जीव अंध झाला, विषयसुखाला बहु रिझाला। वैराग्याचा यज्ञ विझविला, कशान पडेल हा बुज ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा शरण यावें, अर्ध मात्रा औषध प्यावें। व्यतिरेक अनुपान घ्यावें, उतरती हे भवसूज ॥ ५ ॥

पद ३६.

सद्विचार कांहीं करूंयारे। एक वेळ परम हा दुर्घट दुस्तर भवसागर तरूंयारे ॥ ध्रु० ॥ भक्ति ज्ञान वैराग्य जेणें निजबोध उपजे हृदयारे। संतति संपत्ति नये ती कोणी निर्वाणीच्या समयारे ॥ १ ॥ अविद्यात्मक विकार सर्वहि समूळ जाती लयारे। जेणें करोनी हे शिघ्रचि होईल भगवंताची दयारे ॥ २ ॥ नित्यानित्य विवेकें निवाडा जेवी हंस सलिलपयोर। याहुनि आणिक तीर्थ नलगे तुज महा हे काशी गयारे ॥ ३ ॥ देह

संरक्षण कैसें होईल टाकुनियां कीं भयारे । ह्मणे सोहिरा निजधामीं रहा निघावयाचे तयारे ॥ ४ ॥

पद ३७.

तुला देव कधींचि श्रमी न करी । त्याला तूं कीं विसरसी ना क्षणभरी ॥ ध्रु० ॥ प्रपंच मिथ्या भ्रांती हे न दिसे, ब्रह्म निरंतर सत्यची तें असे । अंतर बाहेर तेंची दिसे, बसे निश्चय हा दृढ जरी ॥ १ ॥ भक्तकाजकल्पद्रुम स्वामी, तोचि चाळक इंद्रियग्रामीं । प्राण्या भजसी जरि निःकामी, जगदुद्धारण हरी ॥ २ ॥ जन्म मृत्यु हे जरा व्याधी, यांचें दुःख हें कधीं न बाधी । अनेक संसारिक उपाधी, सर्वचि श्रम परिहारी ॥ ३ ॥ भूतद्वेष हा किमपि नसेल, दैवी दशा हे मनीं असेल । भूतदया हे हृदयीं वसेल, कवणचि न दिसेल अरी ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा देह हें असें पाहीं, कांहीं नसेल विश्वास नाहीं । त्वरित तूं कांहीं सार्थकीं राहीं, भजन करिसी लौकरी ॥ ५ ॥

पद ३८.

भगवान्‌जीला पाहतां प्राण्या तुज सुख दुःख कांहीं नसेरे ॥ ध्रु० ॥ अदृश्य कळा हे व्यापक सकळा, नेति म्हणतसे वेद नकळा नेणसी । याला जिवा तूं विकळा, शरीर चाळवी जिवन कळा हे दूर कधीं नाहीं हा जवळीं असेरे ॥ १ ॥ अनन्यभावें भजन स्वभावें, नाम ध्यावें अंतरीं ध्यावें । लय लावावें नित्य निरंजनीं, क्षणभरी जरी चित्त वसेरे ॥ २ ॥ पृथ्वी पहातां उदकीं वाहतां, तेजीं दाहतां गगनीं साहतां । संनिधानीं मन पवन चळण करी, स्थिरचरीं हरी सर्वत्र वसेरे ॥ ३ ॥ जन्मा नाहीं यावें जावें, देवचि अवघा ह्मणुनि भजावें । संगाविण संतोष व्हावें, गुणत्रय परब्रह्मरसींरे ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा अति ईश्वर पतीतपावन, दीनबंधु हा जगदुद्धारण । सज्जनजनमनमोहन कारण, चिद्घनवनीं आनंदघन वर्षेरे ॥ ५ ॥

पद ३९.

विश्वास ठेवीं प्राणिया नारायणा हरीरे ॥ ध्रु० ॥ ज्याणें निर्मिलें ब्रह्मांड, येवढी पृथ्वी हे नवखंड। तिन्ही देव त्रिभुवन बंड, यमधर्म जिवाला दंड। भूतीं भूत पिंड उदंड, ज्याणें चालतसे हें शरीररे ॥ १ ॥ ब्रम्हादि वंदिती ज्याला, नेति वेद म्हणती त्याला। या जगाचिया पित्याला, कीं हें विश्व भरोनी रित्याला। तूं नको कीं विसरों त्याला, क्षण भाग्याचिये भरीरे ॥ २ ॥ अवलोकुनियां भाळीं, घालीं योगासन हें त्रिकाळीं। दिठी देऊं नको आभाळीं, दृश्य पदार्थ या गाभाळीं। कांहीं पातक हें सांभाळीं, महा तारुण्यलहरीरे ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा भवतारी, देव युगायुगीं अवतारी। जो पुरुष नव्हे नारी, हा आकर चित्र चितारी। नको घालऊं त्या विण हो, हे वांच्छा नाना परीरे ॥ ४ ॥

पद ४०.

हा लाभ-घ्यारे हो परमामृत हें प्यारे हो ॥ ध्रु० ॥ ऐसी हे रयोनी दुर्लभ, साधु न मिळे असा कीं सुलभ। सदैव नसतो काळ वल्लभ, मिनला एक समयारे हो ॥ १ ॥ लागला भवभ्रम हा मार्गें, भगवंतीं चित्त केवीं लागे। उघडुनि ऐसें कोण सांगे, अवघेंचि टाकुनि यारे हो ॥ २ ॥ ब्रम्हप्राप्तीची प्रीति असावी, संशयभ्रांति कांहीं नसावी। वैराग्याची कळा असावी, विवेक हृदयीं हा न्हयारे हो ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा नाश जाणुनि, चरचराला ध्यानीं आणुनी। अर्थज्ञान हें अंतरीं वाणुनी, परमार्थी कीं तयारे हो ॥ ४ ॥

पद ४१.

भगवान्‌जीचें ध्यान धरोनी सदा सुखी रहा। अविनाश सुख भोगीं आनंद हा महा ॥ ध्रु० ॥ देहासंगें त्रिविध ताप मोठा

कीरे वहा । ज्ञानवळें कांहीं हालों नको तूं जरा हा ॥ १ ॥ बहुत योनी क्रमुनी आला नरदेहा । हा जीवन्मुक्त व्हावें याचा ध्यास मनीं वाहा ॥ २ ॥ विषयबोध राजयोग अभ्यास करा हा । नाम रूप जाणतो हा कोठुनि कोण पहा ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे नित्यानित्य स्वानुभव गा हा । प्रकट गुप्त नोहे आत्मारामचि उमगा हा ॥ ४ ॥

पद ४२.

प्राणी हो सदां सुखी राहा ॥ ध्रु० ॥ स्थूळ देह हें कोठुनि चाले, कवण यांतुनि बोले । विषयसुखांत कवण डोले, द्रष्टा कोण मीं पाहा ॥ १ ॥ पंचभूत संयोग सकळिक, सुख दुःख हें साहाजित । होत्साता शिव रूप मीं, कधीं सोडूं नको थिर हा ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा बुद्धियोग हा, इंद्रियें आकळसी दाहा । सहजसमाधी निमग्न होउनी, ह्मणोनि घ्या तुह्मीं आहा ॥ ३ ॥

पद ४३.

आतां वळखीं चिन्मात्र अभिमान सोडीं मात्र ॥ध्रु०॥ मिथ्या मायामृगजळ लटिकें कुळ गोत्र ॥ १ ॥ संसारीं राहणें जसें जळीं पद्मपत्र ॥ २ ॥ याला कासया धुंडिसी बहुत नलगे मंत्रतंत्र ॥ ३ ॥ शरीर शोधुनि पाहा कवणीं घडियलें हें यंत्र ॥ ४ ॥ याला चळविता कवण याचें कोणा हातीं सूत्र ॥ ५ ॥ वाद्याविण वाजतें अनाहत कीं वाजंत्र ॥ ६ ॥ सोहिरा ह्मणे जा तेथ जेथ दिवस ना रात्र ॥ ७ ॥

पद ४४.

हरि भगवान् भजन करीं मना ॥ ध्रु० ॥ नश्वर देह हें जाणोनि सकळिक विषयसुख मावना । सांडी तेथिल धांवना त्वरित लावीं आत्मस्वरूपीं भावना ॥ १ ॥ शब्दज्ञानेंचि करोनि साधुचा वृथा घालिसि आवना । नासुनि उगीचि कावना गुसांई

अंतरीं विषयकामना ॥ २ ॥ ज्ञानसंभवीं इंद्रियवृत्तीसि भिऊं नको त्रिविध जना । चित्सुखवनिं विहार करोनी करी निवास निरंजना ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा आयुष्य सरतें कांहीं किमपि फामना । योगयाग गुरुदास्य भक्ति या नवविध घे लावना ॥ ४ ॥

पद ४५.

सीताराम स्मररे प्राण्या भजन हें अहर्निशि कर जिव हा उद्धर रे ॥ ध्रु० ॥ शिघ्रचि उठिला पितृआज्ञेनें झाला वनवासी। सिद्ध केली हे वानरसेना उतरे सुवेळेसी। शिर उडविलें दशाननाचें प्रताप लंकेसी। शिळा तारिली नगरी जो कां न्हे वैकुंठासी ॥ १ ॥ तारक सकळां स्वामी आम्हा राम धणी दाता। तारिले पाषाण समुद्रीं हे ज्याची सत्ता। तारापतिसीं चकोर जेवीं लावितसे चित्ता। तावत ज्याचें चिंतन करणें अखंड हनुमंता ॥ २ ॥ राख ज्याचें हें लक्ष निरंतर निरसीं संसारा। राव रंक देह समान चालवी आज्ञेनें वारा। रानीं नलगे टाकुनि जाणें अवघ्या घरदारा। राहें स्थिर परतुनि पाहें चराचरीं सारा ॥ ३ ॥ मनमोहन हा गहन वसतो हृदयीं आराम। मग्नचि होउनि असणें तेथें स्वइच्छ निःकाम। मज्जन करणें ज्ञानगंगेचें निर्मळ निर्लोम। महानंदा परमात्म सोहिरा ह्मणे हरे श्रम ॥ ४ ॥

पद ४६.

प्राण्या स्मर तूं भगवान् हरी रे ॥ ध्रु० ॥ वैकुंठपती मुनी जपती अंतरीं तपती निरंतरीं रे। विपत्ति नासित श्रीपती परम तापसी जन उद्धरी रे ॥ १ ॥ दातार हा अवतार धरी उतार करी भवसागर रे। दैत्यमर्दन करी जनार्दन गिरिगोवर्धनधारी रे ॥ २ ॥ गरुडगामिनी मदनकामिनी गोपी

१. पहिल्या पदाप्रमाणें याही पदांत "सीताराम" या अक्षरांवर चार कडवीं रचिलीं आहेत.

यामिनीं वरी रे । परम प्रीतिकर रती अति तो त्रैलोक्य ज्याचे उदरीं रे ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे जंव देह हें असे तंव सार्थक कांहीं तरी करीं रे । कमलनयन तो नयनीं पाहा चैन पडों क्षणभरी रे ॥ ४.॥

पद ४७.

लय हें लावीं भगवंतीं हाचि तरणोपाय अंतीं ॥ध्रु०॥ ध्यान धर नाम मुद्रासना परतुनि पाहीं । मार्ग जनाचा सोडुनि स्वइच्छ बैस एकांतीं ॥ १ ॥ पवन मन सह येक वंदुनी ब्रह्मरंध्रीं तूं जाईं । नामरूप ज्या नाहीं ते ठायीं सुख भोगिलें संतीं ॥ २ ॥ म्हणे सोहिरा आधि नाथ गुरू गुप्त निरंजन कांहीं । हरिहर ब्रम्हा जेथुनि जाहले चित्सुखवनवसंतीं ॥ ३ ॥

पद ४८.

तरी सार्थक हेंचि करावें । सदा आत्मस्वरूप स्मरावें ॥ ध्रु० ॥ मानूं नये हें आवरावें, चैतन्य सर्व समान धरावें । विश्रांती कळे आवरावें, पुनती जन्मोनियां न मरावें ॥ १ ॥ अनादि भूमिके स्थिरावें, मन हें गगनामाजी जिरावें । सर्व नासुनि जें कां उरावें, तेंचि कीं हृदयीं भरावें ॥ २ ॥ सोळातीत सतरावें, त्या परब्रह्मकशीं उतरावें । ब्रह्मरंध्रीं भितरावें, हा संसारसमुद्र तरावें ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा नलगे फिरावें, जेथील तेथ मुरावें । देहभान विसरावें, हेंचि वांछित मनींचें पुरावें ॥ ४ ॥

पद ४९.

सदा कीं संतोषमय । आंत आह्मीं आहों हो ॥ ध्रु० ॥ मन हें चंचळ, विसंवोंना पळ । निश्चळ निर्मळ, निरंजनीं राहूं हो ॥ १ ॥ खेचर भूचर, आणि हें जळचर । आइतें चराचर, नवल हें पाहूं हो ॥ २ ॥ नेमिलें जें असे, दृष्टीसी न दिसे ।

चिंताचि ते नसे, होणार तें होऊं हो ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे तें साहुं, देवाला या नित्य गाऊं । देईल तें खाऊं, वर सोंग दाऊं हो ॥ ४ ॥

पद ५०.

मग चिंता ते हो कशाची। मुळीं सोडिलिया आशाची ॥ध्रु०॥ भ्रांति फिरली देहनाशाची, अवघी गेली अवदशाचि । चळती कळती दैवदशाचि, प्रभा हे अविनाशाची ॥ १ ॥ प्रतित नलगे हो विषाची, खाऊनि विषयाची वा साची । हे लतिका भवपाशाची, समजुनि गुंडाळिल गा साची ॥ ५ ॥ योनी अपूर्व मनुष्याची, सेवा करणें जगदीशाची । संगत करणें सत्पुरुषाची, योगी ज्ञानी अशांची ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा राहाणी जळीं माशाची, तेवीं समाध तमाशाची । बाळ उन्मत्त जो पिशाची, कृपामोक्ष देती निशाची ॥ ४ ॥

पद ५१.

संसारचिंता चिंतितांचि मन हें गेलें । नरदेह जन्माचें सार्थक नाहीं केलें ॥ ध्रु० ॥ इच्छिलें हें जोंवरी न घडे, सुखनिद्रा हे तोंवरी न पडे । विवेक तरुवर समुळीं उपडे, सदां रागेलें ॥ १ ॥ दिवसेंदिवस काया शोके, विवंचना ही पुढिली धोंके । नित्यानित्य बसती धोके, जीवित्व रोगेलें ॥ २ ॥ उत्तम योजिती सार्वकाळ, आपपरांची पुरविती आळ । पावल्या मृत्यूचा वेळ, अवचित घोंगेलें ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा आत्मा न कळे, मिथ्या ह्या मृगजळींच विकळे । अन्यथा मती निजेंत लोळे, नव्हती जागेलें ॥ ४ ॥

पद ५२.

भगवंताचे गुण गारे । श्रवण मनन निजध्यासाविण क्षण एक नको राहुं उगारे ॥ ध्रु० ॥ सायासीं सांपडली हे नरतनु ।

दुर्लभ काळ हा नको घालऊं वाउगारे ॥ १ ॥ बळवान् मीं धनवान् मीं कीं विद्वान् मीं। हें सर्व टाकुनी गर्व फुगारे ॥ २ ॥ जन्मा आला कवण गेला कवण मनाला चाळणवाला। आधीं याला उमगारे ॥ ३ ॥ जैसें जळ गारे कनक गारे। तैसा व्यापक एक अनेक जगारे ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे वृत्ती विरागती तुर्या रांगती। जेथ अनाहत वाजती नित्य नगारे ॥ ५ ॥

पद ५३.

संतांचे दुर्गुण टाकुनी श्रेष्ठची सद्गुण घ्यावा ॥ ध्रु०॥ सुमनीं सुवास येतो मोठा। सेवंती सर्वांगाला कांटा ॥ १ ॥ दीप आंगीं अवगुण असती। प्रकाश होतां अवघे न दिसती ॥ २ ॥ द्वाड वनिता हे रूपवंती। कामिक पुरुषा प्रियकर होती ॥ ३॥ धनाची मोट ओझें भारी। कैंवि त्यागिति नर संसारी ॥ ४ ॥ समुद्र क्षार न घालवि तान्ह। पुण्यासाटीं करणें स्नान ॥ ५ ॥ हिरा कठीण नव्हे अरुवार। लेइल्या होती तालेवार ॥ ६ ॥ क्रूर स्वभाविया रणशूर। त्याला अवश्य पाळी धूर ॥ ७ ॥ बाळ उन्मत्त पिशाच साधू। मात्रचि घ्यावा ब्रह्मबोधू ॥ ८ ॥ सोहिरा ह्मणे ग्राहिक ज्याचा। तोचि संग्रह करील त्याचा ॥९॥

पद ५४.

पाव ज्ञान दाव ध्यान लावीं या मना ॥ ध्रु० ॥ याच देहीं याच डोळां मुक्तिचा सोहाळा। भोग राजयोग वश्य करोनी सांडीं कामना ॥ १ ॥ दिसतें तें हें नासतें कीं हें अविनाश असतें कीं हें। वसतें तुझे हृदयिं असोनी तुजला फामना ॥ २ ॥ सद्गुरुशीं शरण जावें हमेशा भजावें। निजगुज हें बुजावें जावें गगनगमना ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे आहे नाहीं पाही तूं सबाह्य ब्रम्ह। अंतवंत अनंतरूप निजधामना ॥ ४ ॥

पद ५५.

नाच नाचें नाचें । या हरीरंगीं नाचें ॥ ध्रु० ॥ सहज समाधी लागे, निद्रेमाजी होइजे जागें । समाधान मनाचें ॥ १ ॥ भ्रमर गुंफे राहाणें, निरंतर स्थिर होणें । उलटें मान लोचनाचें ॥ २ ॥ बद्धता नाहीं मग, मुक्तता कँची । नाम नुरे मोचनाचें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मीच नाहीं, मग दुजा तेथ कैंचा पाहीं । काज राहिलें पवनाचें ॥ ४ ॥

पद ५६.

श्रीगुरुशीं भजें आजि मनारे ॥ ध्रु० ॥ चंचळपण टाकुनी घेईं । सहज सुख हें मज माजि मनारे ॥ १ ॥ निरंजनीं रंजोनियां । उमज कीं हे निजकाज ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आपणापें । तुर्येचा धरी माज मनारे ॥ ३ ॥

पद ५७.

संतसमागम हाचि सुगम ॥ ध्रु० ॥ ज्याचे कृपादिठी, वस्तुसि भेटी । निर्जी निजसुख उगम ॥ १ ॥ ज्या वचनोक्ति, लाभे मुक्ति । जहिं मौनावले निगम ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे, चित्सागरीं । मिळे त्रिवेणीसंगम ॥ ३ ॥

पद ५८.

यारे सज्जन भजन कराया ॥ ध्रु० ॥ तन मन धन हें, अर्पुनि संदि । सत्संग धराया ॥ १ ॥ आदि अंतीं, निजसुख शांति । एकांतीं वराया ॥ २ ॥ विपया विकलेति, विद्या शिकलेति । पोट भराया ॥ ३ ॥ जन्मा येउनि, उगेंचि गेलेति । व्यर्थ मराया ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे, तुह्मांप्रती म्यां । सांगतों हेंचि तराया ॥ ५ ॥

पद ५९.

कोण कवणाचे नये हो संगातीं ॥ ध्रु० ॥ माता पिता वहिणी बंधु, दारा सुत धन वृथा कीं वेधु । जाण हा स्वप्नींचा आ-

नंदु, ममतापाशीं लागति गोंदुं । तुझा परिणाम नसे त्यांचे हातीं ॥ १ ॥ संसारीं तुझें मन हें विकळे, परि मीं कोण हें तुजला नकळे । विषयविलासीं झांकुनि डोळे, चंद्रोदयींचे जसे कावुळे । शेवटीं तुजला काय मिळेल पाहा, मातिसी मिळेल या माती ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा संतसमागम, सुगम करोनि निज उगम । जयाला अगम निगम, कुंठित जय भुवनीं तो । दीप कळावी निर्वाती ॥ ३ ॥

पद ६०.

तंव देव तुला भेटेना ॥ ध्रु० ॥ पांचांचे पंचवीस गुण, यांचें प्रधान अंतःकरण । सत्व रज तम त्यांचें कारण, चळती प्रारब्धा प्रमाण । आत्माराम तो अलिप्त जाण, ऐसें समजुनि जंववरी तुजला देहअभिमान सुटेना ॥ १ ॥ पहिला दुर्धट गर्भवास, उप्पर संसाराचा पाश । पडतां पडला नाना त्रास, राहणें मज कितुके दिवस । अधिक मीं कां चढऊं आस, परतुनि कां येऊं जन्मास । ऐसें उदास होउनि मन हें जंववरी विषयविलासीं विटेना ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा काय तें साधुं, कवण रीतीचा करणें शोधु । निरोधनीं तो निरोधुं, सकळांमाजी कवण तो साधु । बोधामध्यें कवण तो बोधु, ऐसें उमजुनि चित्तीं जंववरी विवेक हा उमटेना ॥ ३ ॥

पद ६१.

भगवद्भजनीं हें मन लाव ॥ ध्रु० ॥ ममतामोहें जिव हा विकळे, शरीर जाईल केव्हां न कळे । आपणा संगें न येति सकळें, ऐसें समजुनि त्वरित घे लाव ॥ १ ॥ सर्वघटीं हा आत्माराम, तेंचि आपुलें निजधाम । केवळ तूं निःकाम, होई टाकुनि द्वेष डुलाव ॥ २ ॥ व्यापुनि चराचर, जंगम स्थावर । स्वरूप अनावर, त्यावर करणें तलाव ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा कीर, बोल ते सकळ पोल । कांहीं अंतरीं असोंदे ओलाव ॥४॥

पद ६२.

प्राण्या देव देव भजरे । नित्यानित्य विचार करुनि मग सहज समाधीं निजरे ॥ ध्रु० ॥ संसार माजा, मीचि राजा, म्हणउनि माजा, येउनि भाजा, छंदें लाजा, सांडुनि काजा, अर्थी पांजा, पांजी करोनि, भल्यासी गाजा, गाजी करिसी, दूत दंडिती, यम झडती, गळां कीं पडती, कढई कढती, आंत अडती, प्राणी रडती, आपदा घडती, हें घडि घडि सांगतों तुजरे ॥१॥ अभ्रींची छाया, तैसी काया, लटकी माया, कीं नटजाया, हे नरकाया, जाती वांया, लाग उपाया, सद्गुरुराया, भवाब्धिला या, सांग तराया, म्हणोनि पायां, वंदन करोनि, बंधन तोडीं, कुसंग सोडीं, सुसंग जोडीं, अखंड गोडी, लाउनि उमज तूं जीविच हें निजगुजरे ॥ २ ॥ म्हणे सोहिरा नादबिंदातीत मुकुंदा, मूलकंदा, ज्ञानारविंदांतील अमोदा, अमित अमंदा, या गोविंदा, परमानंदा, दृष्टी मुष्टी न गवे जो कां, सृष्टी चाळक पाळक, सकळ व्यापक, त्रिभुवनींचा नायक, अमृतबिंदु, पूर्णइंदु, कृपासिंधु, परब्रह्म अनादि जें निज बीज रे ॥ ३ ॥

पद ६३.

आण ध्यानीं त्या मनमोहन गहनाला ॥ ध्रु० ॥ निशिदिनीं गा, राहोनि उगा । निजरूपीं उमगा, आनंदघनाला ॥१॥ सेवीं सज्जनाला, ज्ञान यजनाला । सोडुनि जनाला, वेगीं लाग भजनाला ॥ २ ॥ इंद्रियें निरोधीं, कवण मी शोधीं । त्रिकुटीं बंदी, करीं पवनाला ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे जा, निजधामीं निजा । मिळोनिचि जा, गगनाला ॥ ४ ॥

पद ६४.

वारंवार तुम्हीं परब्रह्म आठवा ॥ ध्रु० ॥ तुटली सोय तुमचि तुम्हीं परतोनि गांठवा ॥ १ ॥ महाशून्यीं चैतन्यीं मनाला

पाठवा ॥२॥ लांब रुंद उंच नीच नव्हे मोटवा ॥ ३ ॥ जातीचा अजात्या घरीं नेउनि वाटवा ॥ ४ ॥ निर्विकल्पीं कल्पना या सकळ आटवा ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे आंगीं पूर्णानंद दाटवा ॥ ६ ॥

पद ६५.

जोगी आलख जागे जागेरे ॥ ध्रु० ॥ विरक्त रंगलें अंगें, ज्ञानगंगे, स्नान तप्त वैराग्यें, विभूति अंगें, निपट नागे नागे ॥ १ ॥ संसार न ठावा, शून्य विसावा, रूप अभावाचे रिघावा, नाहीं अनावा, गोसांवी मौनीबावा ॥ २ ॥ आनंद छोटा, प्रेमाच्या जटा, त्रिवेणी वाटा, निघे गोल्हाटा, अवधूत मोठा ॥ ३ ॥ वीतरागी, अनुरागी, भोगी ना त्यागी, विराजे राजयोगी ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे या अंधाला, न पाहतां गेला, ऊर्ध्वपंथें आला, प्रेमपुरीं न्हाला, जीवनकळावीजा प्याला ॥ ५ ॥

पद ६६.

साधु या प्रकारचे हो प्राणी, तूं ध्यानीं आणी, दृश्य भासाला दृष्टी नाणी, ज्याचे पिढी नांदती तुर्या राणी, जाणा हो जाणा ॥ ध्रु० ॥ अद्वैताचें भजन करीत, हा लाभ त्वरीत, घेउनि बैसती आनंदभरीत, सहज समाधीवनितेला हरीत ॥ १ ॥ जन्मा येउनि परम दक्ष, साधिती मोक्ष, लाविती निरंजनीं लक्ष, सकळ व्यापक स्वरूप हें अलक्ष, जाणावें जाणा ॥ २ ॥ केवळ संतोषाचे गोळे, हृदयींचे भोळे, मन हें प्रेमामाजी लोळे, लागती ज्यांचे परब्रह्मीं डोळे ॥ ३ ॥ टाकुनि इतर सकळ धंदा, लागती छंदा, भेदुनि गेले हो नादबिंदा, जाउनी मिळाले जगदादिकंदा ॥ ४ ॥ जेजे समयीं जें घडलें साहाती, पाहण्याला पाहाती, निजींचा निजध्यास वाहती, अखंडित जे निरालंबीं राहती ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे हो त्याचे तोडी,

नाहीं दुसरी जोडी, त्यांची त्यांलाची ठावी गोडी, परमामृत सागरीं दिधली बुडी ॥ ६ ॥

पद ६७.

धुंडत धुंडत अवधुत जोगी ॥ ध्रु० ॥ सहज वाजवी अनाहत सिंगी ॥ १ ॥ ज्याचा तोची येकटा निवृत्ति मार्गी ॥ २ ॥ मीपण जाळुनी लावी विभूति आंगीं ॥ ३ ॥ अनुभव वनीं हा वैरागी ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे चिन्मुद्रा राजयोगी ॥ ५ ॥

पद ६८.

संत जातीचे सर्वांसी अद्वेषी, हकनक त्याला हे सर्वही जन कीं द्वेषी । वरती दाविती गोलता हे देसी, त्याच्या सन्मानें परम होती क्लेशी ॥ ध्रु० ॥ गाई हिंदूंशीं परम पूज्यमान, देखुनि दुश्चित्त मनिं हे मुसलमान । खाउनि दुभतें कीं निंदा हे बेइमान, सुंदरवनितेचा कामिक दुस्मान ॥ १ ॥ वृक्ष आहे कीं उगाचि आपुले ठायीं, वाटेन जातो तो मौजेनें घाली घाई । तो तंव कोणाचें कांहींचि खात नाहीं, अन्यायाविणें घडती हे अपायी ॥ २ ॥ चंद्रउदयीं कीं समस्त सुखी होती, तस्कर देखोनी परम दुःखी चित्तीं । अस्तमान व्हावा हें हृदयीं चिंती, निंदक जनासी साधुचि हे खंती ॥ ३ ॥ हंस खेळे सेवितो मुक्ताफळें, स्वाद कैसा हा नेणती कावुळे । त्याचे आंगींचें जरी का मांस मेळे, मूर्ख साधूचे लांछनीं देती डोळे ॥ ४ ॥ ज्याणें साधूची संगति करावी, त्याणें आधिंचि पुरति पारख ध्यावी । जीवींची खुण हे जातीनें समजावी, परतोनी सोहिरा ह्मणे प्रीत वाढों न द्यावी ॥ ५ ॥

पद ६९.

ऐसे जाणावे ते भक्त । तेचि योगी तेचि मुक्त ॥ ध्रु० ॥ पराकमळ पर पराग । तेथ गुंतती जैसे भृंग ॥ १ ॥ निरंजन हेंचि

मूळ । तेथ मुंगीचि केवळ ॥ २ ॥ अनाहत नागसर चांग । तेथ जैसे कां भुजंग ॥३॥ समाधी धन निज ज्योती । तेथ पायाळचि म्हणविती ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे सत्रावीचें जीवन । तेथ निःसीम जैसें मन ॥ ५ ॥

पद ७०.

निजनिलयनिवासी जोगी हो ॥ ध्रु० ॥ नित्य निरंजनिं निद्रा । चिन्मय लेउनि कानीं मुद्रा ॥ १ ॥ अखंडित सोहं जप । शिरीं तन्मयाचा टोप ॥ २ ॥ सर्व वृत्ति तांगडिया । चाले पश्चिमे गोदड्या ॥ ३ ॥ भक्ति वैराग्यें वाविली । शुद्ध सत्व जाची शैली ॥ ४ ॥ अनाहत शिंगी वाजे । तेणें गगन मंडळ गाजे ॥ ५ ॥ नादबिंद कळा ज्योती । आंगीं लावोनि विभूती ॥ ६ ॥ भोगी असतां जो वीतरागी । सोहिरा म्हणे राजयोगी ॥ ७ ॥

पद ७१.

ज्ञानगंगातीरवासी वैरागी ॥ ध्रु० ॥ हांसत खेळत डोलत बोलत नित्य वैरागी । तन्मय बीजा सेउनी सहज रंगे निजरंगीं ॥ १ ॥ चिन्मय गोपीचंदन नामें उजळे निजांगीं । बोध कमंडलु दंड विवेक त्रिवेणी मार्गी ॥ २ ॥ चालत पश्चिम पंथीं मध्यमा सुरंगी । भोगुनि त्यागी जो वीतरागी सोहिरा म्हणे राजयोगी ॥ ३ ॥

पद ७२.

हें तूं उमजरे अंतरींचें गुज ॥ ध्रु० ॥ साक्ष दृष्टीचें, प्रेम वृष्टीचें, सकळ सृष्टीचें बीज ॥ १ ॥ स्वानंदाचें, विहंगमाचें, उडणें साचें, चहुं वाचांचें पूज ॥ २ ॥ सोहिरा म्हणे हें विसरे मागें, अनुभव आंगें, येउनिचि लागे, चिन्मयसेजे निज ॥ ३ ॥

पद ७३.

हा तूं भोगरे चिन्मय राजयोग ॥ ध्रु० ॥ मुनिजनवर्या, अमित कुमार्या, चैतन्यचर्या, सर्वज्ञ तुर्या ॥ १ ॥ अनुप दीप

द्वीप, निवृत्तीचा भूप, रूपातिताचें रूप ॥ २ ॥ विद्यारविंदा, पराप्रमदा, आनंदकंदा, सच्चिदानंदा ॥ ३ ॥ संसार ताफा, उधळुनि वाफा, अद्वय कैफा, चिद्भ्रमरगुंफा ॥ ४ ॥ सोहं अनंगा, भरितरंगा, मनतुरंगा, बुडविल चिद्गंगा ॥ ५ ॥ म्हणे सोहिरा अहंभग्न, स्वतेज अग्र, लावुनि लग्न, स्वयेंचि हो मग्न॥६॥

पद ७४.

जा मिळावया स्वामिला । निजधामीं निर्विकल्पाला ॥धु०॥ स्वहित चुकसी, भजनीं लखसी, उगाची चकसी, विषयां टाकसी, मनचा आकसी, विवाद शिकसी, विद्या विकसी, निंदानीं ठकसी, कशासी बघसी, वृथा वाग्जल्पाला ॥ १ ॥ मोड, मीं तूं हे दौड, वासना खोड, हृदयींचि तोड, वल्गना कोंड, इंद्रिय वोड, पवनाशून्य मडकीं फोड, त्रिकुट हें सोड, जाणवीं गोड, सुख हें जोड, लाभ हा न वचे कोटिकल्पाला ॥ २ ॥ घोंक, अंतरीं रोंक, लाउनि मोख, मनाला मेख, मारूनी रूपरेख, विण देख, ब्रह्म हें ठोक, ज्ञान कीं हें रोख, नाणे कधीं जोख, गुरूकडे चोख, करूनि घे स्थूळ दृष्टिनें भुलों नको या शरीर सुख अल्पाला ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा बुज, तें सुख रीज, लाउनि तीज, त्या रसीं भीजउनि मन थीज, पुरतें मुजरा करीं हुजरातिला गुजराण हें गुज, गुरूचें बीज, अनादि नीज, तेथ उघडझांक नसे डोळ्यांच्या मलपाला ॥ ४ ॥

पद ७५.

ऐसा असला तरीचि साधु म्हणों हो आह्मीं त्याला । समाधीचें स्मरण होता अद्वय अंमल प्याला ॥ धु० ॥ प्रथम ज्याणें मी हा कवण विवेक पाहिला । दोन्हीं पाहुनि झाला पिंड ब्रम्हांडा वाहिला । मग जें उरे परब्रह्म होउनि राहिला ॥ १ ॥ वृतासाठीं दुध पोटाळुनि जन्मवरी । असला तरि तें या तोंडीं न पडे हो लौकरी । तैसें सगुण चालुनि ज्ञानें चाळवित्या नि-

धारी ॥ २ ॥ सृष्टी कीं अवतार ज्याला तरंगाप्रमाणें । तेते ठायीं जाईना तो मुळीं कीं जळ जाणें । व्यापक ज्याचें मनचि गगना नाहीं येणें जाणें ॥ ३ ॥ न साधितां ज्याणें नाथ संकेत साधीला । रेचक पूरक कुंभकावीश्वायु किं हा प्याला । नवहि द्वारें चळतां दशवे द्वारीं स्थिरावला ॥ ४ ॥ ज्या वणाच देह ते ते हाट न मोडी । मेले रडती तैसी प्रपंच माया हे न सोडी । श्रवण मनन निजध्यास घेतो निजसुखाची गोडी ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे भेटेल तेव्हां तोचि आमुचा देव । न्हेईल तेथ त्याचें संगें सुखें आह्मीं जाऊं । त्याचे चरणीं माथा आह्मीं वेळो-वेळीं ठेऊं ॥ ६ ॥

पद ७६.

हरघडी हरिचें घे नाम । येणें पाव परात्पर निजसुखधाम ॥ ध्रु० ॥ सकळहि इंद्रियें चाळक कवण हा । वोळख तूं आत्माराम ॥ १ ॥ निरंजन वनीं रंजोनियां मन । करीं तूं हे हृदय आराम ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा आयुष्य सरतें हें तुला न स्मरतें । नको राहुं बेफाम ॥ ३ ॥

पद ७७.

सेवीं निरंजन सुख हें सार । सर्वांमध्यें पाहा हो ॥ ध्रु० ॥ अनुभवें त्याग विषयभोग । दृश्यातीत राहा हो ॥ १ ॥ उलट दिठीनें त्रिकुटावरी । अंतरज्योती पाहा हो ॥ २ ॥ कल्पना मळ निर्मळ करीं । ज्ञानगंगे नाहा हो ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे कीं ऊर्ध्व पंथीं । प्राणापान वाहा हो ॥ ४ ॥

पद ७८.

तूं राजी मन करीं । प्राणिया ईश्वरभजनावरि नियत धरीं अंतरीं स्मरीं ॥ ध्रु० ॥ सज्जनिरंजन निधी निरंजन । ज्ञानांजन निज दिठी भरी ॥ १ ॥ ह्मणे सोहिरा नरतनु दुर्लभ । आत्मा लाभ हा संकटें नानापरी हरी ॥ २ ॥

पद ७९.

भजन करीं कांहीं सुख देतें ॥ ध्रु० ॥ कुतर्कांचा मार्ग निरोधीं, न जावें आधीं मन विरोधी । पुनरपि कधीं न करीं निंदेतें ॥ १ ॥ संतांसीं सद्भाव धरावा, योगज्ञानें अभ्यास करावा। सांपडेना उगें स्नानसंध्येतें ॥ २ ॥ साधन संपत्तीला अढळेना, सद्गुरु वांचुनि तें कीं कळेना । करीं आत्मस्वरूप देतें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मोक्षचिंतन, चित्त लागे अलक्ष अचिंतन । पारंगत करीं ब्रह्मपद तें ॥ ४ ॥

पद ८०.

प्रीत धरीं त्रिभुवनपतीची ॥ ध्रु० ॥ निषिद्ध मार्गीं स्वयंभ कांटे, लाउनि त्याविण गोड न वाटे । स्मरणचि करितां आनंद दाटे, पतिव्रतेला जेंवी प्रियपतीची ॥ १ ॥ जन्ममरण संसार भ्रमण, आपण कोण याचें विस्मरण। नासे उपाधी नानाविपत्तीची ॥ २ ॥ जगतरंग सुरंग उठती, उठले जेथुनि तेथुनि फुटती । एकमेकां वरि जैसे जुटति, चैतन्य एक अपांपतीची ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे ईश्वर सत्ता, दिसतो नासतो नाना मत्ता । तो तत्र आपण या नियंता, जेवीं नगरीं प्रतिमा नृपतीची ॥ ४ ॥

पद ८१.

स्थीर करीं हें मन कीं तेथें ॥ ध्रु० ॥ नाम रूप उच्चारिला भेद, सरल्या उरलें मुळींचि अभेद । नेति नेति म्हणती वेद जेथें ॥ १ ॥ पाहातां आधीं शून्यचि वाटे, वाटति जाणिव चैतन्य आटे । सबाह्यांतरीं आनंद दाटे, मन बुद्धीसी वीण प्रकाश जेथें ॥ २ ॥ चित्ता भ्रमण सहज सुखावे, श्वासोश्वास तेथचि धांवे । चित्कळेंतिल आमोदसुधेतें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे हेंचि आराधन, कोणा न दिसे गुप्त हें साधन । नित्य वाटे समाधान जेथें ॥ ४ ॥

पद ८२.

निश्चळ अचळ अनंताला । भज परम प्रीति भगवंताला ॥ ध्रु० ॥ परमात्मा आत्मा हा अंतरसाक्ष अनाम अतीताला । पूर्ण कृपाघन जो भूतभावन पावन करितो पतिताला ॥ १ ॥ भूत संग स्थावर जंगम सोडुनि सेवीं तूं संतांला । गुह्य गुरू बीज माग तयांप्रति लाग विहंगम पंथाला ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा पूर्ण प्रतीति वेदांत श्रवण करीं ग्रंथाला । श्रवण मनन निजध्यासें त्वरित घे अनुभव हा एकांताला ॥ ३ ॥

पद ८३.

हे पूर्ण कळा भगवंत कृपा करोनि देईल जेव्हां ॥ ध्रु० ॥ मन तंव शून्यचि झालें आहे, मिथ्या प्रपंच नेत्रीं पाहे । सोहं ध्यास निरंतर वाहे, सुख दुःख न सिवे तेव्हां ॥ १ ॥ अंतर आकळेना उपाधीन, केवळ इंद्रियें होती स्वाधीन । स्मरणें धावणें सहज समाधीन, पावणे ये घडिये तेव्हां ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा असतो, वरि वरि संसारीसा दिसतो । व्यापक निरालंबीं वसतो, वसतो नकळे केव्हां ॥ ३ ॥

पद ८४.

करिं हो कांहीं सार्थक तरि या जिवाचें ॥ ध्रु० ॥ ज्ञानांजनेंचि भ्रम भंजन करीं, निरंजनीं लय लाउनि अंतरीं । मानसपूजन सदाशिवाचें ॥ १ ॥ संतसमागम सदैव करी कां, आगमनिगम वर्णी जें का । त्रिवेणी संगम अनुभवाचें ॥ २ ॥ कर्ण श्रवण बलविकर्ण गुण हे, वर्ण व्यक्तितीत अर्थ मनन करी । येणेंचि निकुंतन हें भवाचें ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा सुफळ वारि हें, जन्म निवारीं बद्ध नपवे । इंद्रिय व्यापारीं अजप जपणें प्रणवाचें ॥ ४ ॥

पद ८५.

तरी होय स्थिरासन अचळ मनाचें ॥ ध्रु० ॥ साधनाचें आराधनाचें इंद्रियवृत्तीनिरोधनाचें । फळ हें यावें सुफळ व्हावें दर्शन ज्ञानधनाचें ॥ १ ॥ ज्याही खाणी ज्याही वाणी गगन पवन मही तेज पाणी । भगवत्सत्ता ध्यानीं आणीं अवचित करि गमनाचें ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा प्रवृत्ति सकळहि व्यावृत्ति निवृत्ति होउनि । चित्तवृत्तिला अर्धमात्रा औषध हें दमनाचें ॥ ३ ॥

पद ८६.

अरे तूं धरूं नको धरूं नको, लटिका हा अभिमान । शाश्वत नाहींरे संसारीं, देहा कोण जमान । जेथुनि आलासा जन्माला, तेथ धरीं इमान । सहसा होऊं नको होऊं नको, भगवंतीं बेइमान ॥ ध्रु० ॥ हें तूं जाणरे सुजाणा, दोहीं दिवसांचें वत्व । आयुष्य कितुकें हें कळेना, कसा येतसे वत्व । कांहीं गुरुमुखें उमजुनि घे, पाव निरंजन तत्त्व । याला द्विरंग तूं करूं नको, शेवट पडसिल फत्व ॥ १ ॥ पुरता पाहावा तनुचा, चाळक हा कोठें । अनुभवीं पाहातां पाहातां, मन होय थोटें । सहसा नयेचिरे दाखवितां, हा ह्मणुनी बोटें । रूपरेखेविण अगोचर, हेंचि गूढ मोठें ॥ २ ॥ सावध करितां रे घरबार, भजनाचा करभार । देउनि सोडूं नको दरबार, मुळींचा वारंवार ॥ ३ ॥ स्वरूपिं सागरींचे तरंग, विचित्र नाना रंग । अंबरीं पवनाचा तुरंग, चाल तूं अंतरंग ॥ ४ ॥ गुप्त हे सत्ता ते कैसी तर्जे, काम क्रोध हे वर्जे । करोनी करणें तो देवा अर्जे, नाहीं जनासीं गर्जे ॥ ५ ॥ नको हे साधुंचि हे खरकत, नाहींरे बरखत । निंद वादाचें मोठें खत, बधिर मुका जन्मत ॥ ६ ॥ आतां जीवित्व हें उद्धारीं, चित्त दे जगदुद्धारीं । गुंतूं देऊं नको आकारीं, रम तूं निराकारीं ॥ ७ ॥ सांडीं विषयाचा विलाप, कर्म क्रिया कलाप । भगवद्गुणानुवाद आलाप, महानंदीं

मिलाफ ॥ ८ ॥ भव हा दोराचा रे साप, कोण्हा पुण्य पाप । भ्रांती जावी हे निःपाप, अरूपीं आपेआप ॥ ९ ॥ भेदुनि त्रिवेणीचा संगम, मन हा सारंगम । सहस्र दळीं पावावा सुगम, मार्ग विहंगम ॥ १० ॥ जेथ वेदाचा नचले तर्क, मावळले चंद्रार्क । महा अद्वैत पिउनी अर्क, सोहिरा ह्मणे हा गर्क ॥ ११ ॥

पद ८७.

तूं कसारे तरशिल प्राणिया हरीभजनावांचुनि ॥ ध्रु० ॥ तुझें चंचळ हें बहु चित्त, घडि नससी सावचित्त । असे चिंता हे डंवचीत, नसे आत्मसुखाची प्रचित । असे मृत्यु हा अवचित, जीवित काय करिसी सांचुनि ॥ १ ॥ केवळ बुद्धीचा तूं हीण, होसी शब्दज्ञानें प्रविण । उपदेशउदकीं तूं पाषाण, सुख नेणसि विषयांविण । वैराग्य न धरे क्षण, काय करिसी ग्रंथ वाचुनि ॥ २ ॥ सदैव वदनीं निंदा, आन नसेची दुसरा धंदा । तूं अजाण दुर्मति मंदा, या विषयमदें मदांधा । तूं स्वभावें रे बेबंदा, साधुसंताला जाचुनि ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा तूं मूढरे, परमार्थ तुला हा गूढरे । बाहेर लौकिक करिसा रूढरे, ये पुढें यम घेईल सूडरे । तुझ्या जिण्या लागो चूडरे, अति इंद्रियां लांचुनि ॥ ४ ॥

पद ८८.

तूं राम राम स्मरें अगम अगोचर अनादिसिद्ध अच्युत करुणाकररे ॥ ध्रु० ॥ असोनी न दिसे देहीं कसा असे चाळवि हें अंतररे । साधु समागम करोनि पुस हें भवसागर हा तररे ॥ १ ॥ अंतवंत हें शरीर यास्तव त्वरीत सार्थक कररे । विष शमुनि संतोष पावला जपतां शिवशंकररे ॥ २ ॥ पूर्ण ब्रह्म वैकुंठपति अवतार रमावर नररे । लीलाधारीपदिं शिळा तरलि बहु उद्धरले वानररे ॥ ३ ॥ लंकापतिसह दानव वधि-

ले महा ही धनुर्धररे। ह्मणे सोहिरा रघुनंदन हा वंदुनि निरशीं मायामय दुर्धररे ॥ ४ ॥

पद ८९.

आनंदमय असों किंचित् हें ॥ ध्रु० ॥ दृश्यभास हा नाश पावे, घडीघडी यावर मन जें धांवे। परतुनि मुळिलें वळिलें व्हावें, समाधिसुखिं अवचित हें ॥ १ ॥ स्थावरजंगम भूतग्राम, नाना लीला रूपनाम। आंतुनि खेळवि शरीर चाम, आहे नाहीं हरीविरचित हें ॥ २ ॥ सर्वव्यापक अनंताला, प्राण्या तूं स्मर भगवंताला। तदपमानिं जीवजंताला, तुज सांगतों कर हित हें ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा तारक स्वामी, लय लागों ज्या आत्मारामीं। ज्ञानकळा हे अंतर्यामीं, सदा कि सावचित हें ॥४॥

पद ९०.

आनंदलें बहु मन हें ॥ ध्रु० ॥ करितां अंतररूपतर्जन हें, प्यालें प्रेमाचा पर्जन्य हें। केलें विवेक उपार्जन हें, ऐकोनि अनाहत घनगर्जन हें ॥ १ ॥ भवांतुनि निघालें, केवळ महाशून्यि रिघालें। ब्रह्मबोधेंचि धालें, झालें उपशमदम उन्मन हें ॥ २ ॥ व्यतिरेकीं रिझालें, केवळ अन्वयावरी आलें। चैतन्यीं तद्रुप झालें, न करी पुनरपि आगमन हें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे हें निःश्चळ समाधी, सुखेंचि क्रमतें वेळ। पाहुनि भगवंताचा खेळ, कीं आश्चर्यवत् जन वन हें ॥ ४ ॥

पद ९१.

अझुनि समजुनि काय बसलासी ॥ ध्रु० ॥ संतसमागम किमपि न रुचे, इंद्रियवर्ग हे मिळउनि लुचे। परि नामाचें हित हें न सुचे, नरदेहीं येउनि तूं फसलासी ॥ १ ॥ वंध्येचें संतान प्रपंच, एकचि जागा मिळती पांच। मिथ्या लागली तुज हे आंच, मोहचिकाला तूं डसलासी ॥ २ ॥ श्रमलासी हाचि

ध्यास वाहातां, पाहीला ना कधीं स्वस्थ राहातां। लाज न वाटे हें दुःख साहातां, कुसंगेंचि तूं वसलासी ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मूळ नसलासी, अन्यथा ज्ञानें कसलासी। केवळ मूर्ख तूं मज दिसलासी ॥ ४ ॥

पद ९२.

तरि देवचि होईल प्राणी। जें कां शाश्वत ध्यानीं आणी ॥ ध्रु० ॥ विहंगम हा आकाशीं पाषाणीं, दृष्टीसी सृष्टी दिसे हे उखाणी। शून्य आंतहि चारि खाणी, ईश्वराचें नवल हें वाखाणी ॥ १ ॥ वाणी टाकिल ओंगळवाणी, नाम सुधारसें रंगली वाणी। ऐकतांचि हें कौतुक वाणी, पावे निरंजन निर्वाणी ॥ २ ॥ होईल प्रसिद्ध शास्त्रपुराणीं, निजकळा अनादि पुराणी। अवघी केली विकार चुराणी, सोहिरा ह्मणे प्रकट तुर्याराणी ॥ ३ ॥

पद ९३.

प्राण्या देवचि होउनि राहा। तुज अलभ्य लाभ नरा हा ॥ ध्रु० ॥ नाश आहे कीं शरीर आवारा हा, नपडे उमज मूढ गव्हारा हा। श्वास येतो कीं आंगोळ्या वारा हा, केव्हां निघेल नेणो कीं वारा हा ॥ १ ॥ तयाविण कोण नाहीं दुसरा हा, स्मरीं मूळ सोहंविज विसरा हा। ब्रह्म ईश्वर जिव नाहीं तिसरा हा, अभिमान तुला नसराहा ॥२॥ सोहिरा ह्मणे नको भेद कीं जरा हा, उलंडीं त्या अनाहत गजरा हा। पंचभूतें गुणातीत अजरा हा, नित्य पी तूं त्या प्रेमपाझरा हा ॥ ३ ॥

पद ९४.

जगीं तूं धन्य एक ॥ ध्रु० ॥ देहपण विषयांसि आभारिलें। धरीसि यर्यांसि वेगळीक ॥१॥ सारसार हें जाणोनियां निकें। न धरीसि हा भवशोक ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग नाहीं जन्ममरण। काय सांगों अलोलिक ॥ ३ ॥

पद ९५.

मग कांहीं चिंता नाहीं हो ॥ ध्रु० ॥ जन्ममरण हरी शरण जाई हरी । स्मरण करीत हें राहीं हो॥१॥ व्यासवचनीं अभ्यास करोनियां । ध्यास निरंतर वाहीं हो ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा गीतावाक्य संगितासी । आणोनी गीत गा हें सबाह्मीं हो॥३॥

पद ९६.

स्मरारे प्राणिया हरीला स्मरा ॥ ध्रु० ॥ आझुनि गुंतसि तूं किति संसारा, स्वप्नप्राय हा दिसतो पसारा । विवेकें पाहा सारासारा, परात्पर अजरामरा ॥ १ ॥ नरकीं न पडें तें करिं आचरण, भगवंताला यावें शरण । नित्य करावें नामस्मरण, येणें चुके जन्म मृत्यु जरा ॥ २ ॥ शरीर हें कवणें कैसें घडलें, पंचभुतात्मक विषयीं जडलें । साक्षित्व यामधें न सांपडलें, निश्चय हा दृढ धरा ॥ ३ ॥ सर्वहि गेले या काय हें उरतें, कोठुनि उत्पन्न कोठें मुरतें । पाहाण्यांत पाहाणें पाहा पुरतें, आनंदेंचि काळ हा हरा ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे आयुष्य जातें, ब्रह्म हें नरदेहींहुनि उमजातें । संतसमागमें कीं समजा तें, चित्त हें त्यांतचि भरा ॥ ५ ॥

पद ९७.

तें तूं पाहीं परब्रह्म आपुले ठाईं । निरंतर त्याचाचि ध्यास वाहीं । संतसंग यास्तव करणें कांहीं । हृदयीं असोनी कोठेंचि दिसत नाहीं ॥ ध्रु० ॥ ज्याचे सत्तेनें शरीर उपजे नाशे । ज्याच्या तेजें शशि सूर्य हा प्रकाशे । जेथें रहायाला घर केलें किं आकाशें । ज्याला पाहातांचि कल्पना हे नासे ॥ १ ॥ जीव झाला कोठुनि नेणे आला । शरीर संयोगें लुब्ध इंद्रियांला । देह हें सुटल्या मग काय होय त्याला । ऐसा विवेक उत्पन्न कोठुनि झाला ॥ २ ॥ आत्मा निर्गुण निर्विकार तूंची ।

जें जें घडतें तें जाणसि आंतचि । जन्मा आलें तें आहे कीं जातचि । जे कां अविनाश असतें कीं रहातचि ॥ ३ ॥ जागृतींत जें जें दिसे त्याला । स्वप्नामाजि आणीकचि दिसे त्याला । सुषुप्तिमाजि शून्य देखोनि भ्याला । तीहीं अवस्थांचा साक्षी कोण झाला ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे चहुं वाचांचें जें मूळ । भेद नाशि कीं द्वैताचा समूळ । आच्छादिला जेविं भुंगी काडी गुळ । तेविं स्वरूप व्हावें सान कुळ ॥ ५ ॥

पद ३८.

भगवंताचें नवल मोठें पाहीं । आपण असोनि कशाच मध्यें नाहीं । पंच भूतांशें कर्में घडति देहिं । झाला येला दिसे प्रपंचाचे ठाईं ॥ ध्रु० ॥ एक गातो किं एक एका खातो । चिंता वाहातो किं निश्चित एक रहातो । एक येतो कीं एक वाटे जातो । दोरावरी कीं सर्प भासला तो ॥ १ ॥ बहुत प्राणी कीं विसरले देवा । विरळा कोण्ही किं अनन्य करिति सेवा । एक सेविति केवळ विषयमेवा । दोन्हीं नकळे त्या ब्रह्म स्वयंमेवा ॥ २ ॥ अवघा संसार अभ्रिची साहुली । नामरूपें हीं विचित्रचि बाहुलीं । यांला पिता नाहिं कीं माउली । चाल आकाशीं परत पाउलीं ॥ ३ ॥ दृष्टी न दिसे तें सदैव आहे येथ । याचा गेला समुळ ज्याचा हेतु । सोहिरा ह्मणे येथ कारण आपला हेतु । प्रत्यक्ष दीसतें तें मिथ्या नाशे तेथ ॥ ४ ॥

पद ३९.

याची साठीं शरण भगवंताला प्राण्या यावें हो ॥ ध्रु० ॥ प्राप्त व्हावें ब्रह्मज्ञान, नित्य सुख समाधान । लागावें कीं तेंचि ध्यान, आत्मअनुसंधान । चिंता शोक रहित चित्त स्वस्थ असों द्यावेंरे ॥ १ ॥ नगीं जातां न भ्यावें, दृश्यभासासि न यावें । अंतरीक्ष राहावें, नवल हें पाहावें । वर्तोनि किं याचि

यला तुज ज्याणें, सर्व हें विश्व चलतसे त्याणें। त्यातें तुज नाहि पाहाणें, जो कां समग्र आत्मा हृदयीं बसे ॥ २ ॥ नाशिवंत हें पाहासी, याच्या विश्वासें तूं राहासी। अवघा ध्यास तोचि वाहासी, परी नेणसी हें मुद्दल कसें ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा कांहीं, तुजला संत समागम नाहीं। यास्तव पाहीं केवळ मोही, भव विभ्रम हा नयनिं बसे ॥ ४ ॥

पद १०२.

कांहिं सार्थक करीं तूं प्राण्या लौकररे ॥ ध्रु० ॥ देह हें स्थूळ भ्रमाचें मूळ, प्रपंच ह्मणणें अवघें खूळ। शेवटिं तुजला हें प्रतिकूळ, अंतीं कांहिं नाहीं हें तों दिसे क्षणभररे ॥ १ ॥ सोडुनि स्वार्थ धरीं परमार्थ, आत्महिताविण फिरणें व्यर्थ। गुरुमुखें समजुनि घ्यावा अर्थ, सांगितलें तुज तें तें कांहीं चित्तीं धररे ॥ २ ॥ शरीरीं कवण हा साक्षी पाहा, त्याला पाहुनि तेथचि राहा। ध्यास निरंतर तोचि वाहा, विश्वातीत परमात्मा तो हा। तद्रूपचि होउनियां जिव उद्धररे ॥ ३ ॥ अनंत रूपीं हा अनंत वसतो, दृष्टीविण हा सदैव दिसतो। कांहिंचि नाहिं त्या रूपीं असतो, सर्वगतचि किं व्यापक हा विश्वंभररे ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा निश्चय व्हावा, तरीच तुजला पडेल ठावा। केवळ मिळसि जरिं सद्भावा, स्तविविद वदनिं नित्य वदावा। महा दुस्तरचि भवनदी कीं हे माया तररे ॥ ५ ॥

पद १०३.

प्राण्या दैव कैसें उणें झालें। देवा तुज करुणत्व न आलें ॥ ध्रु० ॥ अमृतामाजी राहातो। आणी विषयकांजी प्यातो ॥ १ ॥ जागृतीची नावड। कैसें स्वप्नचि वाटतें गोड ॥ २ ॥ अनर्घ्य रत्नहारा। टाकुनि पदरीं घेतो गारा ॥ ३ ॥ लटिक्याचि मृगजळा। देखोनि तृष्णेचा पसरी ताळा ॥ ४ ॥ तूं

देहीं विदेहि हें व्हावें हो ॥ २ ॥ धरावा कीं हाचि ध्यास, करावा हा योगाभ्यास । जिंकोनियां शून्यास, अंतरीं हा संन्यास । पूर्ण बोध परमामृत सिद्धीची हे व्यापि हो ॥ ३ ॥ समबुद्धी जनवन, दिसावा किं जनार्दन । होउनियां उन्मन, वर्षो हा आनंदघन । प्रपंचिं गुंतलें मन निरंजनीं न्यावें हो ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे हेंची भावे, चैतन्य हें व्हावें ठावें । अनुभवाला यावें, जन्म मृत्यु सुटोनि जावें । नरदेहीं सार्थक एवढें करोनियां ध्यावें हो ॥ ५ ॥

पद १००.

आणि या संतांचें दर्शन नित्य रूप ध्यावें हो ॥ ध्रु० ॥ येउनियां मृत्युलोकीं आत्महित अवलोकीं । अध्यात्म ऐकावें सुखीं असावें कीं सदां । सुखी स्वस्थ भावें करोनियां त्याचि अर्थीं चित्त द्यावें हो ॥ १ ॥ स्थूल देह नासुनि जाय मग कोठें काय आहे याचा मोह । धरोनि काय वैराग्य हें हृदयीं राहे । ऐसें आत्मज्ञान पूर्ण मनाला या व्हावें हो ॥ २ ॥ तन्मयीं तद्रूप व्हावें स्वरूपीं सदृढ भावें । सर्व भूतिं तेंचि ध्यावें अखंडित तेंचि गावें । ब्रह्मरस पिउनि महा आनंदांत यावें हो ॥ ३ ॥ वर्णिलें जें वेदांतीं चैतन्य हें आदि अंतीं । सांगितलें नाना ग्रंथीं साधन हें नाथपंथीं । अलक्षीं हें लक्ष लाउनि एकांता न्यावें हो ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे हेंचि माग याचि मोक्षकामा लाग । भ्रांतिचा हा फिटेल डाग विश्व नाहीं तेथ जाग । असोनि किं याचि देहीं नलगे मग भ्यावें हो ॥ ५ ॥

पद १०१.

तुं कोठुनि कवण आलासी प्राणिया स्मरण नसे ॥ ध्रु० ॥ कर्म लागलें पाठीं, तेव्हां देहासी पडली गांठी । येथ गुंतसी भोगासाठीं, जड हें शरीर मानुनि भींचि असें ॥ १ ॥ निर्मी-

गुरुकृपा माउली । सांडुनि ताडाची घेतो साउली ॥ ५ ॥ भव-
दोराची नागीण खायी । कर्म झाडणि घालुनि घेयीं ॥ ६ ॥
न वचे अविनाशाचे घरीं । वृत्ति धांवे दृश्यावरी ॥ ७ ॥ आतां
निरसीं हे माया माव । नांद तूं अंतःकरणीं देव ॥ ८ ॥ सोहिरा
ह्मणे मज हें देणें । आतां तूं तो किं मी तूं होणें ॥ ९ ॥

पद १०४.

आहे तेवढें बरें । जऱ्हीकां कल्पना मुरे ॥ ध्रु० ॥ वनिचिया तरुवरां, सिंचि कोण वरी नीरा । सहज हालति समरें ॥ १ ॥ संचित क्रियमाण, पहिलें बांधोनि प्रमाण । देह धरिलें गिरिधरें ॥ २ ॥ ज्याचा तोचि कर्ता हर्ता, नसता अभिमान धर्ता । म्हणउनि जीव हें नाम उरे ॥ ३ ॥ प्रपंच परमार्थला, नाणी द्वैत अभावाला । सोहिरा जाणे अंतरें ॥ ४ ॥

पद १०५.

देह हें सूक्तिपर्णी । टाकुनि घेईं मुक्तमणी ॥ ध्रु० ॥ असोंगियानें सोंग घेतां, निजरूप पालटतां । प्रबुद्ध न भुलती आभरणीं ॥ १ ॥ कर्दम अवघा सांडुनि, मग तें सोज्वळपण निवडुनि । घेती शुकचि ते पाणी ॥ २ ॥ वृक्ष समत्व हेळुनि, एक चंदनसा निवडुनि । नाग जडले प्रेमळणी ॥ ३ ॥ भिन्नपणें स्थूळ दृष्टी, मानुनी सूक्ष्मपणें सृष्टी । सोहिरा एकात्मा सगुणी ॥ ४ ॥

पद १०६.

गोवर्धनधारी वाचे बोलरे ॥ ध्रु० ॥ सनकसनंदन देव सरोवरा । ज्याचें स्वरूप सखोलरे ॥ १ ॥ याही चराचरीं येक अनेक । पार उतारी भवपैलरे ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निजदेहीं सुखामृत । सेउनि आनंदें डोलरे ॥ ३ ॥

पद १०७.

साधुजन वंद्य ॥ ध्रु० ॥ नित्य अनित्य, हें जाणोनि सत्य । स्वरूपीं होती स्वसंवेद्य ॥ १ ॥ प्रकृति भुलाई, सांडुनि लवलाहीं । पाहाती अनूतन आद्य ॥ २ ॥ विद्या हे इतरिक, सांडुनियां निजयेक । घेती अध्यात्मसुविद्य ॥ ३ ॥ विषयसुखीं भेद, मानु-नियां अभेद । सोहिरा पूर्णाल्हाद घेतो सुख सद्य ॥ ४ ॥

पद १०८.

देउनि तन मन घे निजधन तें ॥ ध्रु० ॥ जन हें सांडुनि विकल्प मोडुनि । देख एकांत विजन तें ॥ १ ॥ चित्तवृत्ति तेथचि रमति । सर्वेचि होय अमन तें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग प्रेमसुखामृत । सेउनि पावें शमन तें ॥ ३ ॥

पद १०९.

धरीं हरिस्मरणाचि आवडी । अपूर्व आहे गोडी ॥ ध्रु०॥ देईं संसारासी सोडी । सर्वें निजसुख जोडे जोडी ॥ १ ॥ न-लगे विषयसुखाचि चाडी । तोडीं लिंगदेह बेडी ॥ २ ॥ काढीं कल्पनेची आडी । पुरते निवृत्तिचि कोडी ॥ ३ ॥ निरसीं देह भास काडी । सोहिरा ऊर्ध्वमुळातें धुंडी ॥ ४ ॥

पद ११०.

सदैव निराकार । मिथ्या मानी हा आकार ॥ ध्रु० ॥ पा-हातां अंतरदृष्टी, दिसे लटिकिचि अवघी सृष्टी । आहे सतत निर्विकार ॥ १ ॥ निज उगमासि मेळुनि, सर्वे कल्पनेसि हे-ळुनि । करी जो विषयांचा धिकार ॥ २ ॥ बाह्य विषय त्यागीं, बरवा अंतर विषय भोगीं । सर्वें निजसुख स्वीकार ॥ ३ ॥ स-होदर एका निर्जीचा, जाणोनि जें जें देखे साचा । सोहिरा न धरी अधिकार ॥ ४ ॥

पद १११.

सेउनि अर्धचंद्रा । प्रेमें गाऊं रामचंद्रा ॥ ध्रु० ॥ लाउनियां निज मुद्रा । स्वरूपीं भाउनि ज्ञानसमुद्रा ॥ १ ॥ हें भव वृत्ति आर्द्रा । हारोनि निर्जी निज योगींद्रा ॥ २ ॥ सुषुम्नेच्या छिद्रा । लक्षुनि मार्गें त्या खगेंद्रा ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे ब्रह्मरंध्रा । घेऊं सहज समाधी निद्रा ॥ ४ ॥

पद ११२.

अरे कां रे विसरलासि आपणियां तूं ॥ ध्रु० ॥ नासिवंत जाणोनियां, मग निजसुख नेणोनियां । धरिसी भवबंधहेतु ॥ १ ॥ एक अनेकीं विरूढलासी, या चराचरीं । तूंचि विश्वपटीं तंतु ॥ २ ॥ फिरत फिरत असंसि, कष्टें बहुतें श्रमलासि । मिथ्या जन्ममरणा तूं ॥ ३ ॥ निज मुळींचा, जाणोनियां तूं आपणापें साचा । सोहिरा निजपदीं रम तूं ॥ ४ ॥

पद ११३.

नाहीं म्हणाया काय हरीविण । कासया करिसी फार भ्रमण ॥ ध्रु० ॥ आपुल्या काजया खेळ करी तया । भूषण नाणीं तें काय दूषण ॥ १ ॥ प्रयोजी कृतांतरीं हार निराहारी । लक्षणी असोनि जें विलक्षण ॥ २ ॥ मेदिनी देखणें आकाश लेखणें । सर्वेचि ठाउकि होय निजखुण ॥ ३ ॥ व्यक्तिसि हारोनी अव्यक्त घेउनी । मानीं जें मग तें प्रमाण ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे जें हें कल्पूं जातां नीर । हेतुविण न लभतें निर्गुण ॥५ ॥

पद ११४.

सांडीं भ्रमा हरीरंगें रमा ॥ ध्रु० ॥ विषयसुख हें दुःखदायक । याहुनि जें सुगम ॥ १ ॥ जरी करील कृपा अनुभव सोपा । दावी स्वरूप हें अपर प्रतिमा ॥ २ ॥ गुजाचें गुज आहे जें निज । अगम जें निगमा ॥ ३ ॥ माझें मीपण हारलें पूर्ण । सोहिरा म्हणे सुखा नाहीं सिमा ॥ ४ ॥

पद ११५.

अरे सज्जन हो विजन देखें ॥ ध्रु० ॥ विषयमदादिक पोळुनि आघवें । जेथ सदाशिव तोखे ॥ १ ॥ अनात्मक हें सकळहि आटुनि । अभेद नगीं उमा वोखे ॥ २ ॥ शंखध्वनि हे अनुदिनीं वाजत । नारी झुलत निज सौख्या ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे तें स्थान पाहे तो । पुनरागमनासि वोळखे ॥ ४ ॥

पद ११६.

अरे अरे प्राण्या वदनीं वद कां रे हरिहरनाम ॥ ध्रु० ॥ भजनीं निज मानस देईं, त्या जनीं वैराग्य न्हेईं । विजनीं जन समता घेईं, पूर्ण होईल निजसुख काम ॥ १ ॥ धरीं कां दृढ निश्चय भक्ति, हरीं कां भवताप व्यक्ति । वरीं कां निजवैभव मुक्ति, हरी कां जनन मरण धाम ॥ २ ॥ उघडें निजज्ञानज्योति, विघडे अज्ञान पाति । सुघडे निजचक्षु होती, सोहिरा निजनामीं सुख विश्राम ॥ ३ ॥

पद ११७.

पाहा हो नर पापी नर पापी । हरिभजनातें लोपी ॥ ध्रु० ॥ परनर मत्सर करितो । दशमुख नर सभे हा पण देतो ॥ १ ॥ मुखिं दोष पराचे बोले । रामनामीं अरिपण केलें ॥ २ ॥ निपुण परनारीसंगातें । केलें कल्पतरूभंगातें ॥ ३ ॥ परधन देखोनि उघडी लोचन । नेणें आत्महित देहमोचन ॥ ४ ॥ सोहिरा सद्गुरुचरणीं । शरण देईं ज्ञान हरी हे गुण ॥ ५ ॥

पद ११८.

पाहा हो नर भला नर भला । हरीभजनीं तोषला ॥ ध्रु० ॥ करितो परनारीसी पूज्यातें । देखे सज्जन सद्रूप निरुतें ॥ १ ॥ मानी मायरूपी परजाया । करितो कल्पतरु जीववाया ॥ २ ॥ शब्द बोले सद्भावाचा । हरघडी घोष करी नामाचा ॥ ३ ॥

परधन देखोनी झांकी नयन । करितो आत्महित अवलोकन ॥ ४ ॥ सोहिरा सद्गुरुचरणीं शरण । करी तो ऐशा नररूपीं वंदन ॥ ५ ॥

पद ११९.

अपरांपर हरि । करितो नवल परि ॥ ध्रु० ॥ सबळ शुद्ध हें जाणोनि एकें प्रकटे ज्ञाननिधी । दोहीं प्रकारें भावोनि आपण खेळे चराचरीं ॥ १ ॥ एक एक भुलपणि मग दावि अनेकगा । अभाळ दृष्टी आणोनि मग हा अगुण जीव वरी ॥२॥ कोठें आपे आपण देखे प्रेमसुख हरिखें । मानुनि अलोढय देहच्यारी ॥ ३ ॥ भवभ्रम फेडुनि निज सोहंबिज । मांडोनि जपतो सोहिरा देहीं निर्धारी ॥ ४ ॥

पद १२०.

येही सुख दुर्लभ मानुनि लाभ ॥ ध्रु० ॥ सुगम समागमीं चालतां आगमीं । सांडुनियां महि डंभ ॥ १ ॥ रम्यपणीं मग देख प्रयाग । पूर्ण निरीं भरे कुंभ ॥ २ ॥ स्नान करोनी कलिमल विलया । आंगिं शमल अनळ डोंभ ॥ ३ ॥ शांतपण जहिं समिरप्रवाहीं । होउनियां स्वयंभ ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे पुढें अहं मी हें नातुडे । मिळोनि अवंचक नभ ॥ ५ ॥

पद १२१.

मन हें कांरे विजन जन देखेना ॥ ध्रु० ॥ सांडुनि भेदिक अलंकार । अभेद एकचि लेणें बोळखेना ॥ १ ॥ स्वरूप उगमीं नित्य निज नेमीं । इंद्रिय वृत्तिसि राखेना ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे जहीं पूर्णस्वपणें । परमामृत रस चाखेना ॥ ३ ॥

पद १२२.

मुखें राम बोलें निजनाम ॥ ध्रु० ॥ नामामृत हें सेउनियां रत । निजपद पावोनि विसरीं श्रम ॥ १ ॥ भक्तीचि मुक्ति दे

जोडे विरक्ति । सर्वेचि मन हें होय निःकाम ॥ २ ॥ निःकाम-पणें वोळखीं निज खुणे । पावोनि अंतरीं होसी आराम ॥३॥ सोहिरा ह्मणे मग आरामपणें । आपें आपणचि निजधाम ॥४॥

पद १२३.

श्रीगुरुप्रसादें आनंद ॥ ध्रु० ॥ एकी एक हा सर्व समूहा । दाउनि खंडितो भेदाभेद ॥ १ ॥ कायाकमळीं मन हा भ्रमर । बैसोनि सेवितसे आमोद ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निज ज्ञान बरवें । ज्याचेनि होय सर्व सिद्ध ॥ ३ ॥

पद १२४.

आनंदकंदा । स्मरिं त्या निज गोविंदारे ॥ ध्रु० ॥ ज्याचें स्वरूप अमुप झालें वेदारे । तेथ धरणें कासया भेद वादारे । त्वरित टाकीं हा सकाम बुद्धि धंदारे । एकें एक जाणपां निजानंदारे ॥ १ ॥ जीवपण हें टाकुनियां निजपदारे । निर्गुणा तूं सगुणा ब्रह्मविंदारे । विरूढलासि पासोनि नादविंदारे । योगियांसि आकळसी मूळबंदारे ॥२॥ कृपाघना जगजीवना मेघःश्यामारे । वचनमात्रें पावविलीं निजधामारे । चुकविलें या संसार महाभ्रमारे । वदानें नित्य दिधलेंसि निजनामारे ॥ ३ ॥ सनकादिकां पूज्य त्या नित्य वंदारे । प्रकटण झालें अंतरींचिया मुकुंदारे । कायाकमळीं घेतले त्या मकरंदारे । सोहिरा ह्मणे चुकविली जन्म आपदारे ॥ ४ ॥

पद १२५.

संसार नाहीं परब्रह्मींचि पाहीं । देह ह्मणोनि पाहतां सर्वही विदेही ॥ ध्रु० ॥ चुवकळुं नको या कल्पना डोहीं । सोहिरा दास ह्मणे हेंचि भज कां लवलाहीं ॥ १ ॥

पद १२६.

निजनयनीं हरि पाहासि जरी गा ॥ ध्रु० ॥ एक तेज हें सर्व प्रकाशनीं । आपण दिससि तूं जगा ॥ १ ॥ गुणातीत जो